# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

## द्वितीय वर्ष कला अभ्यासक्रम सत्र पद्धत (III)

## जनरल पेपर POL २३१ a (Gen-२) २१११३

## महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय चळवळी

## Socio-Political Movement in Maharashtra

## द्वितीय वर्ष कला प्रथम सत्र- III

## राज्यशास्त्र- जून २०१४

## (सुधारीत सत्रपद्धतीचा पुनर्रचित अभ्यासक्रम)

**द्वितीय वर्ष कला सत्र- III**

**१) सत्यशोधक चळवळ-**

- सत्यशोधक चळवळ
- मुस्लिम सत्यशोधक चळवळ
- सत्यशोधक चळवळ परिणाम आणि महत्त्व
- सत्यशोधक चळवळ आणि सद्यस्थिती

**२) दलित चळवळ-**

- ऐतिहासिक पार्श्वभूमी
- डॉ. आंबेडकर यांच्या पूर्वीची दलित चळवळ
- डॉ. आंबेडकर यांच्या काळातील दलित चळवळ
- डॉ. आंबेडकर यांच्या युगानंतरची दलित चळवळ
- दलित चळवळीचे यशापयश

**३) संयुक्त महाराष्ट्र चळवळ-**

- राज्य पुनर्रचना समिती
- १. दार कमिशन २. फाजल अली कमिशन
- ३. जे.व्ही.पी. समिती ४. नागपूर करार
- संयुक्त महाराष्ट्र समिती
- महाराष्ट्र राज्याची स्थापना
- मुंबईचे महत्त्व

**४) आदिवासी चळवळ**

- ऐतिहासिक चळवळ
- उदय, उद्दिष्टे, मूल्यमापन
- आदिवासी विकासाच्या समस्या
- उपाय- १. शासकीय पातळीवर प्रयत्न २. सामाजिक पातळीवर प्रयत्न
- आदिवासी चळवळी सद्यस्थिती

# प्रकरण १ ले
# सत्यशोधक चळवळ

**प्र.१ ला सत्यशोधक चळवळीच्या उदयाची कारणे सांगा?**

**किंवा**

**सत्यशोधक समाजाची तत्वे, ध्येय व कार्य सांगा.**

महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या विकासासाठी सुरू झालेली पहिली सामाजिक चळवळ म्हणून सत्यशोधक चळवळ ओळखली जाते. १९ व्या शतकात प्रामुख्याने उत्तर पेशवाई काळात तत्कालीन समाजाची विभागणी ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर अशी झाली होती. ब्राह्मण समाजाने राजसत्ता आणि सामाजिक प्रतिष्ठेच्या जोरावर खास सवलती मिळवून शूद्र, स्त्रिया आणि अतिशूदाची मोठया प्रमाणावर पिळवणूक करत होते. मूर्तीपूजा, पौरोहित्य, चातु:वर्ण ह्या धार्मिक रूढी परंपरेमध्ये समाज जखडला गेला होता. या सर्वांपासून मुक्ती देण्यासाठी तसेच बहुजन समाजाला संघटित करण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना पुणे येथे केली. महाराष्ट्रात समता प्रधान समाज निर्मितीच्या दृष्टीने सत्यशोधक समाजाच्या कार्याचा विचार केला जातो.

**सत्यशोधक समाज स्थापनेचा उद्देश-** सत्यशोधक समाज स्थापनेचे पुढील उद्देश सांगता येतात.

१. जातीभेदाचे उच्चाटन करणे.

२. बहुजन समाजाला शिक्षित करणे.

३. अस्पृश्यांचा उद्धार करणे.

४. श्रेष्ठ-कनिष्ठ, स्पृश्य-अस्पृश्य, उच्च-नीच हा भेदभाव नष्ट करणे.

५. स्त्री-पुरूष समता निर्माण करणे.

६. पूजापाठ, धार्मिक विधी व शिक्षणाचा हक्क सर्वांना उपलब्ध करून देणे.

७. धार्मिक कर्मकांडास विरोध करणे.

८. स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वाचा पुरस्कार करणे.

**सत्यशोधक समाजाची तत्वे-** सत्यशोधक समाजाची महत्त्वाची तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत.

१) ईश्वर एक असून तो निर्गुण व निराकार आहे.

२) सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे आहेत.

३) परमेश्वराची भक्ती करण्याचा अधिकार प्रत्येक मानवाला आहे.

४) परमेश्वराची भक्ती करण्यासाठी भट वा पुरोहित आणि मध्यस्थाची गरज नाही.

५) माणसाला जातीने नव्हे तर गुणाने श्रेष्ठत्व येते.

६) पुर्नजन्म, कर्मकांड, जपजाप्य इ.गोष्टी अज्ञानमूलक आहेत. ही कनिष्ठ वर्गाच्या पिळवणुकीची प्रमुख साधने आहेत.

७) कोणताही धर्मग्रंथ ईश्वरप्रणित नाही. सर्व धर्मग्रंथाची निर्मिती मनुष्याने केलेली आहे.

सत्यशोधक समाजाचे मुख्य उद्दिष्ट ब्राम्हण पुरोहिताकडून होणारी पिळवणुकीस प्रतिबंध घालणे, समाजातील पददलित वर्गाला हक्कांची जाणीव करणे. या संघटनेचे सदस्यत्व सर्व जातीधर्मासाठी खुले करण्यात आहे. पुण्याबाहेर शाखाही सुरू करण्यात आले. ही संघटना बाह्मणी वर्चस्वाच्या विरोधात होती बाह्मणाच्या विरूद्ध नव्हती. सत्यशोधक चळवळ परितर्वनवादी सामाजिक चळवळ होती. चातुवर्णावर आधारलेल्या जन्माधिष्ठीत जातीसंस्थेमुळे होणाऱ्या विषमता आणि अन्यायाच्या विरोधात संघर्षाची प्रेरणा ही संघटना देते.

**सत्यशोधक समाजाची उदयाची कारणे, उद्दिष्टय, ध्येय व कार्य-**

**१) जातीभेदाचे उच्चाटन करणे-** भारतीय समाज वर्णव्यवस्थेवर आधारलेला होता. वर्णव्यवस्थेचे काही काळानंतर जातीव्यवस्थेत रूपांतर झाले. जाती व्यवस्थेमुळे श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव निर्माण झाला होता. वेगवेगळया व्यवसायावरून वेगवेगळया जाती, उपजाती व पोटजाती निर्माण झाल्या. प्रत्येक जात ही स्वत:ला दुसऱ्यापेक्षा वरिष्ठ समजत होती. समाजात उच्च नीच हा भेद निर्माण झाला. वरिष्ठ जाती कनिष्ठ जातीवर अन्याय आणि शोषण करीत होत्या. त्यामुळे समाजात भेदाभेद

निर्माण होऊन सामाजिक ऐक्य नष्ट झाले होते. हे भेदाभेद तसेच श्रेष्ठ -कनिष्ठ भावना नष्ट करून जातीभेदाचे उच्चाटन करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना झाली होती.

**२) अस्पृश्यांचा विकास करणे-** भारतीय समाजात जाती व्यवस्थेतून अस्पृश्यतेची प्रथा निर्माण झाली होती. अस्पृश्य वर्गाला मुख्य समाजापासून दूर ठेवण्यात आले. उदा. अस्पृश्यांना राहण्यासाठी गावाबाहेर जागा, पाणी पिण्यासाठी स्वतंत्र विहीरी, मंदिरात प्रवेश नाही. त्यामुळे समाजातील या घटकाला सामाजिक अधिकार व विकासापासून वंचित केले गेले होते. या अस्पृश्य समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

**३) अंधश्रद्धा व रूढी, परंपरा नष्ट करणे-** तात्कालीन समाजात केशवपन, बालविवाह, विधवाविवाहावर बंदी, कुमारी माता इ. सारख्या वाईट रूढया व परंपरा आणि अंधश्रद्धा निर्माण झाल्या होत्या. समाज अंधश्रद्धेत बुडाल्यामुळे अविकसित झाला. रूढी व परंपरेत बहुजन समाज गुरफटलेला होता. या रूढया,परंपरा व अंधश्रद्धेच्या शृंखलाचे फास तोडून समाजाच्या विकासाचा प्रयत्न सत्यशोधक समाजाने केला.

**४) मानवाची जात गुणांवर ठरवावी-** भारतीय समाजात जाती व्यवस्था जन्मावर आधारित होती. ज्या जातीत व्यक्तीचा जन्म झाला त्या जातीत मरेपर्यंत राहावे लागते. उदा.एखादी व्यक्ती ब्राम्हण जातीत जन्माला आली. त्यात कोणतेही गुण नसले तरी ब्राम्हण जातीचे हक्क आपोआप मिळतात. याउलट एखादी व्यक्ती कितीही बुद्धिवान असला तरी त्याचा जन्म कनिष्ठ जातीत झाल्यास त्यास आयुष्यभर कनिष्ठ वर्गात राहावे लागते. म्हणून सत्यशोधक समाजाने व्यक्तीची जात जन्मावर न ठरता ती गुणांवर ठरवावी याला महत्त्व दिले.

**५) स्त्री-पुरूष समानता-** भारतीय समाजात स्त्रियांची स्थिती अस्पृश्यपेक्षाही वाईट होती. त्यांना समाजात दुय्यम स्थान दिला होता. स्त्रियांना सर्व अधिकारापासून वंचित करून पुरूषांचे गुलाम केले होते. फुल्यांनी सर्व प्रथम स्त्रियांना शिक्षणाचा हक्क देऊन स्त्री उद्धाराचे प्रयत्न केले. या सुधारण करण्यामागे स्त्री-पुरूष समानता निर्माण करणे हा फुल्यांचा प्रमुख उद्देश होता.

**६) देव व भक्त मध्यस्थ नष्ट करणे-** फुलेच्या समकालीन समाज व्यवस्थेत ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व वाढले होते. ग्रामीण भागातील बुहजन समाज अंधश्रद्धा व रूढीच्या जाळयात अडकला होता. धार्मिक कार्याची मक्तेदारी ब्राह्मणाकडे आली होती. देव व भक्त यात कोणतेही कार्य ब्राह्मणाशिवाय करता येत नाही. त्यामुळे धार्मिक विधी त्यांच्या सल्लाने केली जात असते. त्यामुळे पुरोहित वर्ग देव व भक्त यात मध्यस्थ झाला होता. धार्मिक संस्कार करण्याचा व ज्ञान घेण्याचा अधिकार ब्राह्मणाला असून आम्ही सांगु तेच खरे शास्त्र, त्यांचे पालन न केल्यास तुम्हाला स्वर्गात जागा मिळणार नाही. थोडक्यात पूजा-अर्चा, लग्नविधी करण्याचे अधिकार ब्राह्मण वर्गाकडे असल्यामुळे ते समाजाची लूटमार करत असत. त्या शोषणातून समाजाची मुक्तता करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

**७) शेतकऱ्यांची गुलामगिरीतून मुक्तता करणे-** फुल्यांनी शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथात शेतकऱ्याच्या दुःखद स्थितीचे वर्णन करून शेतकऱ्याची चार शत्रू सांगितले.

अ) ब्राह्मण- ब्राह्मण हे धर्माच्या नावाखाली शेतकऱ्यांचे शोषण करतात

ब) सावकार - यात मारवाडी, गुजर, पारशी यांचा समावेश असून शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाबद्दल जबरदस्त व्याज आकारून शेतकऱ्यांचे शोषण करतात.

क) इंग्रज सरकारचे नोकर- इंग्रज सरकारचे काळे व गोरे नोकर खोटी कामे करण्यासाठी शेतकऱ्यांकडून लाच घेतात व त्याची लूट करतात.

ड) दलाल- दलाल हे शेतकऱ्यांच्या कच्चा माल कमी किंमतीत खरेदी करून भरपूर नफा करून विकतात.

वरिल सर्व घटक शेतकऱ्यांच्या विकासाच्या आड येणारे असून शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन शेतकरी वर्गाची भयानक पिळवणुक चालवलेली होती. ती पिळवणुक व शोषण थांबविण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती.

**८) सर्वांना सहज शिक्षण प्राप्त व्हावे-** शूद्र, अतिशूद्र वर्गानी वरिष्ठ वर्गाची गुलामगिरी स्वीकारली. त्याविरूद्ध फुल्यांनी आवाज उठविला. शूद्राच्या गुलामगिरीचे मूळ कारण म्हणजे अज्ञान होय. विद्येची मक्तेदारी वरिष्ठ वर्गाकडे असल्यामुळे कनिष्ठ वर्गाला शिक्षण मिळाले नाही. ब्रिटिश काळात देखील झिरपणाऱ्या शिक्षण पद्धतीला पुरस्कार केला गेल्यामुळे शिक्षणाद्वारे वरिष्ठ वर्गाचे जास्त हितसंबंध जोपासले गेले म्हणून सत्यशोधक समाजाने बहुजन समाजासाठी शाळा सुरू

करण्यात कराव्यात अशी मागणी केली. उच्चवर्गीय शूद्रामध्ये शिक्षण प्रसार करू शकणार नाही. कारण शूद शिकल्यास त्यांचे हितसंबंध नष्ट होतील. म्हणून सरकारने शूदांसाठी शाळा सुरू करून शूद शिक्षकांची शाळेत भरती करावी. फुल्यांनी पुढील मंत्र दिला.

विद्येविना गती गेली,
गती विना मती गेली,
मती विना वित्त गेले,
वित्त विना शूद खचले,
इतका अनर्थ एका विद्येने केला.

**९) समतेचा पुरस्कार करणे-** सत्यशोधक समाजाच्या स्थापनेमागे अस्पृश्यता निवारण्याचा हेतू होता. सामाजिक विषमता नष्ट करून समाजात समता निर्माण करणे हे ध्येय होते. त्यासाठी केवळ ब्राह्मण वर्गाची दलाली नष्ट करून ते साध्य होणारे नव्हते. त्यासाठी जाती-जातीमध्ये ऐक्य निर्माण करणे गरजेचे होते. सत्यशोधक समाज व्यक्तीला गुलाम करणाऱ्या कोणत्याही अनैसर्गिक अधिकाराच्या विरोधात होता. सर्व माणसे एकाच देवाची लेकरे आहेत. त्यामुळे जात व धर्माच्या आधारावर श्रेष्ठ-कनिष्ठ, स्त्री-पुरूष इ विषमतेवर आधारित रूढींना विरोध करून समतेचा पुरस्कार केला. परमेश्वराने प्रत्येक माणसाला काही जन्मसिद्ध अधिकार दिल्यामुळे समाजात सर्वांना समान संधी दिली पाहिजे हा मुख्य उद्देश समाजाचा होता.

अशा प्रकारे सत्यशोधक समाजाने समाजातील अनिष्ट रूढया, अंधश्रद्ध, सामाजिक गुलामगिरी व विषमता नष्ट करण्यासाठी व्यापक प्रयत्न केलेले आढळतात. समाजातील वंचित वर्गाला शिक्षणाचा हक्क, समान संधी आणि दर्जा मिळवून देण्यासाठी कार्य केलेले दिसते. त्या कार्यास अनुसरून या समाजाची ध्येय, उद्दिष्टे आणि तत्त्वे सांगितलेली आहेत.

**टिप- महात्मा फुलेचे कार्य व योगदान-**

महात्मा फुले हे महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक होते. महात्मा फुले महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा क्रांतीचे आद्य प्रवर्तक मानले जातात. फुलेंनी तात्कालीन समाजाचे परिस्थिती पाहून समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. त्याकाळी समाजात कर्मकांड, रूढी, परंपरा आणि प्रथाचे स्तोम माजले होते. शूदावर मोठया प्रमाणावर अन्याय,अत्याचार होत होते. स्त्रियांची स्थिती शूदापेक्षाही वाईट होती. त्यांना समाजात दुय्यम स्थान होते. या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी फुलेनी दिनबंधू मासिकातून जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. त्याबरोबर शेतकऱ्यांचा आसूड, गुलामगिरी, अस्पृश्याची कैफियत, शिवाजींचा पोवाडा, इशारा, तृतीय रत्न व सार्वजनिक सत्यधर्म इ.ग्रंथाचे लेखन केले. अखंड नावाने काही अभंगाची रचना केली. दिनबंधु वर्तमानपत्रातून दीन-दुबळयांच्या दु:खाला वाचा फोडली. या ग्रंथाच्या माध्यमातून बहुजन समाजातील लोकांना सामाजिक रूढीपासून दूर करण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुलेंनी समाजात सहजीवन, सहशिक्षण, समता व बंधुता निर्मितीचा प्रयत्न करून राजकीय जागृती आणि राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याचा प्रयास केला. जातीव्यवस्था आणि मूर्तिपूजेवर टीका केली. जगात एकमेव जात म्हणजे मानवजात आहे हे मत मांडले.

लेखनाबरोबर प्रत्यक्ष सुधारणा करण्यासाठी १९४८ साली पुण्यातील बुधवारपेठेतील भिडेच्या वाडयात मुलींसाठी शाळा काढली. आपल्या घरातील हौद अस्पृश्यासाठी खुला करून सामाजिक क्रांतीचा संदेश स्वत:च्या उदाहरणापासून दिला. १९५१ साली सर्व जातीच्या मुलांसाठी आणि अस्पृश्य जातीतील मुलासाठी शाळा काढली. मागासलेल्या जातींना शिक्षण देण्यासाठी शिक्षण देण्यासाठी शाळा सुरू केली. केशवपनाची रूढी बंद करण्यासाठी पुण्यात न्हाव्याचा संप घडवून आणला. कुमारी माता व विधवा माताचा प्रश्न सोडविण्यासाठी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. विधवा पुर्नविवाहाचे सर्मथन केले. १८६० साली पहिला पुर्नविवाह घडवून आणला आणला. फुलेनी सुरू केलेल्या कार्याला त्यांची पत्नी सावित्रीबाई फुलेंची मोलाची साथ मिळाली. मुलीच्या शाळेसाठी शिक्षिका मिळत नसल्याने फुलेंनी सावित्रीबाई स्वतः शिकविले आणि शिक्षिका बनविले.

महात्मा फुले यांनी समता, मानवता, विनयता, विवेक आणि बंधुभाव निर्माण करण्यासाठी आपले सारे आयुष्य वेचले. सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून बहुजन समाजात आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे संपूर्ण तत्त्वज्ञान मानवी प्रतिष्ठा, मानवी हक्क, धार्मिक सहिष्णुता, मानवी स्वातंत्र्याचा संदेश देणारे आहे. आपल्या समाज सुधारणेच्या कार्यास संघटनेची जोड देण्यासाठी २५ सप्टेंबर १८७३ ला पुणे या ठिकाणी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

सत्यशोधक समाजाचे पहिले अध्यक्ष व कोषाध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. स्थापनेच्या वेळेस फक्त ६० सदस्य होते. अल्पकाळात महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यात ही चळवळ पोहचली. अनेक कार्यकर्ते या चळवळीला येऊन मिळाले. समाजातील स्त्रिया, पददलित, आणि शेतकऱ्यांना न्याय हक्कांची जाणीव करून दिलेले दिसते. वंचित वर्गाला सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी महात्मा फुले आणि त्यांची पत्नी सावित्रीबाई यांनी आयुष्यभर प्रयत्न केलेले आढळतात. फुलेच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात अनेक समाजसुधारक निर्माण झालेले होते. अशा महामानवाचे २८ नोव्हेंबर १९९० रोजी निधन झाले.

**प्र.२ रा.सत्यशोधक चळवळीचे महाराष्ट्रावर झालेल्या परिणाम व महत्त्वाची चर्चा करा?**

महात्मा फुलेनी तत्कालीन समाजातील दोष निर्मूलनासाठी २४ सप्टेंबर १९७३ ला सत्यशोधक समाजाची स्थापना पुणे येथे केली. अल्पकाळात सत्यशोधक समाजाच्या महाराष्ट्राच्या कोना-कोपऱ्यात शाखा उघडल्या. अनेक लोकांनी या चळवळीला पाठिंबा दिला. या चळवळीने केलेल्या कामातून महाराष्ट्रात समाजप्रबोधन घडलेले दिसते. त्यांच्या कार्याचा महाराष्ट्रातील समाजकारण, राजकारण आणि इतर क्षेत्रात पुढील परिणाम झालेले दिसतात.

**१)बहुजन समाजात नेतृत्वाचा उदय-** फुलेंनी सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून जे कार्य केले त्यामुळे बहुजन समाज जागृत झाला. बहूजन समाजाला शिक्षणाचे दरवाजे त्यांनी उघडे करून दिले. शिक्षण घेतल्यामुळे बहुजन समाजाला आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव होऊ लागली. अन्याय दूर करण्यासाठी बहुजन समाज संघटित झाला. त्यातूनच बहुजन समाजाच्या नेत्याचा महाराष्ट्राच्या राजकारणात उदय झालेला दिसतो. त्यात विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, यशवंतराव चव्हाण, महर्षी कर्वे, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, भाऊसाहेब हिरे, पंजाबराव देशमुख इ.नेत्यांचा समावेश होतो. महाराष्ट्राच्या राजकारणात स्वातंत्र्योत्तर काळात सत्यशोधक समाजाने केलेल्या कार्यातून बहुजन समाज राजकीय जागृतीसोबत सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातही मोठया प्रमाणावर जागृती झालेली असते. परिणामतः महाराष्ट्रातील विविध सामाजिक आणि आर्थिक संस्थेत बहुजन समाजातील लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. फुलेंच्या कार्यामुळे उपेक्षित घटकांना न्याय मिळालेला दिसतो.

**२) शैक्षणिक क्षेत्रावरील परिणाम-** सद्यःस्थितीत महाराष्ट्रातील विविध उच्चपदावर स्त्रिया काम करता आहेत. स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडून अनेक योजना आखल्या जात आहेत. त्या सर्व योजना फुलेंनी स्त्री शिक्षणासाठी जी कामगिरी केली त्याचा परिणाम आहे. फुल्यांच्या प्रेरणेने महर्षी कर्वे व शाहू महाराजांनी शैक्षणिक संस्था काढून बहूजन समाज व स्त्रियांना शिक्षित केले. कर्मवीर भाऊराव पाटीलांनी रयत शिक्षण संस्था स्थापन करून संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षणाची क्रांती घडवून आणली. सरकारने मुलींना १२ वी पर्यंत मोफत शिक्षण, स्त्रियांना स्थानिक स्वराज्य संस्थेत ५०%आरक्षण, स्त्रियासाठी स्वतंत्र शाळा व महाविद्यालये इ. महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात जे बदल होत आहेत. त्यामागे सत्यशोधक समाजाचे योगदान आहे.

**३) कृषिविषयक सुधारणा-** महात्मा फुल्यांनी शेतकऱ्यांचा आसूड ग्रंथामध्ये शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराचे अभ्यास पूर्ण वर्णन केले. शेतकऱ्याच्या विकासासाठी अनेक योजना सुचविल्या. महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांच्या विकासासाठी ज्या योजना अंमलात आणल्या. त्या सर्व योजना त्यांनी आपल्या ग्रंथात सांगितल्या आहेत. त्यात धरणे व तलाव बांधणे, विहीरी निर्मिती करणे, शेतीला बारमाही पाणीपुरवठा निर्माण करणे, स्वतः बि-बियाणे उपलब्ध करून देणे, कमी व्याजदराने कर्ज देणे इ.योजना सरकारने फुलेंच्या प्रभावाने सुरू केल्या.

**४) एक गाव एक पाणवठा-** फुलेंनी अस्पृश्यासाठी पहिल्यादा स्वतःच्या घरातील हौद खूला करून भावी पिढीना एक गाव एक पाणवठा हा संदेश दिला. त्यानंतर बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे चवदार तळेला पाण्यासाठी सत्याग्रह केला. समाजसुधारक बाबा आढाव यांनी फुलेंच्या प्रेरणेने १९७७ मध्ये एक गांव एक पाणवठा ही चळवळ सुरू केली. या चळवळीला महाराष्ट्र शासनाने मान्यता देऊन एक गाव एक पाणवठा ही मोहिम राबवायला सुरूवात केली. त्यामुळे महाराष्ट्रात जातीयतेची तीव्रता कमी होण्यास मदत मिळाली.

**५) दलित साहित्याची निर्मिती -** महात्मा फुलेंनी दलित समाजाला शिक्षण देऊन जागे केले. अनेक सुशिक्षित तरूणांनी आपले आत्मचरित्र लिहून समाज व्यवस्थेविरूद्ध बंड करण्यासाठी दलित माणसाला प्रवृत्त केले. साहित्याच्या क्षेत्रात स्वतःच

दलितांनी दलित साहित्याची निर्मिती केली आहे. आज साहित्यात दलित साहित्याचा मोठया प्रमाणावर अभ्यास सुरू झाला आहे.

**६) मुस्लीम सत्यशोधक समाजाची स्थापना-** हिंदू समाजातील दोष दूर करण्यासाठी फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यांच्या कार्याने प्रेरित होऊन हमीद दलवाई यांनी १९७० मध्ये मुस्लिम सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यात पडदा पद्धत, अशिक्षितपणा, धर्मभोळेपणा इ मुस्लिम समाजातील अनिष्ट प्रथा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. मुस्लिम समाजात परिवर्तन निर्माण होण्यास सत्यशोधक समाज कारणीभूत झाला.

**७) धार्मिक गुलामगिरी नष्ट झाली-** सत्यशोधक समाजाने ब्राह्मणाशिवाय लग्न, पूजापाठ, धार्मिक विधी पार पाडण्यास सुरूवात केली. प्राचीन काळापासून चालत आलेले ब्राह्मण वर्गाचे धार्मिक वर्चस्व यामुळे कमी झाले. सत्यशोधक समाजाने धार्मिक विधी करण्यासाठी आपल्या कार्यकर्त्यांना प्रशिक्षण दिले. बहुजन समाजातील लोकांनी प्रशिक्षित कार्यकर्त्यांपासून धार्मिक विधी करून घ्यायला सुरूवात केल्यामुळे ब्राम्हण वर्गाचे वर्चस्व कमी होऊन धार्मिक गुलामगिरी नष्ट झाली.

**८) समाजसुधारकांचा उदय-** सत्यशोधक चळवळीपासून प्रेरणा घेऊन विठ्ठल रामजी शिंदे, पंडित रमाबाई, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, केशवराव जेधे, शंकरराव मोरे, शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, मुकुंदराव पाटील इत्यादी सारखे समाजसुधारक निर्माण झालेले दिसतात. त्यांनी महाराष्ट्रात समाजप्रबोधनाची परंपरा फुल्यानंतर पुढे चालू ठेवलेली होती.

९) **सर्वसमावेशक व विचार प्रर्वतक चळवळ-** ही चळवळ ब्राह्मणविरोधी नसून ब्राह्मण्यवादी वृत्ती विरोधी होती. या चळवळीतून पुढे ब्राह्मणेतर चळवळ, दलित चळवळ, मुस्लिम सत्यशोधक चळवळ आणि आदिवासी चळवळी उदयाला आलेल्या दिसतात. ही चळवळ विशिष्ट वर्ग वा क्षेत्रापुरती मर्यादित नव्हती तर सर्वसमावेशक आणि विचारप्रर्वतक चळवळ होती. या चळवळीतून प्रेरणा घेऊन डॉ. आंबडेकरांनी बहुजनाच्या मुक्तीचे तत्त्वज्ञान विकसित केले.

अशा प्रकारे सत्यशोधक समाजाने केलेल्या कार्यातून महाराष्ट्राचे राजकारण, समाजकारण आणि इतर सर्व क्षेत्रात मूलगामी परिवर्तन घडवून आणलेले दिसते.

**प्र.३ रा. सत्यशोधक चळवळीचे मूल्यमापन वा टीकात्मक परीक्षण करा?**

**सत्यशोधक चळवळीचे यश-** महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १९७३ रोजी पुण्यात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यानंतर मुंबईत येथे कामठीपुऱ्यात सत्यशोधक समाजाच्या कार्याचा प्रारंभ झाला. मुंबई हे सत्यशोधक विचारांचे प्रमुख केंद्र बनले. कामगार क्षेत्रात चळवळीचा कार्याचा प्रसार मोठया प्रमाणावर झाला. ग्रामीण महाराष्ट्रात सातारा, धनकवडी, फुलसंगी, भिलार, ओतूर येथे सत्यशोधक समाजाच्या शाखा निर्माण झाल्या. १८७७ पर्यंत ग्रामीण भागात मोठया प्रमाणावर शाखाची स्थापना होऊन मोठया प्रमाणावर प्रचार व प्रसार होऊ लागला. या समाजाच्या कार्यातून केशवराव जेधे, दिनकर जवळकर, यशवंतराव चव्हाणासारखे ब्राह्मणेतर नेतृत्वाचा उदय झाला. महात्मा फुलेचे वाङ्‌मय व सत्यशोधक चळवळीने ब्राह्मणेतरांमध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक जागृती झाली. संपूर्ण महाराष्ट्रात विशेषतः सातारा, कोल्हापूर, दक्षिण महाराष्ट्रात चळवळीचा वेगाने प्रसार होऊ लागला. राष्ट्रीय चळवळीच्या स्थापनेपूर्वी ही चळवळी जोमाने कार्य करत होती. सत्यशोधक चळवळ ही महाराष्ट्रात सामाजिक आणि धार्मिक क्रांती घडवून आणणारी चळवळ ठरली. ही चळवळ महाराष्ट्रातील खेडयापाडयापर्यंत पोहचली. या चळवळीला निव्वळ बुद्धिवंताचा नव्हे तर सर्वसामान्य कामगार, शेतकरी, शेतमजूरांचा पाठिंबा मिळाला. चळवळीने दलित, ब्राह्मणेतर समाजाला सामाजिक प्रेरणा देण्याचे कार्य चळवळीने केले. जनतेशी निगडित कार्य चळवळीने सुरू केल्यामुळे सर्व सामान्य जनतेचा पाठिंबा मिळू लागला. अंत:प्रेरणा व तळवळीवर चळवळीचा भर होता. महाराष्ट्रातील इतर संस्थाना जे कार्य साध्य झाले नाही ते या चळवळीने साध्य केले. म्हणून दिनकरराव जवळकरांच्या मते, "सत्यशोधक समाजाचा भर सत्यावर आहे. सत्यशोधक म्हणजे निराळा धर्म नाही. निराळा पंथ नाही तर हिंदू धर्माच्या उज्ज्वल तत्वांनी सर्व जगाला करून सोडण्याचा मोठया महत्वकांक्षेने एके ठिकाणी जमलेल्या हिंदुचा जमाव असून सामाजिक, धार्मिक तसेच राजकीय बाबतीत समानतेच्या वागणुकीविरूद्ध ते बंड आहे." या शब्दात या चळवळीच्या कार्याचा गौरव केलेला दिसतो. या चळवळीच्या माध्यमातून बहुजन समाजात रूढी विरूद्ध बंड करण्याची प्रवृत्ती विकसित झाली. चळवळीने कार्यकर्त्यांना प्रशिक्षण दिल्यामुळे बहुजन समाजात ब्राह्मणाशिवाय धार्मिक विधी, लग्न समारंभ होऊ लागले. परिणामतः देव आणि भक्त यातील मध्यस्थाचे महत्त्व कमी झाले.

**सत्यशोधक चळवळीचे अपयश वा दोष-** या चळवळीने महाराष्ट्रातील बहुजन समाजाची जे कार्य केले ते कार्य ते अतिशय मोलाचे आहे. असे असले तरी सत्यशोधक चळवळीचे मूल्यमापन करतांना काही टीकाकारांनी या चळवळीवर टीका केली. त्यात प्रामुख्याने पुढील टीका केलेल्या आहेत.

**१) ब्राह्मण व ब्राह्मणेतर संघर्ष निर्माण केला-** महात्मा फुलेंनी आपल्या आयुष्यात सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून कार्य केले. मात्र फुलेंच्या मृत्यूनंतर या चळवळीचा विधायक कार्यापेक्षा ब्राह्मणावर टिका करणे, त्यांना बहुजन समाजापासून दूर ठेवणे या कामाकडे जास्त लक्ष दिले. म्हणून या चळवळीवर टीका केली जाते की या चळवळीमुळे ब्राह्मण व ब्राह्मणेतर संघर्ष निर्माण झाला.

**२) बहुजन समाजातील सांस्कृतिक मागासलेपणा-** महात्मा फुलेंनी बहुजन समाजाला अन्यायाविरूद्ध जागृत केले. या बहुजन समाजाने एकत्र येऊन आर्थिक प्रगती केली. परंतु त्यांच्यात अजूनही सांस्कृतिक मागासलेपणा अस्तित्वात आहे. फुलेंचे बंड केवळ आर्थिक परिणामासाठी नव्हते तर सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनासाठी होते. बहुजन समाजाच्या सांस्कृतिक जीवनात अद्यापही परिवर्तन वा बदल झाले नाही. या म्हणून चळवळीवर टीका केली जाते.

**३) बहुजन समाजाला महात्मा फुलेंचे तत्वज्ञान पचले नाही-** महात्मा फुलेंचे तत्वज्ञान मानव मुक्तीचे तत्वज्ञान आहे. परंतु ज्या समाजात सामाजिक, आर्थिक, धार्मिक व शैक्षणिक विषमता आहे. स्त्री पुरूषातील भेद आजही दिसून येतात. या समाजाला महात्मा फुलेंचे तत्वज्ञान पचले नाही असेच म्हणावे लागेल.

**४) बहुजन समाज धार्मिक रूढीच्या आहारी गेला-** महात्मा फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापन बहुजनाची धार्मिक रूढीतून मुक्तता करण्यासाठीच निर्माण केला होता. शिक्षणातून मनुष्याची प्रगती होते आणि त्यातून समाज जीवनात परिवर्तन घडते अशी फुलेंनी धारणा होती. बहुजनाने शिक्षणात प्रगती केलेली असली तरी समाजातील अनिष्ट रूढी व परंपरा नष्ट होऊ शकल्या नाहीत. या उलट सुशिक्षित लोकांमध्ये धार्मिक रूढीचा प्रभाव जास्त दिसून येतो.

**५) बहुजन समाजात विविध गट निर्माण झाले-** महात्मा फुलेंनी बहुजन समाजाला अन्यायाविरूद्ध लढण्यासाठी एकत्र आणले पण त्यांच्या निधनानंतर त्यांच्या कार्यकर्त्याचे वेगवेगळे गट निर्माण झाले. उदा.मराठा महासंघ, रिपब्लिकन पक्ष अशा विविध संघटनामुळे बहुजन समाज विखुरला गेला. त्यामुळे बहुजन समाजात एकतेचा विकास होऊ शकला नाही.

**६) विधायक कार्याचा अभाव -** महात्मा फुलेंनी चळवळ कोणत्याही प्रकारचा द्वेष निर्माण करण्यासाठी सुरू केली नव्हती. त्यांचे विचार समजून न घेता काही कार्यकर्त्यांनी चळवळीत प्रवेश केला. आपल्या राजकीय स्वार्थासाठी विधायक कार्याकडे जाणुन-बुजून दुर्लक्ष केले. त्यांच्या मृत्यूनंतर टीका टिपण्णी, आरोप प्रत्यारोप सुरू झाल्यामुळे चळवळीतील विधायक बाजूकडे दुर्लक्ष झाल्यामुळे चळवळीवर टीका केली जाते.

वरिल टीका सत्यशोधक समाजावर होत असली तरी तिचे महत्त्व नाकारता येत नाही. समाजामध्ये परिवर्तनाची दिशा या चळवळीने निर्माण करून महाराष्ट्रात सामाजिक व धार्मिक क्रांती घडवून आणली. त्यामुळे चळवळीचे महत्त्व लक्षात घेता तिच्यावर होणारी टीका चळवळीच्या तत्त्वावर नसून कार्यकर्त्यांवर आहे हे लक्षात घेता कार्यकर्त्यांनी टीककडे लक्ष देणे गरजेचे आहे.

**टिप- सत्यशोधक चळवळीची सद्यःस्थिती-** सामाजिक समता आणि समताप्रधान समाज निर्मितीसाठी महाराष्ट्रातील लोकजीवनाला प्रभावित करणारी सत्यशोधक चळवळ ही महत्त्वपूर्ण मानली जाते. अत्यंत अल्पकाळात ही चळवळ महाराष्ट्राभर पसरली. जातिभेद, कर्मकांड, मूर्तिपूजा, अनिष्ठ रूढया परंपरा यांचे निर्मूलन करून बहुजन समाजात संपूर्ण वैचारिक क्रांती घडवून आणणारी ठरली. फुले सोबत सावित्री बाई फुले, कृष्णराव भालेराव, डॉ. विश्राम घोले, डॉ. संमुजी लाड, रायभान जाधव, भास्कर जाधव, प्राचार्य गजमल माळी, व्यंकटराव रणधीर, माधवराव बागल, सखाराम पाटील, जी.रा.उगळे, बाबा आढाव, नलिनीताई ढाके इत्यादीसारख्या छोटया-मोठया निष्ठावंत कार्यकर्त्यांनी ही चळवळ नेटाने पुढे नेण्याचा प्रयत्न केला. या चळवळीने महाराष्ट्रात समाजक्रांतीचे युग उदयाला आले. महात्मा फुल्यांच्या नंतर चळवळीची गती मंदावली असली तरी शाहू महाराज, शंकरराव मोरे, शाहू महाराज, केशवराव जेधे, भास्करराव जाधव, पिराजीराव रावनाईक इत्यादी मान्यवरांनी सत्यशोधक चळवळ पुनर्जिवीत करून गतिमान केली. या चळवळीने शैक्षणिक संस्थाची स्थापना, परिवर्तन शिबिरे, नैसर्गिक आपत्ती काळात मदत, श्रमदान शिबिरे, कार्यकर्ते प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले. १९११ पासून ते २००७ पर्यंत सत्यशोधक समाजाची महाराष्ट्रात विविध ठिकाणी अधिवेशने झाली. त्यात विविध पुरोगामी ठराव संमत

केले. या शिवाय जनजागृती, सभा, संमेलने, नियतकालीके, बैठका, व्याख्याने, चर्चासत्राच्या माध्यमातून चळवळीचा प्रसार व प्रचार सुरू ठेवलेला दिसतो.

स्वातंत्र्योत्तर काळात सत्यशोधक चळवळीच्या कार्याला उतरती कळा लागलेली दिसते. चळवळीतील प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकारी सत्तेच्या राजकारणा शिरल्यामुळे योग्य नेत्याअभावी चळवळ प्रभावहीन होत गेली. चळवळीच्या माध्यमातून बहुजनाच्या शैक्षणिक परिस्थितीत आमुलाग्र बदल झाल्याने त्यांची आर्थिक स्थिती उंचावली परंतु चळवळीने विकसित केलला वैचारिक वारशा नष्ट होऊ लागला. कारण बहुजन समाज परत रूढीग्रस्त होऊ लागला. अलीकडच्या बाबा आढाव यांनी एक गाव एक पाणवठा, देवदासीचे पुनर्वसन, हमाल पंचायत इत्यादी संस्थाच्या माध्यमातून ही चळवळी जिंवत ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. महाराष्ट्रात छगन भुजबळ यांनी स्थापन केलेल्या महात्मा फुले सामाजिक समता प्रतिष्ठानाच्या माध्यमातून मागासवर्गीयाचे केलेले संघटन आणि संस्थेच्या माध्यमातून मागासवर्गीयाच्या आरक्षणासाठी केलेल्या चळवळी वगळता सत्यशोधक चळवळी फारसे भरीव कार्य स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रात केलेले दिसून येत नाही. ही चळवळ सामाजिक उपक्रमापेक्षा राजकीय सत्ता प्राप्तीचा मार्ग म्हणून वापरली गेल्यामुळे चळवळीत विधायक कार्याचाही अभाव दिसून येतो. महाराष्ट्राच्या इतिहासात युग निर्माण करणारी चळवळ इतिहास जमा होती की काय अशी शंका निर्माण व्हावी इतपत चळवळी कार्य मंदावलेले दिसून येते.

चळवळीच्या कार्याचा पूर्वी इतका प्रभाव राहिलेला नसला तरी महाराष्ट्राच्या समाजप्रबोधना चळवळीने निभावलेली भूमिका आणि कार्य कधीही विसरता येणार नाही. या चळवळीने बहुजनामध्ये आत्मविश्वास आणि प्रेरणा विकसित करण्यात महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे हे विसरता येणार नाही.

**प्र.४ वा. मुस्लिम सत्यशोधक चळवळ उदयाची पार्श्वभूमी व कारणे स्पष्ट करा?**

महाराष्ट्रातील मुस्लिम सत्यशोधक चळवळीचा उदय ही सामाजिक व राजकीय जीवनातील महत्त्वपूर्ण घटना आहे. ही सामाजिक परिवर्तनवादी चळवळ असली तरी त्यातून राजकीय परिवर्तनाला सहाय्य मिळालेले दिसते. हिंदू धर्मामध्ये अनेक राजकीय व सामाजिक सुधारणावादी विचारवंत उदयाला आलेत पण मुस्लिम धर्मात सामाजिक सुधारणा घडविणारे विचारवंत व कार्यकर्ते अभावानेच दिसून येतात. मुस्लिम समाजात आधुनिक सुधारणावादाचे बीजारोपण करण्यासाठी हमीद दलवाई यांनी महाराष्ट्रात २२ मार्च १९७० ला मुस्लिम सत्यशोधक चळवळ सुरू केली. महात्मा फुले व बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रभावाने शरीयत व कुराण यातील कालबाह्य बार्बीना आवाहन देण्यास सुरूवात केली. परंपरागत चालत आलेल्या जाचक व कालबाहय रूढी वा प्रथेमधून मुस्लिम धर्मामध्ये जी राजकीय व सामाजिक सुधारणावादाची कोंडी झाली होती. ती फोडण्याचे महत्त्वाचे कार्य हमीद दलवाईनी केले.

**मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेचा उद्देश-** मुस्लिम सत्यशोधक चळवळ पुढील उद्देशाने स्थापन करण्यात आलेली दिसते.

१. मुस्लिम समाजत प्रबोधन घडवून त्यांना राष्ट्रवादी व धर्मनिरपेक्ष बनविणे.
२. मुस्लिमांमध्ये इहवादी जीवनमूल्ये व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे.
३. मुस्लिम समाजातील अलगतावादी प्रवृत्ती, अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा व अंधश्रद्धा नष्ट करणे.
४. मुस्लिम स्त्रियाचे प्रश्न सोडवूण त्यांना समाज हक्क प्राप्त करून देणे.
५. मुस्लिम समाजात प्रादेशिक भाषेतून शिक्षण घेण्यास प्रोत्साहन देणे.
६. समान नागरी कायदयाचा आग्रह धरणे.
७. लोकसंख्या वाढीला नियंत्रित करणे.
८. मुस्लिमांमध्ये बुद्धिवादी, मानवतावादी, उदारमतवादी विचारप्रवाह विकसित करणे.

**मुस्लिम चळवळीच्या उदयाची कारणे वा पार्श्वभूमी -**

**१) महाराष्ट्रातील निरनिराळया चळवळी व मुस्लिमांचा सहभागाचा अभाव-** महाराष्ट्रात आजपर्यंत अनेक चळवळी निर्माण झालेल्या दिसतात. स्वातंत्र्य आंदोलनात मुस्लिमांनी सक्रिय सहभाग घेतलेला होता. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात मुस्लिम समाजाचा राजकीय चळवळीत सहभाग कमी झालेला दिसतो. उदा.मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीची जी चळवळ झाली त्यात मुस्लिम समाजाचा सहभाग अतिशय कमी होता. भारतात निकोप राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी मुस्लिम

समाज इतर धर्मियाप्रमाणे राष्ट्रीय प्रवाहात सामील झाला पाहिजे. मुस्लिम समाजाला राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी महाराष्ट्रात मुस्लिम सत्यशोधक समाजाची चळवळ सुरू करण्यात आलेली होती.

**२) फाळणी पूर्वीचा भारत-** स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदू-मुस्लिमांच्या एकजुटीतून स्वातंत्र्याचा लढा उभा करण्याचे प्रयत्न केला गेला. उदा. खिलाफत चळवळ यातील काही चळवळी काही यशस्वी झाल्या तर काही अयशस्वी ठरल्या. ब्रिटिशांनी फोडा आणि झोडा या नीतीचा अवलंब करून हिंदू समाजापासून मुस्लिम समाजाला दूर करण्यासाठी मुस्लिम लीगच्या स्थापनेस उत्तेजन दिल. मुस्लिम लीगने धर्माच्या आधारावर भारताची फाळणी करून पाकिस्थान देशाची निर्मिती केली. धर्माच्या आधारावर फाळणी झाल्यामुळे दंगली मोठया प्रमाणावर दंगली होऊन लाखो लोक निर्वासित झाले. फाळणीनंतरही पाकिस्तानपेक्षाही जास्त मुस्लिम भारतात राहतात. हिंदु -मुस्लिमांमध्ये ऐक्य निर्माण करण्यासाठी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही अशा मूलतत्त्वांवर भारतीय समाजाची निर्मिती करण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक चळवळीची निर्मिती जन्माला आलेली आढळते.

**३) समान नागरी कायदयाचा अभाव-** राज्यात शांतता व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी कायद्याची गरज असते. समाज आणि राज्य यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करण्यासाठी समान नागरी कायदाची आवश्यकता असते. राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांत समान नागरी कायद्याचा उल्लेख आहे. भारतात निर्माण होणाऱ्या अनेक जातीय व धार्मिक तणावाच्या प्रमुख कारणापैकी समान नागरी कायदयाचा अभाव हे एक महत्त्वपूर्ण कारण मानले जाते. भारतात समान नागरी कायद्याची निर्मिती होऊन निकोप राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी सत्यशोधक मुस्लिम चळवळीची उदयाला आलेली होती.

**४) उर्दू भाषेचा आग्रह-** भाषा ही विचाराची देवाणघेवाण करण्यासाठी मानवाने निर्माण केलेले साधन आहे. वैचारिक देवाणघेवाण कोणत्या भाषेत चालते याला महत्त्व देण्यापेक्षा संसूचन सुलभ होते किंवा नाही याला जास्त महत्त्व दिले पाहिजे. राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी भाषा हा घटक महत्त्वाचा ठरतो. भारतात काही परंपरावादी मुस्लिमांकडून उर्दू भाषेची मागणी होत होती. उर्दू भाषा ऐतिहासिक व महत्त्वपूर्ण आहे. उर्दू भाषेचे मोठेपण मान्य करून तिचा विकास करणे आवश्यक आहे. उर्दू भाषा केवळ मुस्लिमापुरती मर्यादित न राहता या भाषेचा अभ्यास इतर धर्मियांनी केला पाहिजे. उर्दू भाषाच मुस्लिमांनी शिकावी असा आग्रह धरणे योग्य नाही. मुस्लिमांच्या विकासाचाी कोंडी होऊ शकते याकडे धर्मांध मुस्लिम नेते दुर्लक्ष करणे पसंत करतात. मुस्लिम समाजाच्या विकासासाठी उर्दू भाषेबरोबर प्रादेशिक व राष्ट्रीय भाषेचे ज्ञान मुस्लिमांनी संपादन करावे या मागणीसाठी ही चळवळ निर्माण झाली.

**५) धर्मभोळेपणा वा धर्मांधता -** धर्मामुळे मनुष्य सद्वर्तनी व नितीमान बनतो पण त्याबरोबर धर्माला चिकटून राहिल्यामुळे अनेक रूढी व परंपरा निर्माण होतात. ज्यामुळे समाजात विषमता, शोषण, अन्याय अत्याचार आणि अंधश्रद्धेचे पेव फुटते. मनुष्य मनुष्याचे शोषण करत असल्याने धर्म हा मानवी विकासाच्या मार्गातील मोठा अडथळा बनतो. मुस्लिम धर्मात धर्मांधता आणि शिक्षणाच्या अभावामुळे हे प्रमाण जास्त दिसून येते. मुस्लिम धर्मात चिकित्सेला परवानगी नसल्यामुळे अनेक अनिष्ट रूढी निर्माण झालेल्या दिसतात. म्हणून मुस्लिम धर्माची चिकित्सा करून मूळ धर्माची शिकवण समाजापुढे योग्य त्या स्वरूपात मांडण्यासाठी ही चळवळ निर्माण झाली.

**६) धर्मनिरपेक्षतेचा अभाव-** धर्मनिरपेक्षता म्हणजे इहलौकिक बाबींची धर्मापासून फारकत करणे होय. मुस्लिमांच्या संदर्भात धर्माचे दोन भाग पडतात. आदत या प्रकारात व्यक्तीचा इतर व्यक्तीशी, समाजाशी व देशाशी संबंध असतो. परंतु मुस्लिम समाजात आदत व इबादत यात गल्लत केली गेली. मुस्लिम समाजात व्यक्ती जीवनापेक्षा धर्म वरचढ ठरला. व्यक्तीवर धर्माचे नियंत्रण निर्माण झाले. मुस्लिम व्यक्ती ही पूर्णपणे धर्माच्या अधिन केली जाते. धर्मापासून स्वतंत्र काही असूच शकत नाही. धर्मसोडून विचार करणाऱ्याला नास्तिक ठरविले जाते. या ताठर धर्मभावनेतून मुस्लिम धर्मामध्ये अनेक अंधश्रद्धाचा जन्म झाला. अनेक खूळचट रूढी निर्माण झाल्या आणि त्यांना धर्मांचा एक भाग बनविण्यात आले. त्यातून धर्माचे स्वरूप विकृत होत गेले हे चित्र बदलून मुस्लिम समाजात खऱ्या धर्माचा प्रसार करण्यासाठी आणि धर्माचा व्यक्ती विकासातील अडथळा दूर करण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक चळवळ सुरू करण्यात आली.

**७) सामाजिक प्रबोधनाचा अभाव-** मुस्लिम समाजातील परिवर्तनाच्या अभावामुळे मुस्लिम सत्यशोधक चळवळ उदयास आली. अशिक्षितपणा, रूढी व परंपरेचा प्रभावमुळे मुस्लिम समाजात अनेक रूढी अस्तित्वात आल्या. त्या आज कालबाह्य बनल्या आहेत. उदा.मुस्लिम समाजात पुरूषाला बहुपत्नीत्व विवाहाची संमती आहे. पडदा पद्धती, तलाकपिडीत स्त्रियाचा

प्रश्न या सर्व रूढींना धर्मापेक्षा तात्कालीन समाज परिस्थितीचा आधार होता. युद्धात मरण पावलेल्या विधवाच्या भविष्याची काळजी घेतली जावी. विधवांना सामाजिक प्रतिष्ठा मिळावी म्हणून बहुपत्नीत्वाला मान्यता दिली होती. सद्यकाळात या सर्व प्रथा कशा अयोग्य आहेत हे पटवून देण्याची मुस्लिम समाजाला गरज आहे. म्हणून हे चळवळ महाराष्ट्रात निर्माण झाली.

**८) लोकसंख्या वाढीवर नियंत्रणाचा अभाव-** कुटुंब नियोजनाद्वारे लोकसंख्या नियंत्रण हे इस्लाम धर्मात मान्य असूनही सनातनी मुस्लिम समाजातील अज्ञान व धर्मचिकित्सेचा अभावाचा फायदा घेऊन कुटुंबनियोजनाला धर्माची मान्यता नाही असा प्रचार करतात. वास्तविक इस्लाम धर्म हा पुरोगामी धर्म आहे. तरीही धर्माचा खोटा आधार घेऊन कुटुंबनियोजनाला अडसर निर्माण केल्याने मुस्लिम समाजात मुलामुलींची संख्या अमर्याद झाली. कमविणारा एक आणि खाणारे अनेक असे कौटुंबिक जीवनात असंतुलन निर्माण झाले. त्यातून मुसलमान समाजात आर्थिक मागासलेपण निर्माण झाले. धर्माची मान्यता असूनही धर्मवाद्यांच्या खोटया प्रचाराला बळी पडून आपले कुटुंब वाढवून आर्थिक मागासलेपण मुस्लिम समाज ओढून घेत आहे. कुटुंबनियोजनाला विरोध करणे मुस्लिम समाजाच्या अजिबात हिताचे नाही याची जाणीव करून देण्यासाठी ही चळवळ विकसित झाली.

अशा प्रकारे मुस्लिम समाजात सामाजिक सुधारणा व प्रबोधन घडवून आणण्याच्या व्यापक उद्देशाच्या परीपूर्तीसाठी ही चळवळी सुरू झाली. या चळवळीने अतिशय अल्पकाळात मुस्लिम समाजात प्रबोधनाचे कार्य केले.

**प्र.५ वा. मुस्लिम सत्यशोधक समाजाची उद्दिष्टये व कार्य सांगा?**

मुस्लिम समाजात सुधारणा घडवून आणून समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक समतेची प्रस्थापना करणे. इतर धर्मियांच्या व्यक्तीसोबत समानतेच्या व सद्सद्विवेक बुद्धीच्या आधारावर आधारित असली पाहिजे. त्यासाठी समाजाची चिकित्सा करून प्रबोधन करणे गरजेचे आहे. खोटया परंपरावादाच्या जोखडातून समाजाची सुटका केल्याशिवाय परिवर्तन अशक्य आहे. या धारणेतून मुस्लिम सत्यशोधक समाजाने पुढिल कार्य केलेली आहेत.

**१) स्त्री-पुरूष समानता-** आम्ही सर्व माणसे परमेश्वराची लेकरे आहोत व समानतेच्या विचाराला आम्ही मान्यता दिली आहे. पण ही वास्तविकता समाजात रूजली नाही. व्यावहारिक पातळीवर अनेक वर्णभेद आम्ही जोपासले आहेत. मुस्लिम समाजात धर्माचा आधार घेऊन स्त्रीवर अनेक निर्बंध टाकून त्यांचे स्वातंत्र्य मर्यादित केलेले दिसून येते. उदा.मुस्लिम समाजात तलाकचा संपूर्ण अधिकार पुरूषाच देण्यात आला आहे. स्त्रियांनी चूल व मूल हे कार्यक्षेत्र मानले गेले. बुरखा पद्धतीमुळे स्त्रियांना साधा जगण्याचा अधिकार देखील नाकारला गेला. ही विषमता संपूर्ण मानवी समाजाच्या विकासात अडथळा निर्माण करते हे मुस्लिम सत्यशोधक समाजाने पटवून दिले. स्त्री-पुरूष समानता निर्माण करण्यासाठी जबानी तलाकवर बंदी, तलाकपिडीत स्त्रीयांना पोटगी, सवतबंदी, तलाकपिडीत महिलांचे पुनवर्सन इ. मागण्या वेळावेळी करून स्त्री पुरूष समानतेचा आग्रह चळवळीने धरला.

**२) समान नागरी कायदा-** भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांत समान नागरी कायदयाचा उल्लेख आहे पण प्रत्यक्ष व्यवहारात हा कायदा अस्तित्वात येऊ शकला नाही. भारतात वारसा हक्क, विवाह, घटस्फोट इ बाबतचे कायदे धर्मावर आधारित असल्याने सर्व धर्मियासाठी अलग अलग कायदे आहेत. धर्मावर आधारित कायदेमुळे धर्माधर्मात द्वेष व तणावाचे वातावरण निर्माण होते. धर्माच्या आधारावर स्त्रियांवर अन्याय होतो म्हणून मुस्लिम सत्यशोधक मंडळाने समान नागरी कायद्याची मागणी केली व त्यासाठी महाराष्ट्र विधिमंडळावर मोर्चा काढला.

**३) धर्मनिरपेक्षता-**४२ व्या घटनादुरूस्तीनुसार धर्मनिरपेक्षता हा शब्द भारतीय राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आला. धर्मनिरपेक्षता म्हणजे प्रत्येक व्यक्तीला आपल्या धर्माप्रमाणे आचरण करण्याचा व प्रचार करण्याचा अधिकार आहे. मात्र दुसऱ्या धर्मावर टीका करू नये. आपल्या धर्म स्वातंत्र्याचा उपभोग घेत असतांना दुसऱ्याच्या धर्म स्वातंत्र्याला बाधा येणार नाही. या मर्यादेपर्यंत प्रत्येकाला व्यक्तिगत पातळीवर धर्मस्वातंत्र्य आहे ही भूमिका मुस्लिम सत्यशोधक मंडळाची आहे. निकोप समताप्रधान मानवी जीवन निर्माण करण्यासाठी ही चळवळ धर्मनिरपेक्षतेचा समर्थन करते.

**४) मुस्लिम समाजात शैक्षणिक व वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे-** मुस्लिम समाज शिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे या समाजात अनेक समस्या निर्माण झाल्या. उदा. आर्थिक दारिद्रय, शैक्षणिक मागासलेपणा या सर्व समस्या नष्ट करून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व वैज्ञानिक विकास घडवून आणून मुस्लिम समाजाला अंधश्रद्धेपासून मुक्त करण्याची गरज आहे. म्हणून मुस्लिम समाजात शिक्षणाचा प्रसार करून वैज्ञानिक व आधुनिक दृष्टिकोन निर्माण करून परिवर्तन घडवून

आणण्याचा मुस्लिम सत्यशोधक समाजाचा उद्देश आहे. त्यासाठी मंडळाने कोल्हापूर येथे मुस्लिम शिक्षण परिषद घेऊन मुस्लिम समाजात शिक्षण प्रसारासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले.

**५) मुस्लिम समाजाचे कल्याण साधने-** बंदिस्त व कट्टर धर्म चौकटीमुळे मुस्लिम समाज उदारमतवादी विचारापासून दूर गेला. आत्मनिरीक्षणाच्या अभावामुळे मुस्लिम समाजात दारिद्रय व इतर अनेक समस्या निर्माण झाल्या. धार्मिकतेमुळे समाजाच्या आर्थिक व सामाजिक विकासात अडसर निर्माण झाला. मुस्लिम समाजाचे कल्याण साधण्यासाठी धर्मातंर्गत सुधारणेबरोबर आर्थिक व शैक्षणिक विकास घडवून आणून त्या समाजाला सांप्रदायिकतेच्या जोखडातून मुक्त करण्याची गरज आहे. त्यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळ लोकशाही समाजवादी मूल्ये, धर्मातील इहवाद व विज्ञानवादाच्या सहाय्याने मुस्लिम समाजाचे कल्याण साधू इच्छीतो.

**६) इस्लामचे सार समाजात प्रस्थापित करणे-** इस्लाम धर्म हा जगात अतिशय पुरोगामी व उच्च धर्म आहे. जो मनुष्याला जातीला जगाशी कसे संबंध ठेवावेत याबद्दल मार्गदर्शन करतो. परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. प्रत्येक धर्म काळाप्रमाणे बदलत आहे. इस्लाम धर्म कालामानानुसार सामाजिक विकासासाठी प्रत्येकाला बदल करण्याची परवानगी देतो. सर्व पश्चिमी मुस्लिम देशानी नवीन पुरोगामी जीवनशैली स्वीकारून आपला विकास घडवून आणलेला आहे. उदा.तुर्कस्थान भारतातही मुस्लिम सत्यशोधक मंडळाने धार्मिक मूलतत्त्वांची काळाप्रमाणे पुर्नस्थापना करून समाजाची प्रगती साध्य करण्यासाठी इस्लामचे खरे सार समाजात प्रस्थापित करण्यासाठी ही चळवळीने कार्य केले.

**७) प्रादेशिक भाषेतून शिक्षण व रूढींचा नाश-** मुस्लिम समाजातील परंपरावादी उर्दू भाषेतून शिक्षणाचा आग्रह धरतात. उर्दू भाषेतून शिक्षण घेतल्यामुळे मुस्लिम समाजातील सुशिक्षित तरूणांना नोकऱ्या मिळत नाही. याऐवजी प्रादेशिक भाषेत वा राष्ट्रभाषेत शिक्षण घेतल्यास नोकरी व व्यवसायाची जास्त संधी मिळू शकते. म्हणून उर्दू भाषेतून शिक्षणाची सक्ती नसावी. मुस्लिम तरूणांना उर्दू सोबत प्रादेशिक भाषेचे शिक्षण देणे गरजेचे आहे तसेच मुस्लिम समाजात बहुपत्नीत्वाच्या पद्धतीवर बंदी लादणे, जबानी तलाकवर बंदी, मुस्लिमांनी लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी कुटुंबनियोजनाचा पुरस्कार करणे इ. कार्यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली आहे.

अशा प्रकारे मुस्लिम समाजात परिवर्तनवादी विचारांचे बीजारोपण करण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. या समाजाने मुस्लिम समाजात प्रबोधनाचे नवे युग निर्मितीचा प्रयत्न केला.

**टिप- हमीद दलवाईचे कार्य-**

हिंदू धर्मात राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, आगरकर, न्या.रानडे अशा अनेक धर्मसुधारकांची धर्म चिकित्सा करण्याची दीर्घ परंपरा दिसून येते. मात्र इस्लाम धर्मात धर्मसुधारणा चळवळीची परंपरा दिसून येत नाही. मौलाना आझाद, हनीफ अहमद, डॉ.झाकिर हुसेन यांनी धर्मसुधारणेचा प्रयत्न केला. मुस्लिम धर्मातील अंधश्रद्धा निर्मूलन करून त्यांचे सामाजिक व शैक्षणिक प्रबोधन घडवून आणण्यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना हमीद दलवाई २२ मार्च १९७० मध्ये पुणे येथे स्थापना केली. त्यांना डॉ.बाबा आढाव, भाई वैद्य, अ.शि.शहा. इत्यादी मंडळीचे सहकार्य मिळाले. ही चळवळ भारतातील नव्हे तर मुस्लिम जगतातील प्रथम चळवळ मानली जाते. हमीद दलवाई यांनी लाट हा कथा संग्रह, इंधन ही कादंबरी, मुस्लिम जातिचे स्वरूप कारणे व उपाय, इस्लामचे भारतीयचित्र मुस्लिम पॉलिटिक्स इन सेक्युलर इंडिया इत्यादी वैचारिक ग्रंथ लिहिले. याशिवाय विविध वर्तमानपत्रे, नियतकालिके, मासिके यात वैचारिक लेखन करून मुस्लिम समाजाचे वैचारिक प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. १९६८ नंतर समाजसुधारणेचे पूर्ववेळ कार्य करण्यासाठी नोकरी देखील सोडली. अ.भि.शहासोबत 'इंडियन सेक्यूलर सोसायटी' स्थापन केली. त्या कार्यातून मुस्लिम सत्यशोधक समाज स्थापनाची प्रेरणा मिळाली.

हमीद दलवाईना मुस्लिम समाजात समाजसुधारणा करण्याच्या ध्यासाने पछाडलेले होते. आजारपणाची दोन वर्ष सोडली तर आठ-दहा वर्ष त्यांना काम करण्यास मिळाले. या अल्पावधीत त्यांनी मुस्लिम समाजाला हादरा देऊन जागतिक इस्लामच्या इतिहासातील क्रांतिकारी चळवळ सुरू केली. १९६६ ते १९७७ या काळात भारतभर दौरे केले. सभा,संमेलने, परिषदा, मोर्चे यांच्या माध्यमातून मुस्लिम समाजात जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. या कार्यात अ.भि.शहा, नरहर कुंदरकर, डॉ.मोईन शाकिर, प्रा. ए.जी.फौजी, अन्वर शेख, अशीर तांबोळी याचे सहकार्य मिळाले. त्यांनी आपली भूमिका लोकांना पटवून देण्यासाठी अनेक आंदोलने केली. या मंडळामार्फत मुस्लिम स्त्रियाचा मोर्चा विधानसभेवर नेला. हिंदू-मुस्लिम

संबंध दृढ करण्यासाठी त्यांनी धर्मनिरपेक्ष मंडळाची स्थापना केली पण समाजाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यांनी आपली भूमिका पुस्तकांत न ठेवता लोकांपर्यंत पोहोचविली. मुस्लिम समाजाला समाजसुधारणा मान्य नव्हती. महम्मद पैगंबर हा अल्लाचा दूत असून त्यांच्यामार्फत अल्लाने कुराणाची शिकवण माणसाला दिली. त्यात बदल करण्याचा अधिकार कोणालाही नाही. या इस्लामच्या भूमिकेला १३०० वर्षाच्या इस्लामच्या इतिहासात कोणीही जाहीर आवाहन दिले नव्हते. पण दलवाईनी महम्मद पैगंबर देवाचा अंश नसून माणूस आहे. त्यांनी समाजात सुधारणा करण्यासाठी कुराण ग्रंथ लिहीला. त्या काळात कुराणातील नियम आवश्यक असले तरी बदलत्या परिस्थितीनुसार त्या नियमात बदल झाला पाहिजे ही दलवाईची विचारसरणी होती. कुराणातील काही नियम चुकीचे नियम तत्त्वावर आहेत ते रद्द करावेत ही भूमिका घेतल्यामुळे इस्लामी जगात खळबळ उडाली. दलवाईनी समान नागरी कायद्याची मागणी करण्यासाठी मोर्चा काढला. हा इस्लाम इतिहासात स्त्रियांना काढलेला पहिला मोर्चा होता. दलवाईनी पुण्यात मुस्लिम महिला परिषद घेतली. या परिषदेत अनेक मुस्लिम महिलांनी सहभाग घेतला. मुस्लिम समाजाला शिक्षणाचे महत्व पटवून देण्यासाठी कोल्हापूर येथे शिक्षण परिषद घेतली. सय्यद शाईच्या नेतृत्वाखाली जेहाद-ए-तलाक चळवळी तसेच १९७६ मध्ये अमेरिकेत भरलेल्या 'वर्ल्ड युनिटी कॉन्फरन्स' ला हजर राहिले. हमीद दलवाईनी मुस्लिन पर्सनल कायदा रद्द करावा ही मागणी केली.

हमीद दलवाई यांनी तलाक बंदी, जबानी तलाक बंदी,मुस्लिम स्त्रियांना पोटगीचा अधिकार, घटस्फोटीत स्त्रियाचे पुर्नवर्सन, मुस्लिम समाजात शिक्षण प्रसार इ. क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. वक्फ या मुस्लिम धार्मिक इस्टेटीच्या चौकशीची मागणी केली. या इस्टेटीचा विनियोग गरीब मुलाच्या शिक्षणासाठी करावा. उर्दू माध्यमाच्या शाळा बंद करून ही भाषा ऐच्छिक विषय म्हणून शिकवावी. अशा क्रांतिकारी मागण्या त्यांनी केल्या. सत्यशोधक मंडळाच्या महाराष्ट्रातील अनेक शहरात शाखा सुरू केल्या. त्यांनी सत्यशोधक मंडळामार्फत अनेक शाळा सुरू केल्या. मुस्लिम स्त्रियांना समान हक्क मिळावे. प्रादेशिक भाषेतून शिक्षण मुस्लिम मिळावे म्हणून प्रयत्न केले. महात्मा ज्योतिबा फुल्यांना विद्वान समाजाकडून उपहास आणि उपेक्षाची सहन करावी लागली. फुल्यांपेक्षाही जास्त उपेक्षा हमीद दलवाईची केली गेली. धर्मचिकित्सा आणि धर्मसुधारणेच्या विरोध असलेल्या इस्लाम धर्मात सुधारणेचा खडतर मार्ग हमीद दलवाईनी प्रशस्त केला. आपले विचार लोकांपर्यत पोहचविण्यासाठी इतरांच्या सहकार्याने सेक्युलर फोरम स्थापन करून सेक्युलॅरिस्ट हे नियतकालिक काढले. त्यांच्या कार्याने मुस्लिम समाजात गदारोळ माजला. धर्मात ढवळाढवळ करण्याचा अधिकार कोणालाही नाही. शरियत हा ईश्वरी कायदा असून त्यात बदल करण्याचा कोणालाही अधिकार नाही. या कायद्यात आणि कुराणात काळाप्रमाणे बदलण्याचा आग्रह धरणारे हमीद दलवाई मुस्लिम समाजातील क्रांतिकारी वा बंडखोर समाजसुधारक म्हणून ओळखले जाऊ लागले.

**अपेक्षित वस्तूनिष्ठ वा एका वाक्यातील प्रश्नोत्तरे**

१. सत्यशोधक समाजाची दोन तत्त्वे सांगा.
उत्तर- ईश्वर एक असून तो निर्गुण व निराकार आहे, सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे आहेत, परमेश्वराची भक्ती करण्याचा अधिकार प्रत्येक मानवाला आहे, परमेश्वराची भक्ती करण्यासाठी भट वा पुरोहिताची गरज नाही ही सत्यशोधक समाजाची मुख्य तत्त्वे आहेत.

२. सत्यशोधक समाजाच्या चळवळीची स्थापना कोणी व केव्हा केली?
उत्तर- सत्यशोधक समाज चळवळीची स्थापना महात्मा फुलेनी २५ सप्टेंबर १८७३ ला पुणे या ठिकाणी केली.

३. मुस्लिम सत्यशोधक चळवळीची स्थापना कोणी व केव्हा केली?
उत्तर- मुस्लिम सत्यशोधक चळवळीची स्थापना हमीद दलवाईनी २२ मार्च १९७० ला महाराष्ट्रात पुणे येथे केली.

४. मुस्लिम सत्यशोधक समाजाची उद्दिष्टये सांगा.
उत्तर- मुस्लिम समाजात शैक्षणिक व वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे, इस्लामचे सार समाजात प्रस्थापित करणे, मुस्लिम समाजाचे कल्याण साधने आणि समान नागरी कायदा करणे हे मुस्लिम समाजाची उद्दिष्टये आहेत.

५. महात्मा फुलेंनी लिहिलेल्या दोन ग्रंथांची कोणते?
उत्तर- गुलामगिरी, सार्वजनिक सत्यधर्म, शेतकऱ्यांचा आसूड, तृतीय रत्न हे ग्रंथ फुल्यांनी लिहिले होते.

६. महात्मा फुलेनंतर सत्यशोधक चळवळीत कार्य करणाऱ्या दोन नेत्याची नांवे सांगा.
उत्तर- शाहू महाराज, शंकरराव मोरे, केशवराव जेधे, भास्करराव जाधव, पिराजीराव रावनाईक, कृष्णराव भालेराव, डॉ. विश्राम घोले, डॉ. संमुजी लाड, रायभान जाधव, भास्कर जाधव हे प्रमुख नेते होय.

७. हमीद दलवाई यांनी कोणते ग्रंथ लिहिले ते सांगा.
उत्तर- हमीद दलवाई यांनी लाट हा कथा संग्रह, इंधन ही कादंबरी, मुस्लिम जातिचे स्वरूप कारणे व उपाय, इस्लामचे भारतीयचित्र मुस्लिम पॉलिटिक्स इन सेक्युलर इंडिया इत्यादी वैचारिक ग्रंथ लिहिले.

८. मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापनेचे दोन उद्देश कोणते?
उत्तर- मुस्लिम समाजातील अलगतावादी प्रवृत्ती, अनिष्ट रूढी व प्रथा नष्ट करणे, मुस्लिम समाजाचे प्रबोधन घडवून आणणे, मुस्लिम समाजात इहवादी जीवन मूल्ये आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे हे मुस्लिम सत्यशोधक समाजाची उद्देश होते.

९. सत्यशोधक चळवळीचे महाराष्ट्रावर झालेले दोन परिणाम लिहा.
उत्तर- बहुजन समाजात नेतृत्वाचा उदय, दलित चळवळ व साहित्याची निर्मिती, शैक्षणिक सुधारण, मुस्लिम सत्यशोधक चळवळीला चालना इत्यादी परिणाम झालेले दिसतात.

१०. मुस्लिम स्त्रियाचे प्रमुख दोन प्रश्न कोणते?
उत्तर- तलाकचा प्रश्न, पडदा पद्धत, बहुपत्नीत्वाची पद्धत, पोटगीचा प्रश्न हे मुस्लिम स्त्रियाचे प्रमुख प्रश्न मानता येतील.

११. महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या दोन संस्थाची कोणत्या?
उत्तर- सत्यशोधक समाज, बालहत्या प्रतिबंधक गृह, मुली व अस्पृश्यासाठी शाळा, मंडळी इत्यादी संस्थाची स्थापना केली.

१२. महात्मा फुले यांच्या दोन सहकाऱ्याची नावे लिहा.
उत्तर- कृष्णराव भालेकर, डॉ.विश्राम रामजी घाले, डॉ.संमुजी लाड, सावळाराम घोलप, सावित्री फुले इत्यादी फुल्यांची सहकारी होते.

## प्रकरण २ रे
## दलित चळवळ

**प्र. १ ला. दलित चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद करा?**

भारतीय समाजात अनेक अनिष्ट रूढया आहेत. अस्पृश्यता या रूढीपैकी एक महत्त्वपूर्ण रूढी मानली जाते. या रूढीमुळे मानवी मूल्यांचे अवमूल्यन झाले. माणूस म्हणून जगण्याचा नैसर्गिक हक्क देखील अस्पृश्यतेमुळे नाकारला गेला. भारतात जातीव्यवस्था आणि चार्तुवर्ण्य पद्धतीतून अस्पृश्यतेचा उदय झालेला आहे. चार्तुवर्ण्य व्यवस्थेतूच्या श्रमविभागणीतून ब्राह्मण, क्षत्रिण आणि वैश्य या तीनही वर्गाची सेवा करण्यासाठी शूद वर्गाची निर्मिती करण्यात आली. सुरूवातीला गुणानुसार वर्ग निश्चित केला जात असे कालातंराने जन्मावर आधारित वर्गाची निश्चिती होऊ लागल्यामुळे वर्गव्यवस्थेचे जातीव्यवस्थेत रूपांतर झाले. जात ही जन्मावर आधारावर ठरल असल्याने जात बदलण्याचा प्रश्नच नव्हता. तसेच सर्व जातींना समाज दर्जा नसल्यामुळे समाज एकसंघ न राहिला नाही. जन्मावर आधारित व्यवसाय वाटपाच्या सूत्रामुळे कनिष्ठ जातींना ज्ञान संपादन, व्यापार इत्यादीचा अधिकार राहिला नाही. त्यामुळे जातीजातीतील देवाणघेवाणही ठप्प झाली. रोटी बंदी आणि बेटी बंदीमुळे समाजास बंदिस्त वर्गाचे स्वरूप लाभले. जातीव्यवस्थेमुळे बहुसंख्य समाज ज्ञानापासून वंचित राहिल्यामुळे धर्मग्रंथ पवित्र आहेत त्यात सांगितलेल्या गोष्टी सत्य आहेत ही श्रद्धा दृढ झाल्यामुळे जातीव्यवस्थेला विरोध करणारा पाखंडी ठरला. मनुस्मृती सारख्या ग्रंथानी जातिव्यवस्थेला नियमबद्ध केले. जाती भंग करणाऱ्याना कठोर शिक्षा सांगितल्या. कनिष्ठ जाती आणि स्त्रियाशी कठोर व्यवहार करण्यास मोकळीक दिली. त्यामुळे कनिष्ठ जातींना अमानुष वागणुक देण्यास सुरूवात झाली आणि त्यातून अस्पृश्यतेसारखी अमानुष रूढी निर्माण झाली. अस्पृश्यांच्या स्पर्शापासून विटाळ, सार्वजनिक ठिकाणी प्रवेशबंदी, मंदिरामध्ये प्रवेश बंदी, ज्ञान व शस्त्र धारण करण्यास बंदी, गावात निवासास बंदी इत्यादी बंधनामुळे अस्पृश्य समाज इतर समाजापासून पूर्णपणे अलग पडला. त्यांना साधे माणुसकीचे हक्क ही नाकारण्यात आहे.

भारतात अस्पृश्यतेची रूढी अत्यंत प्राचीन असून या रूढीला प्राचीन काळापासून विरोध झालेला दिसून येतो. भारतात वैदिक परंपरा आणि अवैदिक परंपरा या दोन परंपरा आहेत. वैदिक परंपरा अस्पृश्यतेच्या उगमाला मान्यता देणारी परंपरा मानली जाते. मात्र अवैदिक परंपरेचा आधार समानता असल्याने त्यांनी अस्पृश्यतेला विरोध केलेला दिसतो. त्यात चार्वाक, शून्यवादी, सांख्यवादी, जैन तत्त्वज्ञान, बौद्ध तत्त्वज्ञान, रामानुचार्य, मध्वाचार्य, वल्लभचार्य यांनी वैदिक परंपरेला विरोध करून समानता हे तत्त्व मांडून अस्पृश्यतेला विरोध केला. मध्ययुगात रामानंद, चैतन्य महाप्रभू महानुभव पंथ, कबीर, भागवत धर्मातील ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, चोखामेळा, गोरा कुंभार, सेना न्हावी, रविदास, नरसी मेहता, मीराबाई आणि नानक या संतांनी अस्पृश्यतेला विरोध केला. जातीवाद कठोर प्रहार केला. सर्व मानव ईश्वराची अपत्ये असल्याने समान आहेत हा विचार मांडला. कर्नाटकात संत बसवेश्वर महाराज, आणि महानुभव पंथातील चक्रधर स्वामींनी जातीव्यवस्था नाकारली. मात्र प्राचीन व मध्ययुगीन काळात जातीव्यवस्था नाकारण्याचे प्रयत्न फारसे यशस्वी झाले नाहीत. गौतम बुद्ध आणि महावीराचा अपवाद वगळता इतर पंथांच्या कार्यास समता निर्मितीत अल्पप्रमाणात यश मिळाले. वारकरी व भागवत पंथ फक्त अध्यात्मिक क्षेत्रापुरता समतेचा पुरस्कार करीत होते. मध्ययुगातील समता निर्मिती अध्यात्मिक कारणासाठी झालेली दिसते. त्याला काही अंशी राजकीय परिस्थिती कारणीभूत मानली जाते. मात्र ही समता निर्मितीचे प्रयत्न अत्यंत तोकडे वा मर्यादित होते.

ब्रिटिशाच्या आगमन आणि साम्राज्य स्थापनेतून भारतीय समाजात आमुलाग्र बदल झालेले दिसतात. ब्रिटिश राजवटीच्या काळात सर्वांना मिळालेला शिक्षणाचा अधिकार आणि त्यांनी लष्करात मोठया प्रमाणात अस्पृश्य समाजाची केलेली भरतीतून समाजात जागृतीला प्रारंभ झाला. पेशवाईच्या अत्याचारातून सुटका करून घेण्यासाठी कोरेगावच्या लढाईतील अस्पृश्यांनी प्राणाची बाजी लावून इंग्रजांना विजय मिळवून दिला. अस्पृश्याच्या लढाऊ वृत्तीमुळे त्यांना इंग्रजांनी मोठया प्रमाणात सैन्यात प्रवेश दिला. सैन्यातील नोकरीमुळे या समाजाला आर्थिक स्थैर्य, शिक्षणाची संधी चालून आली. तसेच ब्रिटिशाच्या आगमनामुळे मोठया प्रमाणात भारतात ख्रिश्चन मिशनरी येऊ लागले त्यांनी ख्रिश्चन धर्मातील समता तत्त्वाचा प्रचार व प्रसार सुरू केला. कनिष्ठ वर्गातील अनेक लोकांना या तत्त्वामुळे मुक्तीची आशा वाटू लागल्याने त्यांनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. ब्रिटिशांनी सुरू केलेल्या शाळामधून सर्व जातीधर्माचे लोक शिकू लागल्यामुळे अस्पृश्यता व

जातीव्यवस्थेच्या प्रश्नावर विचार होऊ लागला. ब्रिटिश शिक्षण पद्धतीतून महात्मा फुले, शाहू महाराज, दलित समाजातील काही समाजसुधारक, डॉ. बाबासाहेब आंबेडकरासारखे विचारवंत निर्माण झाले. त्यांनी अस्पृश्यतेसारख्या अमानुष रूढीविरूद्ध जनजागृती करून ही रूढी नष्ट करण्यासाठी आंदोलने वा चळवळी सुरू केल्या आणि चळवळीच्या दडपणातून ब्रिटिशांनी अस्पृश्यता निवारणासाठी कायदे केले. अस्पृश्यांना विविध क्षेत्रात प्रतिनिधित्व दिले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय राज्यघटनेने अस्पृश्यता पाळणे कायदयाने गुन्हा आहे ही तरतूद करून या रूढीला कायमची मूठमाती दिली.

अशा प्रकारे वैदिक काळापासून तर घटनाच्या निर्मितीपर्यंत जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी थोडक्यात सांगता येते.

**प्र.२ ला. दलित चळवळी म्हणजे काय ते सांगुन दलित चळवळीच्या उदयाची कारणे स्पष्ट करा?**

**दलित चळवळीची व्याख्या व अर्थ-** दलित चळवळी ही प्रामुख्याने पद्दलित, अस्पृश्य व हरिजनांची चळवळ आहे. या वर्गावर झालेल्या अन्यायातून ही चळवळ उभी राहिलेली दिसते. दलित हा शब्द चार्तुवर्णाशी निगडीत आहे. चार्तुवर्णरूपी जात्यात भरडले गेलेले, चिरडले गेलेले वा दळले गेलेले किंवा जात असलेले सर्व दलित म्हणजे दळण-दळित= दलित अशी दलित शब्दाची व्युत्पत्ती सांगता येते. हा शब्दप्रयोग शब्दप्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांनी उपयोगात आणला होत.

१) **डॉ. म.ना.वानखेडे-** यांच्या मते दलित म्हणजे केवळ नव बौद्ध अथवा मागासवर्गीय नव्हे तर जे पिळले, छळले गेलेले, सर्व श्रमजीवी आहेत ते सर्व दलित आहेत.

२) **डॉ. गो.म.कुलकर्णी-** यांच्या मते तळागाळात रुतून बसलेला सर्वच उपेक्षित समाज म्हणजे दलित समाज होय

३) **लक्ष्मणशास्त्री जोशी-** यांच्या मते मानवी प्रगतीत सर्वात मागे राहिलेला, रेटलेला, सामाजिक वर्ग म्हणजे दलित होय.

वरील व्याख्यानुसार सामाजिक, आर्थिक तसेच सांस्कृतिकदृष्टया शोषित पिडीत असणाऱ्या सर्व समाजघटकांचा अंर्तभाव दलित समाजात करता येतो. दलित चळवळ ही स्वातंत्र्यपूर्व काळातील हरिजनांची चळवळ होती. या चळवळीची व्याख्या पुढील प्रमाणे होत.

१) **मार्क्सवादी विचारवंताच्या मते-** दलित चळवळ म्हणजे भारतातील जातिविरहीत समाजाची रचना प्रस्थापित करणारी चळवळ होय.

२) **एन.त्रिपाठी-** यांच्या मते, समाजातील दबाब व नियंत्रण यापासून मुक्त व्हावे म्हणून जो सतत मार्ग शोधता त्या विषयीची चळवळ म्हणजे दलित चळवळ होय.

३) **न्यु कास-** यांच्या मते, जातिच्या ऐतिहासिक प्रभुत्वांच्या विरोधात उभी राहणारी, सामाजिक न्याय प्रस्थापित करणारी, नवीन साहित्य संस्कृती, नवीन बांधिलकी निर्माण करणारी चळवळ म्हणजे दलित चळवळ होय

भारतीय समाजात वर्ण व्यवस्था अस्तित्वात होती. या व्यवस्थेत सर्वात शेवटचा वर्ग हा शूद्र वर्ग होता. या वर्गावर होणाऱ्या अन्याय वा अत्याचाराविरूद्ध जी चळवळ उभी राहिली तिलाच दलित चळवळ असे म्हटले जाते. १९ व्या शतकातील ऐहिक निष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्य व समानता मूल्य प्रमाण मानून समाजातील सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या वर्गांनी समाज परिवर्तनासाठी सुरू केलेली चळवळी म्हणून या चळवळी विचार करता येतो. या चळवळीच्या माध्यमातून दलित वर्गाचा उद्धार करणे हीच प्रमुख भूमिका होती. महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाजाप्रमाणेच दलित चळवळ महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात स्थित्यंतर घडवून आणण्यात महत्वपूर्ण मानली जाते. दलित चळवळीच्या उदयाची कारणे पुढीलप्रमाणे

**१) तात्कालीन समाजाची परिस्थिती -** तात्कालीन समाजात वर्ण व्यवस्था अस्तित्वात होती. समाजाचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद असे चार वर्गात विभाजन झाले हाते. त्यातील शेवटचा वर्ण शूद्र होता. या वर्णव्यवस्थेतून सामाजिक विषमता निर्माण करणारी व्यवस्था निर्माण केली. या वर्ण व्यवस्थेने कनिष्ठ वर्गावर अनेक बंधने लादली होती. यात एका वर्णाने दुसऱ्या वर्णाचा व्यवसाय करण्यात बंदी होती. व्यवसाय व विवाह वर्णात करावा ही बंधने होती. शेवटचा वर्ण शूद हा अस्पृश्य मानला जात असे त्याला कोणतेही सामाजिक व धार्मिक अधिकार नव्हते. अस्पृश्यांना गावात फिरणे, सार्वजनिक विहीरी व तलावाचा वापर करणे, मंदिरात प्रवेश करणे यावर बंदी लादलेली होती तसेच संपत्ती, ज्ञान, चांगले व्यवसाय आणि

शिक्षणापासून या समाजाला दूर ठेवलेले होते. अशा या अन्यायकारक परिस्थितीचा विरूद्ध दलित समाजाची चळवळ उभी राहिली.

**३) पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार -** ब्रिटिशांनी शासन चालविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कारकून वर्गाच्या निर्मितीसाठी भारतात शिक्षणाची सोय केली. इंग्रजी शिक्षण हे आधुनिक जगात प्रवेश करण्यासाठी आवश्यक मार्ग होता. भारतातील तरूण वर्ग या शिक्षणाकडे आकर्षित झाला होता. या शिक्षणातून भारतीयांना आपल्या हक्कांची व कर्तव्याची जाणीव होऊ लागली. ब्रिटिशांनी सर्वासाठी शिक्षण या धोरणामुळे समाजव्यवस्थेने नाकारलेल्या दलितांनाही शिक्षणाची संधी मिळाली आणि या शिक्षणातून आपल्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराची जाणीव दलित समाजाला झाली. त्यामुळे दलित समाज एकत्र येऊन अन्याय अत्याचाराला विरोध करू लागले. याचा अर्थ पाश्चिमात्य शिक्षणामुळे दलित चळवळीची पार्श्वभूमी तयार झाली.

**४) ब्रिटिश राजवटीचा परिणाम -** महाराष्ट्रातील महार समाज सैन्यात मोठया प्रमाणात होता. त्यांच्या अंगात लढाऊपणाची कल्पना कंपनी सरकारला असल्याने पेशवाईचा पराभव करण्यासाठी त्यांनी या समाजाचा उपयोग केला. ब्रिटिश सैन्यात महार समाजाची भरती मोठया प्रमाणात झाली. सैन्यातील नोकरीमुळे त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे थोडीफार सुधारणा झाली. ग्रामिण व्यवस्थेशी जोडलेला हा समाज सैन्यातील शिस्त, लढाऊ वृत्ती याचा परिणाम या समाजावर झाला. महायुद्ध काळात ब्रिटिश सरकारला मोठे सैन्य उभारणे आवश्यक होते. अशा वेळी भारतातील दलित समाजाचा यात मोठा भरणा करण्यात आला. महायुद्धाच्या निमित्ताने दलित लोकांना परदेशात जावे लागते. तेथील संस्कृती, ज्ञान, आचार विचार, राहणीमान याची माहिती झाली. भारतात परत येऊन आपल्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी त्यांनी संघर्ष सुरू केला. ब्रिटिश राजवटीच्या प्रभावामुळे दलित चळवळीचा उदय झाला.

**५) सुशिक्षित मध्यम वर्गाचा उदय-** इंग्रजी शिक्षण हे आधुनिक युगामध्ये प्रवेश देणारे द्वार आहे. सुरूवातीला ब्राह्मण वर्गानी या शिक्षणाचा फायदा उचलून ब्रिटिश सरकारच्या पदरी नोकऱ्या मिळविल्या. या वर्गाचे अनुकरण करून ब्रिटिश सरकारने चालविलेल्या शिक्षण संस्थेतून बहुजन समाज सुशिक्षित होऊ लागला. या बहुजन समाजाने ब्राह्मणेतर चळवळ सुरू केली. या बहुजन समाजातील नेत्यांनी दलित समाजातील लोकांना शिक्षण देण्याची संधी उपलब्ध करून दिली. दलित समाजातील तरूणांनी शिक्षणाचा फायदा घेऊन ब्रिटिश सरकारशी संघर्ष करून सवलती व नोकऱ्या मिळवल्या. त्या शिक्षण प्रसारामुळे नवीन मध्यम वर्गाचा उदय झाला. स्वातंत्र्योत्तर काळात मध्यम वर्गाच्या लोकांनी संख्या वाढत गेली आणि त्यामुळे जातीयतेच्या भिंती कोसळू लागल्या. या मध्यम वर्गान दलित चळवळीला प्रारंभ केला.

**६) समाज सुधारकांचे कार्य -** इंग्रजी शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या तरूणांना आपल्या समाजातील दोष वाईट रूढी, परंपरा याचा तिरस्कार वाढू लागला. ते दोष दूर करण्यासाठी महाराष्ट्रात अनेक समाजसुधारक पुढे आले. त्यात महात्मा फुले, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, न्या.रानडे, आगरकर, गोपाळ कृष्ण गोखले, विठ्ठल रामजी शिंदे इ.समाजसुधारकांची नांवे सांगता येतात. या सर्व समाज सुधारकांनी जे कार्य केले त्यातून दलित चळवळीच्या उदयाची पार्श्वभूमी तयार केली.

**७) बाह्मणाचे वर्चस्व-** समाजातील निरनिराळया जातींमध्ये बाह्मणांना सर्वोच्च स्थान प्राप्त झाले होते. उत्तर पेशवाई काळात बाह्मणाचे प्रस्थापित झाले होते. त्यांना अनेक प्रकारचे विशेषाधिकार बहाल केले गेले. शिक्षण व ज्ञानदानाचा अधिकार बाह्मणांना होता. सामाजिक क्षेत्रात आणि शासनव्यवस्थेत उच्च पदे फक्त बाह्मण वर्गांना दिली जात होती. समाजातील सर्व मानाचया पदावर बाह्मणाची मक्तेदारी निर्माण झाली. या मक्तेदारीच्या जोरावर हा वर्ग इतर वर्गांना विशेषतः शूद वर्गाची मोठया प्रमाणावर पिळवणुक करत होता. बाह्मण वर्गाकडून केल्या जाणाऱ्या पिळवणुक आणि अन्याय अत्याचाराला विरोध करण्यासाठी दलित चळवळी सुरू करण्यात आली.

**प्र.२ वा. डॉ. आंबेडकर यांच्या पूर्वी दलित चळवळीच्या कार्याचे स्वरूप वा विकास स्पष्ट करा?**

दलित चळवळीच्या कार्याचा विचार करतांना तिचा प्रारंभ १८५२ पासून लक्षात घेतला तर जवळ-जवळ १४० वर्षापासून चालत आलेल्या दलित चळवळीचे चार टप्पे दिसतात. त्यातील आंबेडकर पूर्व दलित चळवळीचे दोन टप्पे सांगता येतात. पहिल्या टप्प्यात १८५० ते १९०० पर्यंतचा पहिला कालखंड महात्मा फुले आणि इतर समकालीन दलितेतर समाजसुधारकांनी दलिताचे शोषणापासून मुक्ती मिळविण्यासाठी केलेले प्रयत्न तर दुसऱ्या टप्प्यात १९०० ते १९२४ पर्यंतच्या द्वितीय कालखंडात दलित समाजातील लोकांनी केलेले प्रयत्न सांगता येतात. आंबेडकर पूर्व दलित चळवळीचे कार्य व स्वरूप पुढीलप्रमाणे सांगता येतात.

**अ) डॉ. आंबेडकर पूर्व दलितेतर समाज सुधारकाचे कार्य-** १९५० साला पासून ते आंबडेकरांच्या उदयापर्यंत दलितेतर समाजातील लोकांनी दलितासाठी केलेल्या कार्याचा विचार करता येईल. त्यात महात्मा फुले, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, न्या.रानडे, आगरकर, गोपाळ कृष्ण गोखले, वि.रा.शिंदे इ.समाजसुधारकांची नांवे सांगता येतात. त्यांनी दलितांना शिक्षणाचा हक्क आणि सोय उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केलेले होते. दलित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व वस्तीगृहाची सोय केली. दलित समाजाला शिक्षण देऊन या समाजाची अंधश्रद्धा व अज्ञानातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. दलितामध्ये जनजागृती करण्यासाठी प्रयत्न केले. त्यासाठी दलित समाजाला जागे करण्याचे काम समाजसुधारकांनी केले. त्यातील प्रमुख सुधारकांचे कार्य पुढीलप्रमाणे होत.

१. **महात्मा ज्योतिबा फुले-** अस्पृश्यतेच्या प्रश्नाला केवळ निव्वळ प्रश्न न मानता तो सोडविण्यासाठी संपूर्ण समाजाच्या पुनर्मांडणीची करणे आवश्यक आहे हा विचार सर्वप्रथम फुल्यांनी मांडला. समग्र परिवर्तनाशी स्त्री आणि शूद्रातिशूद्राची गुलामगिरीपासून मुक्ततेची कल्पना मांडली. ब्राह्मणी व्यवस्थेने निर्माण केलेले देव, जात, अनिष्ट रूढया आणि शोषणाचे मार्ग नाकारले. स्त्री आणि शूद्रांनी विद्येची कास धरून आर्थिक आणि मानसिक पिळवणूकीपासून सुटका करून घ्यावी यासाठी प्रयत्न केले. १८५१ साली पुण्यातील नानापेठेत पहिली अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केली. १८५३ मध्ये महार-मांग इत्यादी लोकांस विद्या शिकविण्याकरिता मंडळी नावाची संस्था सुरू केली. मुलीसाठी सुरू केलेल्या शाळेत अस्पृश्य मुलींना प्रवेश दिला. १८६८ साली आपल्या घरातील पिण्याच्या पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला. आपल्या सुधारणावादी विचारांचा प्रसार करण्यासाठी १८७७ मध्ये कृष्णराव भालेराव यांच्या मदतीने 'दीनबंधू' हे साप्ताहिक काढले. ब्राह्मणी कर्मकांड व धर्माचे प्रस्थ कमी करण्यासाठी १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. अस्पृश्यत हे येथील मूळ रहिवासी आहेत आणि परकीय आर्यभटांनी त्यांना पराभूत करून अस्पृश्यता लादली ही उत्पत्ती मांडली. अस्पृश्य मुलासाठी शाळा व वसतीगृहे काढून त्यांना विद्येची कास धरण्याचे आवाहन केले. फुल्यांच्या कार्यामुळे अस्पृश्यांना प्रेरणा मिळाली. म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा फुलेना आपले गुरू मानले आहे.

२. **सयाजीराव गायकवाड-** बडोदा संस्थानाचे राजे सयाजीराव गायकवाड हे परिवर्तनवादी विचारांचे होते. त्यांनी आपल्या संस्थानात अस्पृश्यताविरोधी कायदा केला. त्यांनी बहुजन व अस्पृश्या वर्गात शिक्षण प्रसार घडवून आणण्यास प्राधान्य दिले. विद्यार्थ्यासाठी वसतीगृहे, वाचनालये सुरू केली. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या व पारितोषिके सुरू केली पुरोहितशाहीविरूद्ध पर्यायी विधिव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या राज्यात अस्पृश्यांना मिळणाऱ्या उदार वागणुकीमुळे त्या राज्यात अनेक अस्पृश्य उदरनिर्वाहासाठी गेले. डॉ. आंबेडकरांना शिष्यवृत्ती देऊन अमेरिका व इंग्लंडमध्ये शिक्षणासाठी पाठविले. शिक्षण संपल्यानंतर आपल्या संस्थानात नोकरी दिली. २३ मार्च १९१८ साली मुंबईत येथे भरलेल्या अस्पृश्यता निवारण परिषदेचे अध्यक्ष होते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी होणाऱ्या सर्व प्रयत्नाना सहकार्य केले. अस्पृश्यता निवारण, विधवा विवाह, मिश्रविवाह, प्राथमिक शिक्षण सक्ती यासंबंधीचे कायदे केल्यामुळे पुरोगामी विचारसरणीचे कर्तृत्ववान राजे म्हणून त्यांचा गौरव केला जातो.

३. **शाहू महाराज-** शाहू महाराजावर महात्मा फुल्यांचा विचाराचा प्रभाव होता. हिंदू धर्मातील ब्राह्मणाचे वर्चस्व मोडून काढण्यासाठी करवीर येथे क्षात्र धर्मपीठाची निर्मिती करून मराठी व्यक्तीस शंकराचार्य म्हणून नेमले. त्यांनी अस्पृश्यता विरोधी कायदा करून अंमलात आणला. प्रत्येक जातीच्या लोकांसाठी वस्तीगृह काढले. १९०८ मध्ये अस्पृश्यांसाठी मिस क्लार्क हॉस्टेल सुरू केले. मागणाव येथे भरलेल्या अस्पृश्यांच्या पहिल्या परिषदेचे अध्यक्षपद भूषविले. दलिता नेता म्हणून बाबासाहेबाना पाठिंबा दिला. बाबासाहेबांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली. मूकनायक वर्तमानपत्र उभारणीस सहाय्य केले. याशिवाय अनेक अस्पृश्य समाजातील लोकांना आर्थिक मदत केली. आपल्या संस्थानातील ५० टक्के जागा मागासलेल्या जातीसाठी राखीव ठेवल्या. कोल्हापूर संस्थानात अस्पृश्यता विरोधी कायदा अंमलात आणला. महार वतने रद्द करून त्या जमिनी त्यांनी अस्पृश्यांच्या नावे करून दिल्या. वेठबिगारी पद्धतीची कामे करून घेण्यास बंदी लादली. अस्पृश्यांना सर्व ठिकाणी समानते वागणुक मिळावी म्हणून आदेश काढला. प्रत्यक्ष व्यवहारात अस्पृश्यांना व्यवसाय व नोकरी मिळविण्यास सहकार्य केले.

४. **विठ्ठल रामजी शिंदे-** अस्पृश्य वर्गाची सुधारणा व्हावी म्हणून त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. त्यास कार्यास सयाजीराव गायकवाड आणि प्रार्थना समाजाचे सहाय्य लाभले. बडोदा, पुणे, बेळगाव, मुंबईतील अस्पृश्यांच्या शिकत असलेल्या

मुलाची पाहणी करून सुधारणा घडवून आणण्यासाठी अहवाल तयार केला तसेच काही सूचनाही केल्या. अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी १८ ऑक्टोबर १९०६ रोजी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी' या संस्थेचे मुंबईत स्थापना केली. या संस्थेचा उद्देश अस्पृश्य समाजात शिक्षणप्रसार, अस्पृश्यांना नोकरी संधी निर्माण करणे, त्यांच्या अडीअडचणीचे निवारण करणे आणि अस्पृश्य बांधवांना खऱ्या धर्माची शिकवण देणे हा प्रमुख उद्देश होता. त्यांनी त्या संस्थेमार्फत एल्फिस्टन रोडवर पहिली शाळा सुरू केली. या संस्थेने मुबई इलाखा व वऱ्हाड प्रांतात सुरू केल्या. पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातील ॲफी थिएटर येथे सहभोजना कार्यक्रम आयोजित केला. अस्पृश्य मुलांसाठी शाळा, वसतीगृहे, शिवण वर्ग, प्रबोधनपर व्याख्याने, कीर्तने आयोजित करून अस्पृश्याच्या प्रश्नाबद्दल जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. देशभर दौरे करून समाज जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यांची लष्करी भरतीवरील बंदी उठवावी यासाठी प्रयत्न केले. राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावर अस्पृश्यता निवारणाचा ठराव मंजूरीसाठी प्रयत्न केले. पुढे ते गांधीच्या नेतृत्वाखाली कार्य करू लागले. त्यांच्या प्रयत्नामुळे अस्पृश्य वर्गात जागृती निर्माण झाली. अस्पृश्यासाठी शिक्षणाच्या सोयी केल्या. त्यांच्या प्रयत्नामुळे अस्पृश्यांच्या प्रश्नासंबंधी हिंदू लोकांत जाणीव व जागृती होऊ लागली. मिशनरी पद्धतीने अस्पृश्यतेची रूढी कमी करत नेणे आणि त्यांच्यात जागरूकता व हक्कांविषयी जाणीव विकसित करणे हा महर्षी शिंदेचा प्रयत्न होता.

**ब) डॉ. आंबेडकर पूर्वीच्या दलित समाजसुधारकांचे कार्य-** दलितेतर समाजातील लोकांनी केलेल्या कार्याने प्रभावित होऊन काही दलित समाजातील समाजसुधारकांनी १९०० ते १९२४ या कालखंडात समाज उद्धाराच्या कार्याला सुरूवात केली. त्यात पुढील समाजसुधारकाचा समावेश होता.

१. **गोपाळबुवा वलंगकर-** १९व्या शतकाच्या उत्तरार्धात गोपाळबुवा वलंगकर यांनी दलित समाजात समाज जागृतीचे कार्य केले. दलित चळवळीतील प्रथम नेता व समाजसुधारक म्हणून त्यांचा गौरव केला जातो. ते इंग्रजांच्या लष्करात नोकरीस होते. त्यांच्यावर महात्मा फुल्यांचा प्रभाव होता. लष्करातून निवृत्त झाल्यानंतर दापोलीस स्थायिक झाले. त्यांनी १८९० मध्ये 'अनार्य दोष परिहार' या संस्थेची दापोलीत स्थापना केली. या संस्थेच्या महाराष्ट्रभर शाखा काढल्या. या संस्थेमार्फत अस्पृश्यांमध्ये सामाजिक कार्य सुरू केले. कीर्तनाच्या माध्यमातून अस्पृश्यामध्ये जनजागृती केली. सुधारक आणि दिनबंधू वर्तमानपत्रात लेख लिहून आपले विचार मांडले. 'विटाळ विध्वंसन' हे पुस्तक लिहून जातिभेद व अस्पृश्यतेबद्दल अनेक प्रश्न उपस्थित केले आणि या प्रश्नांची उत्तरे सवर्ण हिंदू आणि शंकराचार्यांनी द्यावीत हे आवाहन केले. लष्करात अस्पृश्य समाजाच्या भरतीवर ब्रिटिशांनी बंदी लादली होती या अन्यायाविरूद्ध त्यांनी आवाज उठवून दीर्घकाळ संघर्ष केला आणि दलितांना हा हक्क परत मिळवून दिला. दलितावरील अन्याया विरोधातील पहिला आवाज म्हणून गोपाळ बुवाचे कार्य ओळखले जाते. 'विटाळ विध्वसन' या नावाचे अस्पृश्यांच्या उद्धारास वाहिलेले पहिले साप्ताहिक सुरू केले. दलिताच्या दु: खाला वाचा फोडण्याचे पहिले कार्य त्यांनी केलेले दिसते.

२. **शिवराम जानबा कांबळे-** गोपाळबुवा वलंगकर, म. फुले, बाबा पद्मनजी, लोकहितवादी, आगरकर, वि.रा. शिंदे वगैरे समाजसुधारकाचा त्यांच्यावर प्रभाव होता. शिवराम जानबा कांबळे यांनी पुणे शहरात अस्पृश्योद्धाराची चळवळ चालविली. सासवड येथे ५१ गावातील अस्पृश्याची सभा घेऊन सरकारला निवेदन सादर केले. हा अस्पृश्यांच्या मागणीसाठी केलेला पहिला अर्ज होता. अस्पृश्यांना शिक्षणाची सोय व्हावी, सैन्य, पोलिस दल आणि सरकारी नोकरीत संधी मिळावी म्हणून चळवळ चालविली. १९०४ मध्ये 'श्रीशंकर प्रासादिक सोमवंशीय हितचिंतक ' संस्थेची स्थापना केली. श्री सिच्चिदानंद वाचन गृह सुरू केली. 'सोमवंशीय मित्र'हे मासिक सुरू केले. 'सूचिपत्र' नावाच्या पुस्तकातून अस्पृश्यावर सरकार व गावकऱ्याकडून केल्या जाणाऱ्या अत्याचाराची मांडणी केली. ५ एप्रिल १९१० ला जेजुरी येथे दुसरी सोमवंशीय परिषद भरविली. 'महार विद्यार्थी संस्था' स्थापन करून शिक्षणाची गरज असलेल्या अस्पृश्य विद्यार्थ्यांना मदत मिळावी हा संस्थेचा उद्देश होता. अस्पृश्यांना पोलिस व लष्करात भरती करावी यासाठी भारतमंत्री क्यू यांच्याकडे मागणी केली. दलित समाजात जागृती करण्यासाठी पुस्तके आणि मासिकांच्या माध्यमातून प्रचार केला. मुरळीच्या प्रथेविरूद्ध आवाज त्यांनी उठविला. वि.रा.शिंदे यांनी सुरू केलेल्या निराश्रित साह्यकारी मंडळाच्या पुणे शाखेचे ते अध्यक्ष होते.

३. **किसन फागुजी बंदसोडे-** किसन फागुजी बंदसोडे यांनी वऱ्हाड प्रांतात अस्पृश्योद्धाराचे कार्य केले. त्यासोबत विठोबा रावजी मनुसंतपाडे, मुकुंदा शेटये, करणुजी विठ्ठल मालगुजार, गोमा गणेश सावकार, कालीचरण नंदागवळी, नानासाहेब

गवई जाणोजी खंडारे, फत्तूजी शेडे यांच्या सोबत कार्य केले. बनसोडे यांनी चोखामेळा कन्या शाळा सुरू केली. अनेक विद्यार्थी वसतीगृह काढली. सामाजिक परिषदा भरविणे, गावागाव हिंडून आत्मोद्धाराची भावना जागृत करणे इ. कार्य केले. त्यांनी कवितेच्या माध्यमातून आपल्या वेदना मांडल्या. आंबेडकरपूर्व काळातील समतेच्या विचारप्रवाहांची साखळी पुढे नेण्याचे कार्य बंदसोडे यांनी केले. त्यांनी विपुल लेखन करून मराठी मुलुखातील महार समाजात स्वाभिमान जागविण्याचे काम दलित चळवळीच्या माध्यमातून बनसोडेंनी कार्य केले. त्यांच्या कार्यातून दलितामध्ये आत्मभान निर्माण झाले.

या कालखंडात वरील कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी दलितावर होणाऱ्या अन्यायाबद्दल जागृती करण्याचे कार्य केले. समाजाची अन्यायतून सुटका करण्यासाठी समाज व्यवस्थेशी संघर्ष करायला सुरूवात केली. त्याबरोबर अनेक सामाजिक संस्था व संघटना, शाळा, वस्तीगृहे निर्माण करून समाज जागृतीचा प्रयत्न केला.

**प्र.२ रा. दलित चळवळीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे योगदान व कार्य सांगा?**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्य जातीत जन्माला आल्यामुळे त्यांना बालपणापासून अस्पृश्यतेचे चटके बसले होते. १९१७ ला इंग्लंडहून शिक्षण घेऊन आल्यानंतर त्यांनी बडोदा संस्थानात नोकरी सुरू केली. अस्पृश्य जातीमुळे नोकरीच्या ठिकाणी इतराकडून अपमानस्पद वागणूक मिळाली. त्यामुळे त्यांचे मन पेटून उठले.म्हणून बाबासाहेबांनी नोकरीचा राजीनामा देवून अस्पृश्य बांधवावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करण्यास आणि आपल्या जातीबांधवांना हक्क मिळवून देण्यासाठी संघर्ष करण्यात आणि त्यांच्यात स्वाभिमान जागृती करण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केलेले होते. दलिताना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी शाहू महाराजाच्या प्रोत्साहनाने मूकनायक हे मासिक सुरू केले. त्यानंतर जनता, प्रबुद्ध भारत ही वर्तमान पत्रे सुरू केले. त्यांनी Castes in India, Thoughts on Pakistan, Untouchables, Budha and Karl Marx, Budha and his Dhamma, Who were the Shudras, States and Minorities, Who were the shudras इत्यादी ग्रंथ लिहून दलित प्रश्नांला वैचारिक चौकट उपलब्ध करून दिली. दलितांमध्ये आत्मभान व स्वाभिमानाची भावना निर्माण करण्यासाठी बाबासाहेबांनी दिलेल्या योगदानाचा विचार करता त्यांचा महामानव म्हणून गौरव केला जातो.
दलित चळवळीत त्यांचे योगदान व कार्य पुढील प्रमाणे होत.

**१) बहिष्कृत हितकारणी सभा -** अस्पृश्यांच्या आर्थिक व राजकीय विकास घडवून आणण्यासाठी आणि भारतीय समाजापुढे जातीय संस्थेने उभे केलेले भीषण आवाहन मोडून काढण्यासाठी २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना केली. संस्थेचे 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' हे ब्रिद वाक्य होते. या संस्थेमार्फत अस्पृश्य समाजात समाज सुधारणा व जागृती आणि शिक्षण प्रसारावर भर देऊन दलित समाजात शिक्षणाचा प्रसार केला. दलित समाजातील तरूण व प्रौढ व्यक्तीसाठी रात्रीच्या शाळा, वाचनालये या संस्थेने चालविल्या. दलित समाजात जागृती घडवून आणणे, दलित समाजात शिक्षणाचा प्रसार करणे, दलित समाजाची आर्थिक परिस्थिती सुधारणे या क्षेत्रात ही संस्था कार्यरत होती.

**२) समता सैनिक दल-** १९२६ मध्ये बाबासाहेबांनी दलित शोषिताची एक गैर राजकीय व सांस्कृतिक संघटना म्हणून समता सैनिक दलाची स्थापना केली. या दलाद्वारे दलित तरूणाच्या मानसिक व शारीरिक विकासावर भर देणे. त्यामुळे त्यांना शिक्षण, अनुशासन व आत्मनिर्भरता या शक्तीचा वापर करण्याची प्रेरणा मिळाली. शीलावर आधारित शक्ती असे बोधवाक्य देऊन दलाच्या माध्यमातून दलित तरूणांमध्ये मानसिक, शारीरिक व आर्थिक सामर्थ्यात भर टाकण्यास प्रारंभ केला. युवकांचे ऐक्य, कल्याण व उत्कर्षासाठी ही संस्था कार्य करत होती.

**३) महाडचा सत्याग्रह-** महाड गावातील तळे नगरपालिकेने ठराव करून सर्व जातीधर्माच्या लोकांसाठी खुले केले होते. परंतु सवर्णाच्या भीतीने अस्पृश्य तलावावर पाणी भरण्यासाठी जात नसत. या अन्यायाविरूद्धात बाबासाहेबांनी महाडचा लढा उभारला. अस्पृश्यांना आपला हक्क बजावण्यासाठी संघटित करून २० मार्च १९२७ रोजी सत्याग्रह करून महाडचे चवदार तळे अस्पृश्यासाठी खुले करून घेतले. महाडच्या चवदार तळयावर अस्पृश्याचाही हक्क आहे हे आपल्या कृतीने पटवून दिले. तसेच पूर्वास्पृश्य हे आपल्या हक्कासाठी आता भिक मागणार नाहीत तर आपले हक्क ते स्वबळावर मिळवतील असा इशारा या चळवळीच्या माध्यमातून केला.

**४) मनुस्मृतीचे दहन -** मनुस्मृती हिंदू समाजाच्या एक धर्मग्रंथ आहे. पण या ग्रंथाने जातीय व्यवस्था व अस्पृश्यासंबंधीचे निर्बंध यांचे समर्थन करून हिंदू समाज पद्धती व जातीय संस्था यांना बळकटी प्राप्त करून देण्याचे कार्य केले आहे. सामाजिक

विषमता व उच्च नीच यांचे समर्थन करणाऱ्या ग्रंथाविरूद्ध जनमत तयार करून २५ सप्टेंबर १९२७ ला मनुस्मृतीचे जाहीर दहन करून अन्यायकारक ग्रंथाला कायमची मूठमाती मिळावी म्हणून प्रयत्न केले. सामाजिक विषमता व उच्चनीच भेदभावाचे समर्थन करणाऱ्या ग्रंथाचे दहन करून प्रतिकात्मक कृती केली. या घटनेतून अस्पृश्य वर्गाचे मनोबल वाढण्यास मदत झाली.

**५) काळाराम मंदिर सत्याग्रह -** हिंदू धर्मातील उच्चवर्गीयांनी अस्पृश्य जातीतील लोकांना अनेक हक्कापासून वंचित ठेवले. अस्पृश्यांना साधा मंदिर प्रदेशाना हक्क देखील नाकारला गेला. अस्पृश्यांना मंदिर प्रवेशाचा हक्क मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह करण्याचे ठरविले. अस्पृश्यांच्या प्रवेशाने मंदिरे भ्रष्ट होत नाही. देवळे जरी स्पृश्य हिंदूनी बांधली असली तरी ती हिंदू धर्माची असून सर्व हिंदू धर्मियाकरिता बांधली आहेत. हिंदुत्व जितकी स्पृश्यांची मालमत्ता आहे तितकीच ती अस्पृश्यांची देखील आहे. म्हणून मंदिर प्रवेशासाठी नाशिक येथील काळाराम मंदिराची निवड करून हजारो दलित बांधवासह २ मार्च १९३० रोजी सत्याग्रह केला. त्या नंतर महाराष्ट्रात इतर ठिकाणी सत्याग्रह करून अस्पृश्यासाठी मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह सुरू केले. बाबासाहेबांच्या प्रेरणेने महाराष्ट्रात त्यानंतरअनेक ठिकाणी मंदिर प्रवेश चळवळी सुरू झालेल्या दिसतात.

**६) राजकीय कार्य-** बाबासाहेबांनी अस्पृश्यांच्या राजकीय हक्कासाठी सायमन कमिशन समोर साक्ष देऊन अस्पृश्यांना राखीव जागाची मागणी केली. लंडन येथे भरलेल्या गोलमेज परिषदेत अस्पृश्याचे प्रतिनिधी म्हणून सहभाग घेतला. या परिषदेत त्यांनी अस्पृश्यांच्या राजकीय सहभागासाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. गोलमेज परिषदेनंतर पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर करून अस्पृश्यांची स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मान्य केली. पण गांधीनी अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याच्या निर्णयाच्या विरोध करून येरवडा कारागृहात उपोषण सुरू केले. उपोषणामुळे देशभर तणावाचे वातावरण निर्माण झाले. हा तणाव कमी करण्यासाठी भारतातील नेत्यांनी महात्मा गांधी आणि आंबडेकर यांच्यात तडजोड घडवून आणली. महात्मा गांधी आणि बाबासाहेब यांच्यात तडजोड होऊन पुणे करार होऊन अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ ऐवजी राखीव मतदारसंघ देण्यात आले. अस्पृश्याबरोबर शेतकरी व कामगारांना वर्गाच्या आर्थिक विपन्नवस्थेची कारणमींमासा करून श्रमिकांची जातीनिरपेक्ष संघटना बांधण्यासाठी आणि सामाजिक क्रांतीला राजकीय व आर्थिक आधार देण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. १९३७ च्या प्रांतिक विधीमंडळाच्या निवडणुकीत या पक्षाला चांगले यश मिळाले. मुंबई विधिमंडळात विरोधी पक्ष नेता म्हणून बाबासाहेब व स्वतंत्र मजूर पक्षाने पार पाडली. या कालखंडात खोती निर्मलून, महार वतने नष्ट करणारे विधेयक इ. विधायक कार्य केले. अनुसूचित जातीच्या विशिष्ट हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी , स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दलितांची उपेक्षा होऊ नये, त्यांना विशेष सवलती व संरक्षण प्राप्त करून घेता यावी त्यासाठी त्यांची स्वतंत्र अस्मिता प्रस्थापित करण्यासाठी १९४२ मध्ये शेडयूल्ड कास्टस् फेडरेशन पक्षाची स्थापना केली. या पक्षाने घटना समितीला निवेदन देऊन अस्पृश्याचे हित व हक्क सुरक्षित राहावेत त्याकरिता विशेष संविधानिक तरतूदी करण्याचा फेडरेशनने आग्रह धरला.

**७) भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार-** डॉ.आंबेकराच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव भारतीय राज्यघटनेवर पडलेला दिसतो. भारतीय राज्यघटनेच्या मसूदा समितीचा अध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेले काम व परिश्रमामुळे त्यांना राज्यघटनेचे शिल्पकार मानले जाते. राज्यघटनेतील प्रत्येक कलम मंजूर करतांना त्यानी व्यक्त केलेल्या मते व घटनेचा आराखडा तयार करतांना घेतलेले श्रम तसेच राज्यघटनेवर पडलेली त्यांच्या विद्ववतेची छाप पडलेली दिसते. घटनेने २० नोव्हेंबर १९४८ रोजी सतरावे कलम संमत करून अस्पृश्येची रूढी कायदाने नष्ट केली. अस्पृश्यता पाळणे कायदाने गुन्हा मानण्यात आला.

**८) हिंदू कोड बिल-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री बनले. हिंदू समाजाला लागू असलेला हिंदू कायदा ब्रिटिशांनी तयार केला होता. या कायदयात इष्ट सुधारणा करण्यासाठी ब्रिटिशांनी १९४१ मध्ये दि हिंदू कोड बिल समिती निर्माण केली. सर्व हिंदू कायदाचे संहितीकरण करून सर्व हिंदूना एकच कायदा लागू करावा व त्यात हिंदू स्त्रियांना समान हक्क देण्यात यावे हे समितीचे मुख्य कार्य होते. या समितीने १९४३ मध्ये वारसा हक्क व विवाहविषयक अशी दोन विधेयके मध्यवर्ती कायदेमंडळात मांडली पण मंजूर झाली नाही. म्हणून इंग्रज सरकारने पुन्हा ह्या समितीचे पुनरूज्जीवन केले. पण सनातनीच्या विरोधामुळे कार्य पार पाडू शकले नाही. स्वातंत्र्यानंतर कायदा मंत्री म्हणून हिंदू कोड बिल मंजूरीची

जबाबदारी आंबेडकरावर आली. त्यांनी कोड बिलाचा मसुदा तयार करून लोकसभेत मांडला पण हे बिल मंजूर झाले नाही. त्यामुळे त्यांनी कायदा मंत्री पदाचा राजीनामा दिला.

**९) धर्मांतर व रिपब्लिकन पक्ष -** हिंदू धर्मात राहून बाबासाहेबांनी अस्पृश्याना हक्क मिळवून देण्याचे प्रयत्न केले पण सवर्ण हिंदूच्या अनुदार वृत्तीमुळे हिंदू धर्मात राहून न्याय मिळणार नाही म्हणून येवला या ठिकाणी "दुदैवाने मी हिंदू म्हणून अस्पृश्य जातीत जन्माला आलेला असला तरी हिंदू म्हणून मरणार नाही " हिंदू धर्माने अस्पृश्यांना न न्याय दिल्यामुळे १४ ऑक्टोबर १९५६ ला विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर लाखो दलित बांधवासह नागपूर येथे बौद्ध धर्माची दिक्षा घेतली. १९५२ निवडणुकीत शेडयूल्ड कास्ट फेडरेशन पक्षाला अपयश मिळाले. स्वतः बाबासाहेबाचाही निवडणुकीत पराभव झाला. म्हणून निव्वळ दलिताची संघटना उभारून चालणार नाही तर पूर्णअस्पृश्य,गरीब स्पृश्य,अनूसूचित जाती व जमातींची एकत्र ताकद उभी करून कॉंग्रेसला तुल्यबळ ठरू शकेल. या दृष्टीने अमेरिकेतील रिपब्लिकन पक्ष सारखा पक्ष स्थापनाची तयारी केली. पण त्यांच्या महापरिनिर्वाणमुळे हे स्वप्न पूर्ण झाले नाही. त्याच्या अनुयायांनी रिपब्लिकन पक्षाची स्थापना करून त्यांचे स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न केला पण अल्पकाळात या पक्षात फाटाफूट झाल्यामुळे हा पक्ष राजकारणात फारसा प्रभाव पाडू शकला नाही.

अशा प्रकारे दलित चळवळीच्या महानायकाच्या स्वरूपात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य मानले जाते. दलित समाजात खऱ्या अर्थाने जागृती निर्माण करण्याचे श्रेय त्यांना जाते. त्यांनी केलेल्या कार्यातून दलित वर्गांना सामाजिक न्याय व हक्क मिळालेले दिसतात.

**प्र. ३ रा. डॉ आबेडकर यांच्या युगानंतरची दलित चळवळीचे वर्णन करा?**

डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण नंतर दलित समाजातील प्रभावी नेतृत्व संपले. त्यांच्या वारस कोण हा प्रश्न उपस्थित झाला. सविता आंबेडकर, भैय्यासाहेब आंबेडकर आणि मुकुंदराव आंबडेकर ह्याचा नावाचा विचार झाला. परंतु नेतेमंडळींनी आंबेडकर कुटुंबाचे नेतृत्व मान्य केले नाही. या समाजातील नेत्यांनी सामुहिक नेतृत्व स्वीकारले. परिणामतः आंबेडकरानंतर दलित चळवळीच्या दुसऱ्या टप्प्यात अनेक कार्यकर्त्यांनी योगदान दिलेले दिसते. त्यात दादासाहेब गायकवाड, बी.सी.कांबळे, रा.सू.गवई, बी.जी.खोब्रागडे, दादासाहेब रुपवते ही प्रमुख नावे सांगता येतात.

१. **रिपब्लिकन पक्षाची स्थापना-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अमेरिकेच्या रिपब्लिक पक्षाच्या धर्तीवर आणि कॉंग्रेसला समर्थ पर्याय देण्याच्या हेतूने रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्याचे ठरविलेहोते. परंतु त्यांच्या निधनामुळे हे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही. शे. का. फे. कार्यकारीने सामूहिक नेतृत्व निवडीसाठी ३१ डिसेंबर १९५६ रोजी बैठक घेतली. त्या बैठकीत सुरूवातीला सात सदस्याचे प्रेसिडियमची निवड केली. त्यानंतर भरलेल्या बैठकीत चार सदस्याचा समावेश प्रेसिडियम मध्ये करण्यात आला. १९५७ पूर्वीच रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्याचे स्वप्न होते. परंतु आंबेडकराचे निधनाने समाज निर्माण झालेली पोकळी, नेतृत्वाचा वाद आणि ऐन तोंडावर आलेल्या निवडणुकामुळे प्रेसिडियमने शे.का.फे.च्या नावावरच सार्वत्रिक निवडणुका लढविल्या. संयुक्त महाराष्ट्र समिती सोबत निवडणुका लढविल्यामुळे शे.का.फे.चे सहा उमदेवार निवडून आले. कर्नाटक, मद्रास, गुजराथ मध्ये ही पक्षाचा एकेक उमदेवार विजयी झाला.नागपूर येथे दीक्षाभूमीवर ३ ऑक्टोबर १९५७ रोजी शे.का.फे बरखास्त करून रिपब्लिकन पक्ष ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. या पक्षाने भारतातील सर्व दुर्बल घटकांना , अल्पभूधारक, भूमिहिन मजूरांना, अल्पसंख्याकांना संघटित करून त्यांना सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळवून देण्याची घोषणा केली. रावबहादूर एन.शिवराज हे रिपब्लिकन पक्षाचे पहिले अध्यक्ष म्हणून निवडले गेले. परंतु रिपब्लिकन पक्षातील नेत्यामध्ये हे ऐक्य फार काळ टिकू शकले नाही. त्यांच्यामध्ये नेतृत्वावरून स्पर्धा निर्माण झाली. १९५९ मध्ये पक्षात दुरूस्त आणि नादुरूस्त हे दोन गट निर्माण झाले. दुरूस्त गटाचे नेतृत्व बी.सी.कांबळे तर नादुरूस्त गटाचे नेतृत्व दादासाहेब गायकवाड ह्यांनी केले. १९६२ च्या निवडणुकीत दादासाहेब गायकवाड यांच्या गटाने कॉंग्रेसशी निवडणुकीत युती केली. कांबळेच्या गटाचा हळूहळू प्रभाव कमी झाला. दादासाहेब गायकवाडांच्या निधनानंतर बॅ. ख्राबागडे यांनी स्वतंत्र गट निर्माण केला. दादासाहेब यांच्या गटाला पुढे रा.सु.गवई गट म्हणून संबोधिले जाऊ लागले. रिपब्लिकन पक्षांनी निवडणुकीच्या राजकारणासाठी अनेक पक्षाशी युती केल्यामुळे पक्षाला स्वतःचा कार्यक्रम राहिला नाही. काही कार्यकर्त्यांनी सत्तेसाठी सत्ताधारी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला. सत्तेतील भागीदारी आणि नेतृत्वाच्या महत्वाकांक्षातून कार्यकर्त्यांमध्ये असंतोष पसरू लागला. रिपब्लिकन

पक्षाच्या विघटनातून रिपब्लिकन पक्षात ऐक्याचे प्रयत्न सुरू झाले. पहिला ऐक्याचा प्रयोग भैय्यासाहेब आंबेडकर यांनी १९५८ मध्ये केला. दुसरा ऐक्याचा प्रयत्न १९६२ च्या निवडणूक लक्षात घेऊन करण्यात आला. परंतु यश आले नाही. दादासाहेब रूपवते यांनी १९६६ मध्ये ऐक्याचे प्रयत्न केले. पण ऐक्य परिषदेला दादासाहेब गायकवाड एकटे उपस्थित राहिले. १९७१ बी.सी.कांबळे यांनी ऐक्याचे प्रयत्न केले. १९७४ मध्ये ऐक्यासाठी भरीव प्रयत्न केले. नेत्यांनी ऐक्यांची शपथ घेतली. एकत्र काम करण्याचे ठरविले, पण हे ऐक्य ही सत्ता स्पर्धेमुळे टिकले नाही.

शे.का.फे. दलिताच्या हक्कांच्या रक्षण आणि बाबासाहेबाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली. परंतु पक्ष स्थापनेनंतर अल्पकाळात आपआपसांतील हेवेदावे, सत्तेची अभिलाषा व वैचारिक मतभेद यामुळे रिपब्लिकन पक्षात फूट पडली. रिपब्लिकन पक्षाचे लहान लहान गटात रूपांतर झाले. रिपब्लिकन पक्षात फूट पडल्यामुळे दलित चळीवळीची ताकद कमी झाली.रिपब्लिकन पक्षाच्या गटातटाच्या व सत्तांध राजकारणाला कंटाळून दलित समाजातील तरूणांनी एकत्र येऊन दलित पँथर नावाची लढाऊ संघटना निर्माण करून दलित समाजाला एकत्र आणण्याचा प्रयत्न केला पण पँथर मध्ये देखील अल्पकाळात तरूण नेत्यात वैचारिक मतभेद झाल्यामुळे फूट पडली. १९८४ मध्ये प्रकाश आंबेडकरांचे नेतृत्व उदयाला आले. बाबासाहेबाचे नातू म्हणून त्याचे नेतृत्व दलित समाजाने स्वीकारले. त्यांनी रिपब्लिकन पक्षाऐवजी भारतीय रिपब्लिकन पक्ष (भारिप) असे संबोधणे सुरू केले. रिपब्लिकन पक्षातील सर्व गटाचे ऐक्य झाल्याशिवाय पक्षाला राजकीय भवितव्य नाही हे लक्षात घेऊन दलित जनता, लेखक व कवींनी ऐक्याची मागणी सुरू केली. कारण १९८९ च्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला एकही जागा मिळाली नाही. त्यामुळे दलित तरूणांचा भावना तीव्र बनल्या. लोकक्षोम वाढला. १९९० मध्ये दलित जनतेच्या दडपणामुळे रिपब्लिकन ऐक्य प्रक्रिया सुरू झाली. प्रकाश आंबेडकर, रा.सु.गवई, रामदास आठवले, जागेंद्र कवाडे ह्यांची सुकाणू समिती स्थापन झाली. दलित मुक्ती सेना व इतर दलित संघटना बरखास्त करण्यात आल्या. ६ जानेवारी १९९० मध्ये रिपब्लिकन ऐक्य जाहीर करण्यात आले. पण १९९० च्या निवडणुकीत जनता दलाला पाठिंबा दयावा की काँग्रेसला ह्यावरून झालेल्या मतभेदामुळे ऐक्य फिसकटले. रामदास आठवले गटाने काँग्रेसशी तर प्रकाश आंबेडकर गटाने स्वतंत्रपणे निवडणुका लढविल्या. पण कोणत्याही गटाला निवडणुकीत यश मिळाले नाही. १९९५ च्या निवडणुकीत काँग्रेस व रिपब्लिकन युतीला बहुमत मिळाले नाही भाजप शिवसेनेचे सरकार आले. त्यामुळे रिपब्लिकन ऐक्याची प्रक्रिया सुरू झाली. १९९६ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेससोबत युती करून रिपब्लिकन पक्षाचे प्रकाश आंबेडकर, रा.सु.गवई, जागेंद्र कवाडे आणि रामदास आठवले हे चार खासदार निवडून आले. परंतु हे ऐक्य फार काळ टिकू शकले नाही. त्यानंतर अनेक दलित नेत्यांनी दलित चळवळीत ऐक्य निर्माण करण्यासाठी रिपब्लिकन पक्षात ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला पण सत्ताकांक्षामुळे नेते सत्ता मिळाल्यानंतर दलित चळवळीत फूट पाडतांना दिसतात म्हणून आजही आठवले गट, कवाडे गट, गवई गट व प्रकाश आंबेडकर गट इ गट दिसून येतात. याचा अर्थ डॉ.बाबासाहेबाच्या नंतर दलित समाजाला एकत्र बांधून ठेवणारा एकही नेता निर्माण न झाल्यामुळे दलित चळवळीची शक्ती कमी झालेली दिसते.

रिपब्लिकन पक्षाला समाजपरिवर्तन आणि निवडणुकीच्या राजकारणाला महत्त्व दिल्यामुळे ऐक्य फार काळ टिकले नाही. तसेच ह्या पक्षाचे बहुसंख्य नेते व कार्यकर्त नवबौद्ध समाजातील असल्यामुळे हा पक्ष एकाच जातीचा पक्ष म्हणून ओळखला जाऊ लागला. नवबौद्धतर जमातीना हा पक्ष आकर्षित करू शकला नाही. नेत्यामधील वाद, सत्ता स्पर्धा, गटबाजी, ह्यामुळे दलित जनतेचा नेत्यावरील विश्वास कमी झाला. या पक्षातील नेत्यांनी दलित समाजाच्या प्रश्नांकडे गंभीरपणे लक्ष दिले. अशा प्रकारे डॉ. आंबेडकर यांच्या निधनानंतर दलित चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी मांडता येते.

२. **दलित साहित्य चळवळ-** डॉ. आंबडेकरांनी आपल्या वाङ्‌मय आणि ग्रंथ लेखनातून अस्पृश्यांची कैफियत गावकुसापासून ते जागतिक पातळीपर्यंत नेली. त्यांची ही परंपरा पुढे दलित साहित्यकांनी आत्मचरित्रपर लेखनातून सुरू ठेवली. शिक्षणातून पुढे आलेल्या तरूणांनी आपल्या भावना शब्दात मांडायला सुरूवात केली. २ मार्च १९५८ मध्ये दादरच्या बंगाली हायस्कूलात 'दलित लेखकांचे पहिले संमेलन' भरले. दलित लेखकांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून प्रस्थापित विषमतेविरूद्ध एल्गार पुकारला. आपल्या मनातील चीड व संताप सर्वा समोर मांडली. मी माणूस आहे, म्हणून मला माणसाचे सर्व हक्क मिळाले पाहिजे हा लेखनातील प्रमुख सूर होता. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल, दया पवार, केशव मेश्राम, लक्ष्मण गायकवाड, शरण कुमार लिंबाळे, नामदेव ढसाळ यांनी कथा, कांदबरी, वर्तमानपत्रीय लेखनातून दलिताचे दु:ख मांडले. या लिखाणातून दलिताचे वास्तविक जीवन व चळवळीचे

हुबेहुब चित्र रेखाटण्यात आले. दलित चळवळीच्या आंबडेकर यांच्या नंतर वैचारिक बांधणीचे कार्य दलित साहित्याने केलेले दिसते. आंबेडकर उत्तरकाळात दलित चळवळी विकासात किंवा नवसंजीवनी देण्यास दलित साहित्यिकांचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते.

३. **भूमिहीनांचा सत्याग्रह-** भूमिहीनांना शेती करण्यासाठी पडीक जमिनी दिल्या पाहिजेत ह्या मागणीसाठी १९५३ पासून शे.का.फे. पक्षाने सत्याग्रह सुरू केला होता. ७ मार्च १९६० रोजी महाराष्ट्रातील तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण ह्यांना रिपब्लिकन नेत्यांनी निवेदन दिले होते. त्यात भूमिहीनांच्या विविध प्रश्न व मागण्या मांडल्या. त्यासोबत बौद्धांना सवलती मिळाल्या पाहिजेत, महागाईला आळा घालावा, झोपड्पट्ट्यांची सुधारणा करावी, राखीव जागाचा अनुशेष भरून काढावा, अस्पृश्यता निवारण कायद्याची कडक अंमलबजावणी करावी आणि लोकसभेच्या केंद्रीय सभागृहात बाबासाहेब आंबेडकरांचे तैलचित्र लावावे अशा विविध मागण्यासाठी रिपब्लिकन पक्षाने वेळावेळी सत्याग्रह केला. आपले प्रश्न सोडविण्यासाठी दलित समाजाचे संघटन करून शासनाचे लक्ष वेधले.१९६४ साली भूमिहीनांच्या प्रश्नाला अधिक चालना मिळाली. हा सत्याग्रह देशव्यापी करण्यात आला. १ ऑक्टोबर १९६४ रोजी संसदेवर मोर्चा नेचऊन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांना निवेदन दिले. या सत्याग्रहात देशातील विविध भागातून दलित समाजाचे लोक सहभागी झाले. या सत्याग्रहाची आखणी एन.शिवराज यांनी केली होती परंतु त्याचे निधन झाल्याने दादासाहेब गायकवाड यांनी सत्याग्रहाचे नेतृत्व केले. भूमिहीनांना न्याय मिळवून देण्यासाठी रिपब्लिकन पक्षाने जिल्हाधिकारी कार्यालय, तहसिलदार कार्यालय आणि इतर सरकारी कार्यालयावर मोर्चा काढून आपल्या मागण्या सोडविण्यासाठी सरकारवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला.

४. **टिप- दलित पँथर-** रिपब्लिकन पक्षाला मिळालेले अपयश, त्या पक्षातील नेतृत्वासाठी सुरू असलेले हेवेदावे, गटबाजी, फूटीर वृत्ती, वैचारिक दिवाळखोरी आणि संघटनात्मक विस्कळीपणामुळे दलित समाजात नैराश्याची भावना निर्माण झाली. रिपब्लिकन पक्षाचे निवडणुककेंद्री राजकारण, कचखाऊ वृत्ती, ग्रामीण व दलितापासून दुरावलेले नेतृत्व, दलितांवरील वाढते अत्याचार यासारख्या कारणातून दलितांच्या प्रश्नावर खंबीरपणे लढण्यासाठी दलित समाजातील तरूण नामदेव ढसाळ, राजा ढाले, भाई संगारे, गंगाधर गाडे, टी.एम.कांबळे या विविध संघटनातील नेत्यांनी एकत्र येऊन ९ जुलै १९७२ रोजी दलित पँथर संघटनेची स्थापना केली. परिवर्तनवादी उसळत्या रक्ताची संघटना म्हणून ही संघटना ओळखली जाऊ लागली. या संघटनेच्या उदयाबद्दल नागेश चौधरी म्हणतात की, जातिव्यवस्था आणि दलितांवरील अन्याय या अंतिर्विरोधातून पँथरचा जन्म झाला. या संघटनेने हिंदूचे पुनरूज्जीवनवादी शक्तींना स्पष्टपणे विरोध करून सर्वागींण क्रांतीसाठी जहाल कार्यक्रम आणि भाषेचा अवलंब केला. "माणूस म्हणून जगणे हा आमचा हक्क आहे त्यासाठी आम्ही चित्याचा पवित्रा घेऊन हक्कासाठी लढू" हे ब्रीद मानणाऱ्या विद्रोही चळवळीतील साहित्यिक आणि कार्यकर्त्यांनी ही दलित पँथरची स्थापना केली. त्यात नामदेव ढसाळ, ज.वि.पवार, राजा ढाले, रामदास सोरटे, लतिफ खाटिक, अविनाश महातेकर, पल्हाद चंदवणकर, प्रीतमकुमार शेगावकर, अरूण कांबळे या आघाडीच्या कार्यकर्त्यांनी पँथरची चळवळ वाढविली. ही संघटना अल्पकाळात नावारूपास आली. गावोगाव पँथरच्या शाखा निघून अल्पकाळात ही संघटना राज्यभर पसरली. पँथर नेत्याची बेदरकारपणे भाषणे, भव्य सभा, मोर्चे, पोलिस केसेस ह्यांमुळे ही संघटना चर्चेचा विषय ठरली. पँथरने दलितांवर होणाऱ्या अन्यायाविरूद्धची जळजळीत प्रतिक्रिया मानली जाते. या संघटनेमुळे आंबेडकरांच्या निधनानंतर मरगळ आलेल्या दलित समाजात नवा उत्साह संचारला. दलितांना मुक्तीची आशा वाटू लागली. दलित तरूणांना एक नवे व्यासपीठ मिळाले. या संघटनेच मुख्यपत्र 'विद्रोह' हे नामदेव ढसाळ व ज.वि.पवार चालवित ह्यात दलिताच्या प्रश्नांवर जळजळीत लेख येत असत. पँथरचा पाया व्यापक करून दलितेतर जातींना सामावून घेण्यासाठी संघटनेच्या वैचारिक पायात आंबडेकर वादासोबत मार्क्सवादाची जोड देण्याचा प्रयत्न ढसाळांनी केला. तर राजा ढाल्यांनी ही संघटना बौद्धांची असून बौद्ध तत्वप्रणालीनुसार चालविली पाहिजे. साम्यवादापासून दूर राहावे हा सल्ला दिला. पँथरमध्ये निर्माण झालेल्या परस्परविरोधी मतप्रवाहामुळे आणि १९७७ च्या निवडणुकीत कोणाला पाठिंबा दयावा यावरून राजा ढाले आणि नामदेव ढसाळ याच्यात मतभेद झाल्याने पँथरच्या प्रथम बैठकीत राजा ढाले यांनी नामदेव ढसाळ यांची पँथरमधून काढून टाकले. त्यामुळे दलित पँथर फुटली. राजा ढाले यांनी पँथरचे नाव बदण्यासाठी पँथर बरखास्त करून टाकली. राजा ढाले यांनी 'मास मुव्हेमेंट हा गट पँथरऐवजी स्थापन केला. 'संघटना बरखास्तीमुळे

या चळवळीने दलित आत्मोद्धाराची निर्माण केलेली भावना नष्ट झाली. समाज सैरभैर झाला. म्हणून दलित समाजात जीवतपणा आणण्यासाठी प्रा. अरूण कांबळे, रामदास आठवले, दयानंद म्हस्के, गंगाधर गाडे, प्रीतमकुमार शेगांवकार, भाई संगारे यांनी भारतीय दलित पँथर ही संघटना निर्माण करून पँथरची पुनर्बाधणी करण्याचा प्रयत्न केला. या संघटनेने मराठा विद्यापीठ नामांतर चळवळ, आरक्षण धोरण, मंडल आयोग अंमलबजावणीसाठी आग्रह धरला. परंतु अल्पकाळात दलित चळवळीला लागलेला फुटीचा शाप भारतीय पँथरलाही लागला. अंतर्गत हेवेदावे, गटबाजी आणि सत्तास्पर्धातून ही संघटनाही फुटली. संघटनेतील फाटाफूटीमुळे पँथर संघटनेचा प्रभाव ओसरलेला दिसतो.

दलित पँथर ही दलितांवर होणाऱ्या अन्यायाविरूद्धची जळजळीत प्रतिक्रिया होती. दलित समाजाविषयीचा अपार जिव्हाळा व व सामाजिक विषमतेविरूद्ध पेटून उठलेल्या तरूणांच्या सहभागामुळे अल्पकाळात ही संघटना नावारूपाला आली. पँथरमुळे दलित चळवळीला नवे व्यासपीठ मिळाले. त्यातून दलित तरूणांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. परंतु अंतर्गत मतभेदामुळे इतर दलित पक्ष व संघटनाप्रमाणे अल्पकाळात ही संघटना विस्कळीत झाली.

५. **नामांतराची चळवळ-** डॉ. आंबेडकरांनी मराठवाडा विद्यापीठ ही कर्मभूमी मानली होती. शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या मराठवाडयात शिक्षणाची महूर्तमेढ रोवण्यासाठी मिलिंद महाविद्यालय स्थापन केले होते. त्यांच्या या कार्यामुळेच मराठवाडयात शैक्षणिक चळवळीचे बीजारोपण झाले. त्या कार्याचा उचित गौरव करण्यासाठी मराठवाडा विद्यापीठाला बाबासाहेबाचे नाव द्यावे अशी मागणी दलित पँथरने केली. या मागणीचे जनतेने स्वागत केले. या मागणीला समर्थन मिळविण्यासाठी दलित पँथरने मराठवाडयातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या सह्याची मोहिम हाती घेतली. या मागणीसाठी गंगाधर गाडे यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठावर मोर्चा नेला. ही मागणी लक्षात घेऊन विद्यापीठ कार्यकारिणीने विद्यापीठाचे नामांतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे करावे हा ठराव समंत केला. नामांतरवादयांच्या व्यापक प्रयत्नामुळै २७ जुलै १९७७ रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात नामांतराचा ठराव मंजूर झाला. हा ठराव संमत होताच मराठवाडयात दलित आणि सवर्ण यांच्यात संघर्ष निर्माण होऊन दंगली सुरू झाल्या. त्यामुळे नामातरांला स्थगिती मिळाली. दलित पँथरने नामांतराच्या निमित्ताने अनेक मोर्चे काढून आपली भूमिका जनतेसमोर मांडली. हा लढा दलित अस्मितेचा लढा बनला. या लढयात १९७७ साली पँथरने काढलेला मोर्चा, १९७८ मध्ये दिल्ली येथे काढलेला मोर्चा आणि १९७९ मध्ये औरंगाबाद येथे झालेला नामांतर सत्याग्रह या तीन चळवळी नामांतर काळातील महत्त्वपूर्ण चळवळी मानल्या जातात. ह्या चळवळीमुळे दलित समाजात भावनिक ऐक्य आणि एकात्मता निर्माण झाली. या लढयातून समाजप्रबोधनालाही चालना मिळाली. मराठवाडा ही आमची प्रादेशिक अस्मिता आहे त्यामुळे विद्यापीठांचे नामांतर करू नये ही सुवर्ण आणि नामांतरविरोधी संघटना सुरू केली. नांदेडच्या गौतम वाघमारे ह्या पँथरच्या कार्यकर्त्यांने आत्मदहन केल्यामुळे हा प्रश्न चिघळला. अखेर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार यांनी विरोधी पक्ष, विविध नामांतर विरोधी संघटना आणि दलित संघटना यांच्याशी विचारविनिमय करून १४ जानेवारी १९९४ रोजी महाराष्ट्र शासनाने मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर ऐवजी नामविस्तार केला आणि विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नाव दिले.

६. **दलित मुक्ती सेना-** प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी नामांतराचा लढा आणि दलित प्रश्न सोडवणुकीसाठी दलित मुक्ती सेना ही दलित तरूणांची जहाल संघटना स्थापन केली. त्यांच्या आक्रमक आणि विद्रोही वक्तृत्वामुळे अनेक दलित तरूण संघटनेकडे आकर्षित झाले. त्यांनी नागपूर ते औरंगाबाद असा लाँग मार्च काढला. या लाँग मार्च मध्ये विविध पुरोगामी संघटना, दलित तरूणांनी सहभाग घेतला. त्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे सरकारने जिल्हाबंदीचे आदेश लागू केले. त्यांनी २५ जानेवारी १९९४ मध्ये दलित मुस्लिम अल्पसंख्याक सुरक्षा महामंडळाची स्थापना करून दलित आणि मुस्लिमांमध्ये ऐक्य घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

७. **मंडल आयोग लढा-** १९५३ साली सरकारने नेमलेल्या काकासाहेब कालेलकर आयोगाने २३९९ जातींना मागासवर्ग म्हणून घोषित केले होते पण या आयोगाचा अहवाल सरकारने स्वीकारला नाही. १९७७ च्या निवडणुकीत जनतापक्षाने कालेलकर आयोगाच्या शिफारशीच्या अंमलबजावणीचे आश्वासन निवडणुक जाहीरनाम्यात दिले होते. निवडणुकीनंतर जनता पक्षाचे सरकार आल्यानंतर बिहारचे मुख्यमंत्री कर्पुरी ठाकून यांनी इतर मागासवर्गीयांसाठी २६ टक्के राखीव जागाची शिफारश केली. त्यामुळे बिहारमध्ये राखीव जागाविरूद्ध आंदोलन सुरू झाले. या राखीव जागाच्या प्रश्नावरून

जनतापक्षातही तीव्र मतभेद निर्माण झाले. या प्रश्नाच्या सोडवणूकीसाठी मोरारजी देसाई यांनी १९७८ मध्ये न्यायमूती बी.पी.मंडल यांच्या अध्यक्षतेखाली आयोग निर्माण केला. या आयोगाने सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक निकषाच्या आधारावर भारतातील ३७४३ जाती इतर मागास जाती म्हणून जाहीर केल्या. या जातीना नोकरी, शिक्षण, स्थानिक स्वराज्य संस्था यात २७ टक्के राखीव जागा ठेवण्यात याव्या ही शिफारश केली. हा अहवाल येताच गुजराथ आणि बिहार राज्यात आंदोलन सुरू केले. दलित संघटनांनी मंडल आयोगाची अंमलबजावणी व्हावी म्हणून मोर्च, आंदोलने आणि विविध मार्गानी लढा दिला. पंतप्रधान व्ही.पी.सिंगानी मंडल आयोग लागू करण्याची घोषणा केल्यामुळे परत देशात दंगली सुरू झाल्या. त्यात अनेक सवर्ण तरूणांनी आत्मदहन केले. १९९१ निवडणुकीत सत्तेवर आलेल्या पी.व्ही. नरसिंहराव सरकारने मंडल आयोगाची अंमलबजावणी केली. त्यानंतर देशभर हा आयोग लागू झाला.

८. **रिडल्स प्रकरण व म. फुले बदनामी प्रकरण-** महाराष्ट्र शासनाने १९७६ साली तत्कालीन शिक्षणमंत्री सदानंद वर्दे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. आंबेडकरांचे समग्र लेखन आणि भाषणे प्रसिद्ध करण्यासाठी २४ सदस्यांची सल्लागार समिती नियुक्त केली. या समितीत आंबेडकरांचे राजकीय अनयायी, संशोधक आणि प्रसिद्ध लेखकांचा समावेश करण्यात आला. सल्लागार समितीसोबत संपादक मंडळही नियुक्त करण्यात आले. १४ एप्रिल १९८७ रोजी 'द रिडल ऑफ राम अँड कृष्ण' हे प्रकरण ग्रंथाच्या परिशिष्टात आंबेडकराच्या अप्रकाशित साहित्यातील चौथा खंडात समाविष्ट केल्यावरून वादंग निर्माण झाला. अमरावतीतील काही कार्यकर्त्यांनी न्यायालयात रिट दाखल केली. मराठा महासंघाने ' रिडल्स' ची प्रत जाळली. माधव गडकरी यांनी लेख लिहून टीका केली. महाराष्ट्रभर रिडल्सच्या निमित्ताने दलित आणि सवर्ण यात संघर्ष निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागली. वातावरण तणावपूर्ण झाल्याने सरकारने हे परिशिष्ट वगळल्याचा निर्णय जाहीर केला. या निर्णयामुळे अरूण कांबळे, भालचंद्र फडके यांनी संपादन समितीतील सदस्यांनी राजीनामे दिले. दलित चळवळीच्या नेत्यांनी हे लेखन वगळण्याचा निषेध करून आंदोलन सुरू केले. लेखकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या गळचेपी लोकशाहीविरोधी हा सूर लावला. त्यासाठी मुंबई मोर्चा काढला. परिवर्तनवादी शक्तीच्या दडपणामुळे समेट होऊन बाबासाहेबाचे खंड-४ मधील लेखन जसेच्या तसे प्रसिद्ध करण्याचा निर्णय झाला.

रिडल्स प्रकरणानंतर ग.वा.बेहरे यांनी पुण्याच्या ' साप्ताहिक सोबत' च्या ११ डिसेंबर १९८८ च्या अंकात बाळ गांगल ह्यांनी म. फुल्यावर बदनामीकारक लेख लिहीले. गांगल यांनी ' हा कसला महात्मा?' ' ही तर फुले दुर्गंधी?' या नावाचे लेख लिहून फुल्यांची मोठया प्रमाणावर निंदा केली. या लेखामुळे संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली. या टीकेला उत्तर देण्यासाठी हरी नरके, रमेश ढावरे यांनी संशोधनात्मक लेखन करून ग्रंथ प्रकाशित केले. या प्रकरणामुळेही दलित समाजात ऐक्य निर्मितीचे कार्य झाले.

९. **बामसेफ आणि बसपा-** महाराष्ट्रात पुणे येथे शासकीय सेवेत असतांना कांशीराम यांनी फुले आणि आंबेडकराच्या विचारांचा अभ्यास केला. त्यांनी महाराष्ट्र कार्य सुरू केले मात्र अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे उत्तर प्रदेशात दलितांची चळवळ सुरू केली. 'बामसेफ' ही शासकीय नोकरीत असलेल्या दलित कर्मचाऱ्यांची संघटना स्थापन केली. 'डी.एस. फोर' ही संघटना स्थापन करून दलित पँथरला पर्याय देण्याचा प्रयत्न केला. साप्ताहिक बहुजन नायक आपली मांडल राहिले. त्यांनी ' बहुजन समाज पार्टी' ची स्थापना करून सर्व देशातील दलितांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. जातीवादी, मनुवादी प्रवत्तींवर जोरदार हल्ला चढविला. उत्तर प्रदेशात या पक्षाला भरधोस पाठिंबा मिळाला. या पक्षाच्या मायावती चारवेळा उत्तरप्रदेशाच्या मुख्यमंत्री झाल्या. या पक्षाला उत्तरप्रदेश विधिमंडळात पूर्ण बहुमत मिळाले होते. या पक्षाला विदर्भात मात्र मोठया प्रमाणावर अनुयायी मिळाले. बसपाच्या निमित्ताने दलित समाजाच्या अपेक्षा मोठया प्रमाणावर उंचावल्या. रिपब्लिकन नेतृत्वाची उणीव हा पक्ष भरून काढेल हा विश्वास लोकांमध्ये निर्माण झाला. तत्त्वहीन राजकीय आघाडया, उत्तरप्रदेशाव्यक्तिरीक्त इतरत्र प्रभावाचा अभाव, नेतृत्वाकडून अवलंबिली जाणारी व्यक्तिपूजक वृत्ती, सत्ताकारण व अर्थकारणाला महत्त्व, तत्त्वप्रणालीतील गोंधळ इत्यादीमुळे हा पक्ष दलित समाजाचा अपेक्षित नेतृत्व देऊ शकला नाही. परंतु सद्यकाळात उत्तरप्रदेश सारख्या राज्यात बसपा पक्षाचा प्रभाव ओसरत चालेला दिसतो. यातून भावी काळात दलित नेतृत्वाची फार मोठी कसोटी लागणार आहे.

या पद्धतीने डॉ. आंबेडकर यांच्या निधनानंतर दलित चळवळीची थोडक्यात पार्श्वभूमी विशद करता येते.

**टिप- दलित चळवळीचे यशापयश किंवा मूल्यमापन-**

**दलित चळवळीचे यश-** दलित चळवळ ही भारतातील एक महत्त्वपूर्ण चळवळ मानली जाते. प्रत्येक चळवळींचा अभ्यास करतांना तिच्या यशापयशाचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण चळवळीच्या दोन्ही बाजूंचा जोपर्यंत शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करून अभ्यास केला जात नाही तोपर्यंत चळवळीबाबत भाकितकथन करणे योग्य होणार नाही. दलित चळवळीच्या यशाच्या विचार करता या चळवळीने अनेक नेते समाजाला उपलब्ध करून दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पासून ते मायावतीपर्यंत असे असंख्य नेते या चळवळीतून निर्माण झालेले दिसतात. या चळवळीचा सर्वांत मोठा लाभ म्हणजे दलित समाजात आत्मभान निर्माण झाले. हा गावकुसाबाहेर राहणारा समाज सर्व प्रकारच्या संधी आणि सवलतीपासून वंचित होता. या समाजाला चळवळीतून आत्मभान निर्माण झाल्यामुळे शिकू लागला आणि त्यांच्या जागृती येऊ लागली आणि तो आपल्या हक्कासाठी संघर्ष करण्यास तयार होऊ लागला. दलित चळवळींने केलेल्या नामांतर, भूमिहीन सत्याग्रह इत्यादी विविध चळवळीमुळे दलित समाजात अस्मितेची भावना निर्माण होऊन समाजात ऐक्य विकसित झाले. दलित चळवळीतून दलित साहित्याची निर्मिती झाली. आंबेडकरांच्या विचार प्रेरणेतून दलित समाजात अनेक साहित्यिक जन्माला आले. त्यांनी आत्मचरित्रात्मक स्वरूपात साहित्य प्रसिद्ध केले. सुरूवातीच्या काळात प्रस्थापित लेखकांनी या साहित्याला नाके मुरडली. सद्यःस्थितीत दलित साहित्य हा मराठी साहित्यातील प्रबोधनाचा प्रवाह मानला जातो. दलित चळवळी महाराष्ट्रातील इतर समाजघटकांना प्रेरणा मिळाली. विशेषतः दलित चळवळींने फक्त दलिताच्या प्रश्नापुरत्या चळवळी केल्या नाहीत. मंडल आयोग लागू करावा म्हणून संघर्ष केला. याचा परिणाम इतर वंचित जातीमध्ये देखील जागृती निर्माण झाली. आंबेडकर व फुल्यांच्या विचारापासून प्रेरणा घेऊन इतर मागासवर्गीय जाती आणि आदिवासीमध्ये चळवळी विकसित झाल्या. दलित समाजाचे आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनामागे चळवळीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली दिसते. ' शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' या मंत्रामधुन दलित समाजाच्या लोकांनी मोठया प्रमाणावर प्रेरणा घेऊन आपली शैक्षणिक प्रगती करून नोकऱ्या मिळविल्या त्यामुळे दलित समाजाची आर्थिक परिस्थिती बदली. आंबेडकरांच्या प्रेरणेने दलित समाजातील लोकांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यामुळे सांस्कृतिक परिवर्तनाला चालना मिळाली. हिंदू धर्मातील अनिष्ट रूढी आणि कर्मकांडापासून त्यांची कायमची सुटका झाली. बौद्ध धर्म जातिव्यवस्था, कर्मकांड यांना स्थान देत नसल्यामुळे समाजात एकात्मता आणि समतेला पूरक वातावरण निर्माण झाले. चळवळीमुळे दलित समाजाला राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात आरक्षण मिळाले. आरक्षणामुळे अनेक उच्च पदावर दलित समाजातील लोक कार्यरत असतांना दिसून येतात. राजकीय क्षेत्रात दलित ही फार मोठी शक्ती म्हणून उदयाला आलेली दिसते. या शक्तीचा विचार केल्याशिवाय कोणत्याही राजकीय पक्षाला पुढे जाता येणार नाही. म्हणून दलित समाजामध्ये राजकीय जागृती, शैक्षणिक जागृती, सांस्कृतिक परिवर्तन, आर्थिक परिस्थितीत बदल, एकात्मता, समतेचे आकर्षण, प्रगतीचा ध्यास इत्यादी सर्व गोष्टी दलित चळवळीमुळे निर्माण झालेल्या दिसतात. दलित समाज आज समाजातील सर्व क्षेत्रात अग्रेसर बनलेला दिसतो. त्याचे श्रेय दलित चळवळीला द्यावे लागेल. दलित चळवळीचे यश पुढील मुद्दाद्वारे थोडक्यात मांडता येते.

१) दलित चळवळीने दलित वर्गात त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली.
२) दलितांना जागृत व संघटीत करण्याबरोबर सुसंस्कार व वैचारिक चौकट विकसित करून दलिताचे सांस्कृतिकरण करण्याची महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली दिसते.
३) दलित चळवळीने दलित प्रश्नांना उचलून धरले. त्यांच्यावरील अन्यायाविरोधात मोर्चे, आंदोलने, घेराव, आत्मदहन, सत्याग्रह केले.
४) दलित चळवळीने मानवी हक्क व सामाजिक न्यायापासून वंचित दलित समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.
५) या चळवळीमुळे दलित समाजात आत्मभान व प्रेरणा विकसित होणास हातभार लागला.
६) दलित चळवळीमुळे दलिताची सामाजिक, राजकीय आणि आर्थिक गुलामगिरी नष्ट होण्यास मदत झाली. त्यातून दलितामध्ये राजकीय नेतृत्व निर्मिती, आरक्षण, नोकरीच्या संधी, आर्थिक परिस्थितीत बदल हे चांगले परिणाम घडले.
७) दलित चळवळीमुळे दलिताच्या सर्वांगीण विकासाला संधी मिळाल्यामुळे दलित साहित्य, दलित रंगभूमी, दलित कलाकार, दलित नेते निर्माण होऊ लागले.

८) दलित चळवळीच्या माध्यमातून दलितांच्या प्रश्नाला सार्वजनिक आवाज मिळाला. इतर समाजही त्यांच्याकडे प्रतिष्ठेने पाहू लागला.

**दलित चळवळीच्या मर्यादा वा अपयश-** दलित चळवळींमुळे दलित समाजाला प्रेरणा मिळालेल्या असला तरी या चळवळीच्या अनेक मर्यादा सांगितल्या जातात. या चळवळीला डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा अपवाद वगळता योग्य नेतृत्व मिळाले नाही. आंबेडकरांच्या निधनानंतर योग्य नेतृत्वाअभावी ही चळवळ दिशाहीन झालेली दिसून येते. चळवळीने काही काळ सामुहिक नेतृत्वाची कास धरलेली होती त्या नेतृत्वात एकी फार काळ टिकू शकली नाही. तसेच चळवळीतील नेतृत्वाने समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाकडे लक्ष देण्याऐवजी राजकीय क्षेत्रात सत्ता मिळविण्याला जास्त प्राधान्य मिळाले. चळवळीतील नेत्यांची नेतृत्वाची सत्ताकांक्षीपणा आणि निवडणुकाच्या राजकारणाला दिलेल्या महत्त्वामुळे चळवळीत गटबाजी, सत्तास्पर्धा, फाटाफूट, अंतर्गत संघर्ष, आरोपप्रत्योराप हे प्रकार घडू लागले. चळवळीतील नेत्यातील आपआपसांतील हेवादाव्यामुळे अनेक गट निर्माण केले. या गटांनी विविध राजकीय पक्षांना पाठिंबा दिल्यामुळे समाजातील ऐक्य संपुष्टात आलेले दिसते. दलित चळवळीला सर्वसमावेशक स्वरूप प्राप्त होऊ शकले नाही. या चळवळीच्या सुरूवातीला बाबासाहेबांच्या प्रभावाने सर्व जाती धर्मातील लोकांनी सहभाग घेतला. पाठिंबा दिला. मात्र नंतरच्या काळात नवबौद्धाकडेच चळवळीचे नेतृत्व आले. इतर समाजाला चळवळीत सहभागी करून घेण्यासाठी फारसे प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे ही चळवळ विशिष्ट समाजापुरती मर्यादित राहिली. दलितेतर, आदिवासी आणि इतर वंचित घटकांना चळवळीत समाविष्ट केल्याने ही चळवळ  विशिष्ट समाजापुरती मर्यादित राहिली. त्यातील फाटाफूटीमुळे समाजातील सर्व घटकांचा पाठिंबा मिळवू शकली नाही. चळवळीच्या वैचारिक पायातही संग्दिधता होती. आंबेडकरवाद की मार्क्सवाद यावरून चळवळीच्या संग्दिधता कमी न झाल्यामुळे चळवळीत अनेक गट निर्माण झालेले दिसतात. चळवळीची उभारणी भक्कम वैचारिक पायावर उभारणी करण्याऐवजी आरक्षण, नामांतर इत्यादीवर जास्त भर देण्यात आला. समाजपरिवर्तनाच्या लढयाकडे दुर्लक्ष केल्यामुळे चळवळ दिशाहीन झालेली दिसते. चळवळीत भावनिक प्रश्नावर सातत्याने समाज ऐक्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झाला. भावनिक ऐक्याचे संस्थात्मक ऐक्यात रूपांतर करण्यात आलेल्या अपयशामुळे दीर्घकालीन कार्यकर्ते मिळाले नाही. भावनिक प्रश्न निर्माण झाल्यावर समाज संघटित होत असे हा प्रश्न निवळल्यावर समाजातील ऐक्य दुंभगत असे हे चित्र वारंवार पाहायला मिळते. चळवळीला निष्ठावान कार्यकर्ते न मिळाल्याने चळवळी अपेक्षित यश मिळालेले दिसत नाही. दलित चळवळीचे दोष पुढीलप्रमाणे होत.

**१)** दलित चळवळीतील सर्वात महत्त्वाचा दोष म्हणजे दलित नेते व कार्यकर्ते यातील मतभेद, गटबाजी, सत्ताकांक्षाची वृत्ती, वैचारिक दिवाळखोरीतून चळवळीत विविध गट, उपगट निर्माण झाल्यामुळे संघटीतपणे लढा देण्याची शक्ती ही चळवळी गमावून बसल्यामुळे ही चळवळ कमकुवत ठरली.

**२)** बाबासाहेबांच्या निधनानंतर समर्थ नेतृत्व दलित चळवळीला न मिळाल्यामुळे सामुहिक नेतृत्व चळवळीने स्वीकारले परंतु हा सामुहिक नेतृत्वाचा प्रयोग फारसा यशस्वी झाला नाही. चळवळीतील नेता स्वतःला स्वायत्त मानू लागल्यामुळे चळवळी तडे गेले.

**३)** दलित चळवळीत कुशल संघटन, प्रभावी कार्यक्रम, भक्कम संघटनेचा अभावातून ही चळवळ गतिहीन बनलेली आहे.

**४)** दलित चळवळीने विधायक कार्याऐवजी राजकीय सत्तेला प्राधान्य दिल्यामुळे सर्वसामान्य जनतेचा पाठिंबा गमावून बसलेली दिसते.

**५)** दलित चळवळीने भक्कम वैचारिक चौकट विकसित करण्याऐवजी भावनिक व तात्कालीन मुद्दावर भर दिल्यामुळे केलेल्या चळवळींना अल्प यश प्राप्त झाले. चळवळीला ध्येयवादी कार्यकर्ते मिळाले नाहीत.

**६)** दलित चळवळीने इतर पद्दलित वर्गाला सामावुन घेण्याऐवजी एकाच जातीच्या आधारावर चळवळ उभी करण्याचा प्रयत्न केल्यामुळे इतर समाज घटकांचा पाठिंबा चळवळीला मिळू शकला नाही.

अशा प्रकारे दलित अत्याचाराच्या अनेक घटना सद्यकाळात घडतांना दिसतात. तसेच दलिताशी निगडीत अनेक समस्यांचे अद्याप निराकरण झालेले नसतांना ही चळवळ निष्प्रभ किंवा प्रभावहीन झालेली दिसते.

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्नोत्तरे-**

१. महाराष्ट्रातील दलित चळवळीच्या उदयाची दोन कारणे सांगा.
उत्तर- पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार, ब्रिटिश राजवटीचा परिणाम, बाह्मणाचे वर्चस्व ही कारणे होत.

२. डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेल्या दोन सामाजिक संस्थाची स्थापना नांवे लिहा.
उत्तर - डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारणी सभा, समता सैनिक दल या सामाजिक संघटना स्थापन केल्या.

३. डॉ.बाबासाहेबांनी सुरू केलेल्या दोन वर्तमानपत्राची नांवे सांगा.
उत्तर- डॉ.आंबेडकरांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता आणि प्रबुद्ध भारत ही वर्तमान पत्रे सुरू केली होती.
डॉ. आंबेडकर पूर्व दोन दलित समाजसुधारकांची नांवे लिहा.

४. उत्तर- गोपाळबुवा वलगंकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागुजी बंदसोडे, जाणोजी खंडारे, फत्तूजी शेडे हे आंबेडकर पूर्व दलित समाजातील समाजसुधारक होते.

५. दलित पँथरची स्थापना केव्हा झाली होती.
उत्तर- ९ जुलै १९७२ रोजी दलित पँथरची स्थापना झाली होती.

६. दलित पँथरच्या स्थापनेत सहभागी नेत्यांची दोन नांवे सांगा.
उत्तर- नामदेव ढसाळ, राजा ढाले, गंगाधर गाडे, भाई संगारे हे प्रमुख नेते पँथरच्या स्थापनेत सहभाग होता.

७. आंबडेकर पूर्व काळातील दोन सुवर्ण समाजसुधारकांचे नांवे सांगा.
उत्तर- सयाजीराव गायकवाड, शाहू महाराज, वि.रा. शिंदे हे आंबेडकरपूर्व काळातील प्रमुख समाजसुधारक सांगता येतात.

८. बाबासाहेब आंबेडकरानंतर दलित चळवळीने केलेली प्रमुख दोन आंदोलने कोणती?
उत्तर- भूमिहीनांचा लढा, नामांतर लढा, मंडल आयोग लढा हे आंबेडकरानंतर दलित चळवळीतील नेत्यांनी केलेली आंदोलने होत.

९. दलित समाजातील सद्यकालीन दोन नेत्यांची नावे लिहा.
उत्तर- रामदास आठवले, प्रकाश आंबडेकर, जोगेंद्र कवाडे आणि रा.सू.गवई हे दलित समाजातील सद्यकालीन नेते आहेत.

१०. डॉ. आंबेडकरांनी लिहिलेले दोन ग्रंथ कोणते?
उत्तर- आंबेडकरांन Castes in India, Thoughts on Pakistan, Untouchables, Budha and Karl Marx, Budha and his Dhamma, Who were the Shudras, States and Minorities, Who were the shudras इत्यादी ग्रंथ लिहिले.

११. डॉ. आंबेडकरांनी सुरू केलेल्या दोन वर्तमानपत्राची सुरू केले होते.
उत्तर- बाबासाहेबांनी मूकनायक, जनता, प्रबुद्ध भारत, बहिष्कृत भारत हे वर्तमानपत्रे सुरू केली होती.

१२. दलित म्हणजे काय?
उत्तर- डॉ. म.ना.वानखेडेयांच्या मते, दलित म्हणजे केवळ नव बौद्ध अथवा मागासवर्गीय नव्हे तर जे पिळले, छळले गेलेले, सर्व श्रमजीवी आहेत ते सर्व दलित आहेत.

१३. दलित चळवळ म्हणजे काय?
उत्तर- न्यु कास यांच्या मते, जातिच्या ऐतिहासिक प्रभुत्वांच्या विरोधात उभी राहणारी, सामाजिक न्याय प्रस्थापित करणारी, नवीन साहित्य संस्कृती, नवीन बांधिलकी निर्माण करणारी चळवळ म्हणजे दलित चळवळ होय.

१४. मध्य-प्रांत वऱ्हाडामधील दोन दलित समाजसुधारकांची नावे लिहा.
उत्तर- किसन फागूजी बंदसोडे, मुकूंदा शेत्र्ये, करणूजी मालगुजार, विठोबा रावजी मनुसंतपाडे, कालीचरण नंदागवळी, नानासाहेब गवई, गणेश अक्काजी गवई हे मध्य-प्रांतातील प्रमुख दलित समाजसुधारक सांगता येतात.

१५. बहिष्कृत हितकारणी सभेची केव्हा व कुठे स्थापना झाली होती.
उत्तर- २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारणी सभेची मुंबई येथे स्थापना झालेली होती.

## प्रकरण ३ रे
## संयुक्त महाराष्ट्र चळवळ

**प्र.१ ला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीवर निबंध लिहा?**

महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती पूर्वी द्विभाषिक मुंबई राज्य अस्तित्वात होते. त्यात कच्छ, सौराष्ट्र, मुंबई, कोकण व चार कानडी जिल्हांचा समावेश होता. १मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रात निजाम संस्थानातून मराठवाडा व वऱ्हाड प्रांतातून विदर्भ महाराष्ट्राला जोडून मराठी भाषिकांचे एक राज्य निर्माण करण्यात आले. कच्छ, सौराष्ट्र, गुजराथ हे भाग मिळुन गुजराथी बोलणाऱ्याचे गुजराथ राज्य निर्माण करण्यात आले. चार कानडी जिल्हे कर्नाटकला जोडण्यात आले.

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात संयुक्त महाराष्ट्र चळवळ ही अत्यंत महत्त्वाची घटना मानली जाते. संयुक्त महाराष्ट्राचा लढा हा एक प्रेरणादायी अध्याय मानला जातो. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे महाराष्ट्राच्या समाजकारण वा राजकारणावर दीर्घकालीन परिणाम झालेले आढळतात. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा लढा १९४६ ते १९६० असा दीर्घ काळ चाललेला दिसतो. त्यात त्या काळातील अनेक नेत्यांनी, विचारवंतानी आणि जनतेने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग घेतलेला होता.

**महाराष्ट्र नावाची उत्पती-**

मराठी भाषिक अनेक शतकापासून या प्रदेशात वास्तव्यास होते. पण महाराष्ट्र राज्य १ मे १९६० रोजी अस्तित्वात आले. महाराष्ट्र शब्दाचे विचारवंतांनी विविध अर्थ सांगितलेले आहेत. महाराष्ट्र म्हणजे मोठे व महान राष्ट्र, तर काहीच्या मते प्राकृतपासून निर्माण झालेल्या महाराष्ट्र भाषेवरून प्रदेशाचे नाव महाराष्ट्र पडले. काहीच्या मते 'राष्ट्रीक' असा समुदाय होता त्या समुदाय वास्तव्य होता. त्या वास्तव्य असलेला प्रदेश म्हणजे महाराष्ट्र होय. महाराष्ट्र शब्दाची उत्पत्ती 'रटठ' नावाच्या प्राचीन जातीतून झाली यावरून 'महाररठ अर्थात महाराष्ट्र' हे नाव पडले तर डॉ. आंबेडकरांच्या मते, 'महार' नावाच्या अस्पृश्य जातीतून महाराष्ट्र हे नामकरणे झाले असावे. राजारामशास्त्री भागवत यांनी देखील 'महारांचे राज्य म्हणजे महाराष्ट्र' हे मत मांडले. डॉ. काणे यांनी महान राष्ट्र ते महाराष्ट्र तर चि.वि.वैध यांनी मल्ल लोकांचे राष्ट्र ते महाराष्ट्र तसेच मराठा शब्दापासून महाराष्ट्र नाव पडल्याचे अभ्यासकांचे मत आहे. महाराष्ट्र शब्दाच्या अर्थाबाबत अनेक अभ्यासकांनी विविध मते मांडलेली आहेत. मात्र श्री.चक्रधर, ज्ञानेश्वर यांनी मराठी भाषेचा व महाराष्ट्राचा स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे. यावरून महाराष्ट्र ही संकल्पना मध्ययुगीन काळापासून अस्तित्वात असल्याचे आढळून येते.

**संयुक्त महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी:-** महाराष्ट्र हा प्रांत इतिहासात कधीही एकछत्री साम्राज्याच्या राजवटीखाली नव्हता. १२ व्या शतकात उदयाला आलेल्या देवगिरीच्या यादवांच्या साम्राज्यात बहुसंख्य मराठी भाषिक प्रदेश अंमलाखाली आलेला होता. यादवाचे साम्राज्य १३ व्या शतकात अल्लादीन खिलजीने नष्ट केले. त्यानंतर बहामनी राज्याची स्थापना हसन गंगु बहामनी यांनी केली. अंतर्गत सत्तासंघर्षातून या राज्याचे पाच तुकडे होऊन पाच पातशाहया निरनिराळया प्रदेशावर राज्य करीत होत्या. महाराष्ट्राच्या उत्तर भाग दिल्लीच्या मोगल बादशहाच्या ताब्यात होता. कोकण आणि देशावरच्या काही भागात सतराव्या शतकात शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. मात्र खानदेश, वऱ्हाड, मराठवाडा आणि महाराष्ट्रातील बराचसा मुलूख स्वराज्याबाहेर होता. पेशवेकाळात पेशवाच्या आक्रमक आणि विस्तारवादी धोरणातून उत्तरेकडील मुलूखावर स्वाऱ्यांना सुरूवात झाली. या स्वाऱ्यांना यश आल्याने उत्तरेकडे पेशवाच्या राज्याचा विस्तार झाल्याने बहुतेक मराठी प्रदेश पेशव्यांच्या नियंत्रणाखाली आला. दुर्बळ मध्यवर्ती सत्ता आणि अंतर्गत सत्तासंघर्षामुळे उत्तर पेशवेकाळात सरदारांनी स्वतंत्रपणे राज्यकारभार हाकण्यास सुरूवात केली. १९ व्या शतकात ब्रिटिशांनी एतद्देशीय राज्यकर्त्यांचा पराभव करून आपले साम्राज्य निर्माण केले. १८१८ मध्ये पेशवाचा पराभव करून पेशवेशाही नष्ट केली. पेशवेशाहीतील पश्चिम महाराष्ट्राचा भाग मुंबई इलाख्यात समाविष्ट केला. वऱ्हाड भाग नागपूरकर भोसले आणि निजामाकडून काही भाग काढून मध्यप्रांतात समाविष्ट केला. मराठी वस्ती असलेला मराठवाडयाचा प्रदेश हैद्राबाद संस्थान

समाविष्ट केला. अशा प्रकारे संपूर्ण मराठी भाषिक प्रदेश गेल्या सातशे-आठशे वर्षापासून एकाच राजवटीच्या नियंत्रणाखाली येऊ शकला नाही. तो विविध राजवटीत विखुरलेला राहिला.

१९ व्या शतकात ब्रिटिश राजवट भारतभर पसरली. त्यांनी केलेल्या भौतिक व प्रशासकीय सुधारणा, पाश्चिमात्य शिक्षणातून भारतीयात राष्ट्रीयत्वाची भावना विकसित होऊ लागली. वाढत्या राजकीय जागृतीतून राजकीय सत्तेत भागीदारी मिळविण्यासाठी आकांक्षा भारतीयांमध्ये विकसित होऊ लागली. त्यासाठी भारतीयांनी राजकीय संघटना निर्मितीस प्रारंभ केला. भारतीयांच्या वाढत्या महत्त्वाकांक्षेला सनदशीर मार्गाने आकार देण्यासाठी आणि असंतोष कमी करण्यासाठी ब्रिटिशांच्या प्रेरणेने एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. विसाव्या शतकातील विविध कर्तृत्ववान नेतृत्वामुळे राष्ट्रीय सभेचा प्रभाव भारतभर पसरला. राष्ट्रीय भावनेच्या विकासासोबत भारतातील भाषिक आणि भौगोलिक विविधतेमुळे प्रादेशिक अस्मिताही विकसित होऊ लागली. भारतीयाचा अंसतोष कमी करण्यासाठी आणि राजकीय सहभागाच्या वाढत्या मागण्यांना नियंत्रित करून मर्यादित प्रमाणात सत्ता देण्यासाठी १९१९ चा सुधारणा कायदा ब्रिटिशांनी संमत केला. या कायद्याअन्वये ब्रिटिशांनी स्थानिक व प्रादेशिक बाबतीत मर्यादित प्रमाणात स्वायत्ता दिली. द्विदल राज्यपद्धती स्वीकारून भारतीयांना मर्यादित प्रमाणात राजकीय सत्तेत वाटा दिला. भारतीयांच्या राजकीय सहभागाच्या वाढत्या मागणीमुळे ब्रिटिशांनी १९३५ च्या भारत प्रशासन कायदयाने संघराज्यात्मक शासन पद्धतीला मान्यता दिली. दुसरे महायुद्ध आणि ब्रिटिशांनी सुरू केलेली सत्तांतराची प्रक्रिया यामुळे या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊ शकली नाही. १९३५ च्या कायदान्वये निर्माण केलेले संघराज्य घटनाकारांनी स्वीकारले. परंतु हे संघराज्य भाषिक तत्त्वावर आधारित नसून ब्रिटिशांनी प्रशासनाच्या सोयीसाठी निर्माण केलेल्या प्रांतावर आधारित होती.

**महाराष्ट्र एकीकरण प्रयत्नः-**

महाराष्ट्र एकीकरणाचे प्रयत्न इंग्रजी राजवटीच्या काळातच सुरू झालेले होते. महाराष्ट्रातील तत्कालीन विद्धवान, नेतेमंडळी व विचारवंत महाराष्ट एकीकरणासाठी प्रयत्न करत होते. त्यात न. चिं. केळकर, जयपूरचे विठ्ठल ताम्हणकर, ज्ञानकोशकार श्री. व्यं. केतकर, आचार्य विनोबा भावे, धनजंयराव गाडगीळ, प्रबोधनकार के. सी. ठाकरे, ग. वि. पटवर्धन, शंकर रामचंद्र शेंडे, ग. त्र्यं. माडखोलकर इत्यादींचा समावेश होता. हिंदू-मुस्लिम समाजात फूट पाडण्याच्या हेतूने लार्ड कर्झनने केलेली बंगालची फाळणी लोकमताच्या दडपणातून ब्रिटिशांनी १९११ साली रद्द केली. या घटनेबाबत केसरी वर्तमानपत्रात 'भाषा व राष्ट्रीयत्व' या शीर्षकाचा न. चिं. केळकरांचा लेख प्रसिद्ध झाला होता. या लेखात 'मराठी भाषा बोलणाऱ्यांची सर्व लोकसंख्या एका अंमलाखाली असावी' अशी शिफारश वजा सूचना केली. या लेखाचे संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या इतिहासातील स्थान स्पष्ट करतांना य. दि. फडके यांनी 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' पुस्तकात मत मांडतात, "महाराष्ट्रीय लोक आपल्या फाळणीसंबंधाने चळवळ करावी असे म्हणत नाहीत याकडे ही तात्यासाहेब केळकरांनी इंग्रज राज्यकर्त्यांचे लक्ष वेधले." महाराष्ट्राच्या मागणीबाबत जनमाणसांत फारशी उत्सुकता वा प्रतिसाद नसल्याचे अप्रत्यक्षपणे केळकरांनी नमूद केलेले आहे. राष्ट्रीय सभा भाषिक राज्यास पहिल्यापासूनच अनुकूल होती. म्हणून भाषिक राज्य निर्माण होणे आवश्यक आहे असा ठराव अहमदाबाद येथे १९२१ साली भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात मंजूर केला. या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी भाषेच्या आधारावर प्रांतिक काँग्रेस समितीच्या स्थापना करण्यात आल्या. विठ्ठल ताम्हणकर यांनी 'लोकशिक्षण' मासिकात 'तिभंगलेला महाराष्ट्र' हा लेख महाराष्ट्राच्या नकाशासहित प्रसिद्ध केला. त्या लेखात ते म्हणतात की, "ब्रिटिशांच्या ताब्यातील मुंबई व मध्य प्रांत-वऱ्हाड प्रांतातील एतद्देशीय संस्थानातील आणि पोर्तुगिजांच्या हुकूमाखालील मराठी भाषिकांचा मुलूख एकत्र करावा." या लेखात ताम्हणकरांनी स्पष्टपणे संपूर्ण मराठी भाषिक प्रदेश एकाच राजवटीखाली आणण्याची मागणी करून संयुक्त महाराष्ट्र निर्मितीबाबत अप्रत्यक्षपणे संकेत दिलेले दिसतात. ग. वि. पटवर्धन यांच्या 'ज्योत्स्ना' मासिकाने संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर जनमताचा रोख लक्षात घेण्यासाठी महाराष्ट्रातील ४० नामवंत नेते आणि प्रसिद्ध लेखकांकडून प्रश्नावली भरून माहिती जमा केली. तसेच त्यांच्या मुलाखती घेऊन त्यात व्यक्त केलेल्या मतांचा सारांश छापला. उज्जैन येथे ६ जानेवारी १९४० रोजी मराठी वाङ् मय मंडळाचे संमेलन भरले. या संमेलनाचे अध्यक्ष ग. त्र्यं. माडखोलकरांनी 'महाराष्ट्राचे युद्धोत्तर भवितव्य' या विषयावर भाषण देतांना म्हणाले, "नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यत पसरलेला सारा मराठी मुलूख एका राजकीय सत्तेच्या, एका मध्यवर्ती विद्यापीठाच्या आणि एका सर्वव्यापी राष्ट्रसंस्थेच्या छत्राखाली आणावयाचा, महाराष्ट्रातील एका रक्ताच्या आणि एका भाषेच्या लोकांचे मुलताई पासून मडगाव

पर्यत एकसंघ राष्ट्र निर्माण करावयाचे हे ध्येय आपण वाढीस लावले पाहिजे." या भाषणात माडखोलकरांनी सर्व मराठी भाषिक प्रदेश एका राजकीय व्यवस्थेच्या नियंत्रणाखाली संयुक्त महाराष्ट्र चळवळीला चालना देण्यायोग्य भूमिका मांडलेली आढळते. संयुक्त महाराष्ट्राचे समर्थन विनोबा भावे यांनी आपल्या 'महाराष्ट्र धर्म' ग्रंथात केलेले आहे.

**संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा उदय-**

संयुक्त महाराष्ट्र चळवळीची प्रमुख मागणी म्हणजे मराठी भाषिकांचा महाराष्ट्र हा प्रांत व्हावा व मुंबई महाराष्ट्राला मिळावी. संयुक्त महाराष्ट्र चळवळीला चालना देण्यासाठी १९४० मध्ये बॅ.रामराव देशमुख यांच्या अध्यक्षेखाली संयुक्त महाराष्ट्र सभेची मुंबई येथे स्थापना झाली. त्या सभेने महाराष्ट्र एकीकरण परिषद बोलवून संयुक्त महाराष्ट्राबाबत चर्चा व विचारविनिमय घडवून आणला. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने हा पहिला संघटनात्मक प्रयत्न झालेला आढळतो. केंद्रीय नेतृत्वाच्या भाषावार प्रांतरचनाविरोधी दृष्टिकोनामुळे महाराष्ट्रातील काँग्रेस नेतृत्वाने या सभेच्या प्रयत्नाकडे दुर्लक्ष केले. तत्कालीन परिस्थितीत भाषावार प्रांत रचनेला अनुकूल वातारण नसल्यामुळे या सभेच्या कामाकडे कोणाचेही लक्ष गेले नाही. या सभेने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला प्रत्यक्ष चालना देण्यासाठी दि. २४ मे १९४० रोजी महाराष्ट्र एकीकरण आयोजित केली. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार या परिषदेचे स्वागताध्यक्ष होते तर डॉ. तु. ज. केदार हे अध्यक्ष होते.

**बेळगाव साहित्य संमेलनः-**

विसाव्या शतकातील १९४६ हे साल महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील महत्त्वपूर्ण वर्ष मानले जाते. या वर्षात बेळगाव येथे भरलेल्या साहित्य संमेलनात संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसंदर्भात ठराव संमत झाला. १२ मे १९४६ रोजी बेळगाव येथे श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली तिसावे मराठी साहित्य संमेलन भरले. संमेलनात भाषण करतांना त्यांनी वऱ्हाडचा प्रदेश ब्रिटिश अंमलाखाली, मराठावाडा हा निजामाच्या आणि गोमंतकचा प्रदेश पोर्तुगीज अशा वेगवेगळया तीन राजवटीच्या अंमलाखाली होता. या तीन प्रदेशातील जवळजवळ ९० लाख लोकवस्तीचे वास्तव्य असल्याच्या सत्यपरिस्थितीचे कथन करून मोडखोलकरांनी महाराष्ट्रातील सर्व पक्षांच्या, जातींच्या आणि धर्माच्या कार्यकर्त्यांना महाराष्ट्राच्या एकीकरणासाठी पुढे येऊन प्रयत्न करण्याचे आवाहन केले. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी प्र. के. अत्रे यानी विषय नियामक समिती आणि खुल्या अधिवेशनात 'संयुक्त महाराष्ट्र समिती' स्थापन करण्यात यावी हा ठराव मांडला. या ठराव मांडताना अत्रे म्हणाले, "संयुक्त महाराष्ट्रनिर्मिताचा हा प्रश्न सर्व मराठी भाषिकांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. केवळ या एकासाठी हे संमेलन भरले होते एवढे जरी नमूद झाले तरी महाराष्ट्राच्या इतिहासात हे संमेलन अमर होईल यात मुळीच शंका नाही." साठ वर्षापूर्वी अत्र्यांनी व्यक्त केलेले भाकितकथन खरे ठरले आहे. अशा पद्धतीने साहित्य संमेलनाच्या अधिवेशनातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा जन्म झाला. संमेलनात चळवळ चालविण्यासाठी तात्पुरत्या 'तयारी समिती' ची स्थापना केली. अशा प्रकारे या चळवळीचा प्रारंभ साहित्य संमेलनाच्या व्यासपीठापासून झालेला दिसतो. या संमेलनात लेखकांनी केलेल्या आवाहनास प्रतिसाद म्हणून २६ जुलै १९४६ रोजी मुंबईत सर्वपक्षीय संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना करण्यात आली. या परिषदेने संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबाबत विचारविनिमय करण्यासाठी २८ जुलै १९४६ रोजी परिषद भरविली. श्री. एस. के. पाटील हे या परिषदेच्या स्वागत समितीचे अध्यक्ष होते. या परिषदेत सहभागी विचारवंत आणि नेत्यांनी गोव्यासहित सर्व मराठी भाषिक प्रदेश एकसंघ करण्याची मागणी केली. या परिषदेत श्री. शंकरराव देव, श्री. भाऊसाहेब हिरे, श्री. धनंजयराव गाडगीळ, आचार्य दादा धर्माधिकारी, आचार्य अत्रे, एस. एम. जोशी आदि नेत्यांनी सहभाग घेतला. अशा विविध घटनातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे बीजारोपण झालेले दिसते.

**राज्य पुनर्रचना आयोग-**

भारतीय राजकारणात भाषावार प्रांतरचन अत्यंत गुंतागुंतीचा, किचकट आणि तणावपूर्ण मुद्दा राहिलेला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील बहुभाषिकतेमुळे सर्व प्रांतात भाषावार प्रांतरचनेच्या मागण्या होऊ लागल्या. जनमताच्या वाढत्या दडपणातून आणि या प्रश्नाचा सर्वांगीण अभ्यास करण्यासाठी घटना समिती आणि केंद्रसरकारने विविध आयोग स्थापन केले. ते आयोग पुढील प्रमाणे होत.

**टिप- १) दार आयोग-**

भाषावार प्रांत रचनेचा अभ्यास करण्यासाठी घटना समितीने १९४८ मध्ये दार कमिशनची नियुक्ती केली. न्यायमूर्ती दार हे या कमिशनचे अध्यक्ष होते. या आयोगात जगतनारायण लाल व पन्नालाल हे सदस्य होते. भाषावार प्रांत रचनेचा अभ्यास करून कमिशने आपला अहवाल १३ डिसेंबर १९४८ ला सादर केला. या अहवालात भाषावार प्रांतरचनेच्या विरोधात मत प्रदर्शित केले. भाषावार प्रांत रचना केल्यास भारतीय संघराज्याला धोका आहे. तसेच प्रांताची पुनर्रचना ही केवळ भाषेच्या आधारावर करणे व्यापक राष्ट्रहिताच्या दृष्टीने करणे घातक आहे, हे मत मांडले. म्हणून भाषावार प्रांतरचना करून नये ही शिफारश व सल्ला आयोगाने दिला. तसेच मराठी भाषा बोलणाऱ्याचे सलग राज्य निर्माण करू नये. त्या राज्यामुळे संघराज्याच्या सुरक्षिततेला धोका आहे हे मत स्पष्टपणे मांडले. वास्तविक संयुक्त महाराष्ट्र परिषदेस प्रश्नावली दिली होती. याशिवाय परिषदेने एक प्रभावी योजना कमिशनला सादर केली होती. तरीही प्रांतरचनेबद्दलच्या पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनामुळे हा प्रश्न सोडविण्याऐवजी गुंतागुंतीचा करण्यास हातभार लावला. हा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर महाराष्ट्राच्या जनतेत संतापाची लाट पसरली मात्र संयुक्त महाराष्ट्र परिषदेने या अहवालावर प्रतिक्रिया दिली नाही. कारण काँग्रेसच्या होणाऱ्या जयपूर अधिवेशनात आपल्याला न्याय मिळेल अशी त्यांना अपेक्षा होती. या अधिवेशनात अहवालावर सविस्तर चर्चा होऊन महाराष्ट्रीयन जनतेचे समाधान होईल हा कयास होता.

१९५३ ते ५५ या काळात देशभर सर्वत्र भाषावार प्रांत रचनेची मागणी सुरू झाली. आंध्रप्रदेशमध्ये तेलगू भाषिक स्वतंत्र आंध्रपद्रेश राज्याच्या निर्मितीसाठी पोट्टी श्रीरामलू या गांधीवादी नेत्यांनी ५८ दिवस आमरण उपोषण सुरू केले. सरकारने उपोषणाकडे दुर्लक्ष केल्याने त्यांच्या उपोषण सुरू असतांना मृत्यू झाला. या घटनेमुळे तेलगू भाषिक राज्यात सर्वत्र दंगे व आंदोलने सुरू झाली. या आंदोलन आणि सर्वत्र हिंसक वातावरणात निर्माण झालेला तणाव निवळण्यासाठी केंद्र सरकारने भाषिक तत्त्वांवर सर्वप्रथम डिसेंबर १९५३ मध्ये आंध्रपद्रेश या भाषिक राज्याची निर्मिती केली. आंध्रपदेश राज्याच्या निर्मितीमुळे सर्वत्र भाषावार प्रांतरचनेची मागणी पुढे येऊ लागली.

**टिप-२) जे.व्ही.पी.कमिशन-**

देशभर भाषावार प्रांतरचनेच्या मागण्या सुरू झालेल्या होत्या. त्या मागण्याचा सत्ताधारी काँग्रेस सकारात्मक विचार करण्यासाठी एक समिती निर्माण करण्याचा विचार चालू होता. प्रत्यक्षात भाषावार प्रांतरचनेचा अभ्यास करण्यासाठी काँग्रेसच्या जयपूर अधिवेशनात समिती नेमण्यात आली. या समितीत जवाहरलाल नेहरू, वल्लभाई पटेल, पट्टाभी सितारामय्या हे सदस्य होते. या समितीने भाषावार प्रांत रचनेचे तत्व मान्य केले. पण हे तत्व व्यवहारात आणण्यास हा काळ योग्य नाही. देशाच्या विकासावर लक्ष केंद्रीत करण्याची सद्य परिस्थिती गरज असल्याने योग्य काळ आल्यास भाषावार प्रांतरचना करता येईल हा उपदेशवजा सल्ला ही दिला. या समितीने संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सोडविण्यासाठी दार कमिशनपेक्षा वेगळी परंतु महाराष्ट्रावर अन्याय करणारी शिफारश केली. या समितीने मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र ऐवजी मुंबई वगळून महाराष्ट्र राज्याची शिफारस केली. या अहवालावर तीव्र प्रतिक्रिया संयुक्त महाराष्ट्र परिषदेकडून झाली पाहिजे होती. पण परिषदेचे अध्यक्ष शंकरराव देव हे पंडित नेहरू व सरदार पटेलाच्या दडपणामुळे अपेक्षित भूमिका घेऊ शकले नाहीत. मुंबईची मागणी परिषदेने सोडून द्यावी यासाठी शंकरराव देवांना काँग्रस अध्यक्षपद देऊ केले होते. परंतु त्यांनी ही सौदेबाजी नाकारली. परिणामतः वरिष्ठ नेत्यांच्या चालढकल आणि सौदेबाजीच्या धोरणामुळे हा प्रश्न सुटू शकला नाही. समितीने भाषावार प्रांतरचनेची अजून वेळ आलेली नाही. याबाबत जनइच्छा तीव्र जरी असतील तर राष्ट्रहिताच्या काही मर्यादा लक्षात घेऊन भावी काळात हा प्रश्न सोडविला जाईल असे गुळगूळीत उत्तर देऊन काँग्रेस श्रेष्ठींनी हा प्रश्न निकालात काढण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

**टिप-३) फाजल अली कमिशन-**

भाषिक राज्याचा प्रश्न दिवसेंदिवस चिघळत चालला होता. लोकमताचा वाढता दबाब सरकारवर येऊ लागला. वाढत्या दबाबातून सरकारे भाषिक राज्याच्या प्रश्नांचा फेरविचार करण्यासाठी २२ डिसेंबर १९५३ रोजी फाजल अली कमिशन नेमण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश फाजल अली हे या कमिशनचे अध्यक्ष होते. श्री.एस.के.पण्णीकर, श्री.हृदयनाथ कुंझरू हे सदस्य होते. कमिशनने ऑक्टोबर १९५५ मध्ये आपला अहवाल प्रसिद्ध केला. या कमिशनने मुंबई राज्यातील चार कानडी जिल्हे जोडून कर्नाटक राज्याची निर्मिती सूचविली. नव्या मुंबई राज्यात कच्छ, सौराष्ट, पश्चिम

महाराष्ट्र, मराठवाडा, मुंबई इ.भागाचा समावेश केला. विदर्भाचे स्वतंत्र राज्य असावे ही शिफारस केली. हा आयोग मुंबई शहर व गुजराथ मधील हितसंबंधी गटाच्या दडपणाला बळी पडल्याने अपेक्षित भूमिका घेऊ शकला नाही. या आयोगाने मुंबईच्या कायदेमंडळात गुजराथी व मराठी बोलणाऱ्याचा समतोल साधण्याचा प्रयत्न केला. या आयोगाच्या अहवाला विरूद्ध महाराष्ट्रात संतापाची लाट पसरली. या आयोगाने हैद्राबाद राज्याची भाषावार विभाजनाची सूचना केली. केरळ राज्य निर्मिती शिफारस केली. मात्र महाराष्ट्राच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. या आयोगाच्या अहवाला विरूद्ध सेनापती बापट, गाडगे महाराज यांनी संयुक्त महाराष्ट्र महामंडळा मार्फत प्रभात फेऱ्यांच्या माध्यमातून जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. या आयोगाच्या शिफारशी विरूद्ध मुंबईत प्रचंड निर्दशने निघाली. त्यावेळचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी पोलिसी कारवाई करून निर्देशने दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. पोलिसी कारवाईस निर्दशक जुमानत नसल्याचे पाहून गोळीबाराचा वापर निर्दशकांवर करण्यात आला. त्यात १५ लोकांचे प्राण गेले. अशा प्रकारे शांततेच्या मार्गाने प्रश्न सोडविण्याची आकांक्षा धूसर होत गेली. महाराष्ट्राच्या मागणीसाठी लोकांना रक्त सांडावे लागले.

**टिप- नागपूर करार-**

नागपूर करार करण्यामागे संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला सर्वांचा एकमुखा पाठिंबा मिळावा आणि स्वतंत्र विदर्भाची मागणी विदर्भातील नेत्यांनी मागे घेऊन महाराष्ट्रात समाविष्ट व्हावे आणि विदर्भातील नेत्यामध्ये महाराष्ट्राचे भय नष्ट व्हावे या व्यापक हेतूने करण्यात आला. नागपूर करारापूर्वी अकोला करार (८ ऑगस्ट १९४७) रोजी करण्यात आला होता. तरीही काही विदर्भातील नेते सातत्याने वेगळया विदर्भाची मागणी करत होते. परंतु जेव्हीपी समितीने स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी फेटाळली होती. परंतु भविष्यात येऊ संयुक्त महाराष्ट्रातील सर्व विभागाना समान संधी व दर्जा प्राप्त झाला पाहिजे यासाठी करार झाला पाहिजे ही मागणी पुढे आली. म्हणून अकोला करार रद्द करून नवा करार करण्यात आला त्यास नागपूर करार या नावाने ओळखले जाते.

संयुक्त महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची घटना म्हणजे नागपूर करार होय. या कराराचे संपूर्ण महाराष्ट्रात स्वागत करण्यात आले. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीस नागपूर करारामुळे संपूर्ण महाराष्ट्राचा एकमुखी पाठिंबा मिळालेला होता. या करारावर एकूण १२ नेत्यांनी सह्या केल्या. महाराष्ट्रा तर्फे भाऊसाहेब हिरे,यशवंतराव चव्हाण,देवकीनंदन नारायण तर विदर्भा तर्फे पी.के.देशमुख, बॅ.वानखेडे, श्री.रा.कृ.पाटील तर मराठवाडा तर्फे देवीसिंग चौहान, सौ.प्रभावती जकातदार इ.नी सह्या केल्या. डॉ.पंजाबराव देशमुख, शंकरराव देव, स्वामी रामानंद तीर्थ, वसंतराव नाईक यांनीही चर्चेत भाग घेऊन एकमताने करारास मान्यता दिली. या कराराची कलम पुढीलप्रमाणे

१) घटक राज्याची पुर्नरचना करतांना मराठी भाषिकांचे एक सलग भाषिक राज्य बनविण्याचा निर्णय घेणे.

२) मुंबई, मध्यप्रदेश आणि हैद्राबाद या राज्यातील मराठी भाषिकांचे एक राज्य बनविण्यात यावे. त्याला महाराष्ट्र किंवा मराठी प्रदेश असे संबोधिण्यात यावे. त्याची राजधानी मुंबई असावी.

३) राज्याचा विकास आणि राज्यकारभाराच्या दृष्टीने नागविदर्भ, मराठवाडा व प.महाराष्ट्र ते तीन विभाग असावेत.

४) या विभागाच्या विकासासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात अनुदान देण्यात यावे. मराठवाडा मागासलेला असल्याने त्या भागाच्या विकासाकडे अधिक लक्ष देण्यात यावे.

५) प्रत्येक विभागाला लोकसंख्येच्या प्रमाणात मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व द्यावे.

६) सर्व शैक्षणिक संस्था व व्यावसायिक आणि तांत्रिक संस्था मध्ये प्रवेश देतांना लोकसंख्येच्या आधारावर प्रवेश द्यावा.

७) मुंबई येथे उच्च न्यायालय असावे. दुसरे न्यायालय नागपूरला असावे. त्या न्यायालयामध्ये नागविदर्भाचे काम पाहावे. त्या न्यायालयात न्यायालयात न्यायाधीश,सरकारी नोकर नेमतांना नागविदर्भ विभागाला प्राधान्य दयावे.

८) विदर्भातील लोकसंख्येच्या प्रमाणात सरकारी नोकऱ्या मिळतील. राज्यात सत्तेचे विकेंद्रीकरण असावे.

९) नागपूर महाराष्ट्राची उपराजधानी असावी. वर्षातून विधीमंडळाचे एक अधिवेशन नागपूरला भरवावे.

१०) खेडे मूलभूत घटक मानुन लोकसंख्येच्या प्रमाणात जिल्हाची मर्यादा ठरवून सर्व मराठी भाषिक प्रदेश नवीन राज्यात समाविष्ट करावा.

नागपूर येथे झालेल्या ११ कलमी करारामुळे मुंबई सह संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण होण्यास मदत झाली. हा करार करण्याचे सर्व श्रेय श्री.भाऊसाहेब हिरे यांना दिले जाते.

**त्रिराज्य योजना-**

राज्य पुनर्रचना मंडळाचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर महाराष्ट्र व गुजराथ मधील काँग्रेस नेते आणि दिल्लीचे काँग्रेसचे श्रेष्ठी यांनी महिनाभर चर्चा केल्यानंतर काँग्रेसच्या वर्किंग कमिटीने आणि नेहरूनी विदर्भासह महाराष्ट्र, मुंबईचे स्वतंत्र राज्य आणि गुजराथ राज्य अशी त्रिराज्य योजना मांडली. या योजनेला मान्यता मिळविण्यासाठी मुंबई विधीमंडळाचे खास अधिवेशन बोलवण्यात आले. या निर्णयामुळे सरकारच्या धोरणाचा निषेध आणि विरोध करण्यासाठी व जनतेचे मत विधिमंडळ सदस्यांना कळविण्यासाठी कौन्सिल हॉलवर मोर्चा काढण्याची विनंती परिषदेचे सर्वाधिकारी शंकरराव देव यांना करण्यात आली. पण शंकरराव देवानी नकार दिल्यामुळे इतर विरोधी पक्षांनी निर्देशने व आंदोलने करण्यासाठी तात्पुरती कृती समिती नेमली. मुंबईत सहा दिवस पोलिस व आंदोलकात चकमकी झाल्यात मुख्यमंत्री मोरारजी देसाईनी गोळीबाराचा आदेश दिला. गोळीबारात ९० आंदोलनकर्ते हुतात्मे झाले. पश्चिम महाराष्ट्रात ठिकठिकाणी संप व आंदोलने झाली. त्याचा परिणाम विधिमंडळ सदस्यांवर झाला. काहीनी राजीनामा देण्याची तयारी दर्शविली. अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख यांनी महाराष्ट्राच्या प्रश्नावरून आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यामुळे आंदोलकांना नैतिक पाठबळ मिळाले. प्र.के.अत्रे, कॉम्रेड डांगे, प्रबोधनकार ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलने झाली. शाहीर अमर शेखने 'जागा मराठा आम जमाना बदलेगा' या गाण्याने आंदोलकमध्ये रोमांच उभे राहिले. वाढत्या आंदोलनामुळे त्रिराज्य योजनेचा ठराव मागे घेऊन मुंबई विधिमंडळाचे विशेष अधिवेशन स्थगित केले.

**संयुक्त महाराष्ट समिती-**

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी सर्व पक्षिय नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना केली होती. मात्र या परिषदेत काँग्रेसच्या नेत्याचा जास्त समावेश होता. शंकरराव देव, भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण इ.नेत्यांनी नेहरूंच्या दबाबामुळे संयुक्त महाराष्ट्राबद्दल कणखर भूमिका घेतली नाही. त्यामुळे ही परिषद निरर्थक व कुचकामी ठरली. त्यामुळे परिषदेच्या जागी संयुक्त महाराष्ट्रासाठी लढाऊ पद्धतीने चळवळ उभी करणाऱ्या संघटनेची गरज निर्माण झाली. त्यासाठी सर्व (११ विरोधी घटक पक्ष) विरोधी पक्ष नेत्यांनी एकत्र येऊन पुण्यात ६ फेब्रुवारी १९५६ रोजी संयुक्त महाराष्ट्र कृती समिती या नव्या संघटनेची स्थापना करण्यात आली. ही संघटना कार्य करू लागल्यानंतर 'संयुक्त महाराष्ट्र समिती' या नावाने प्रचलित झाली. ही समिती स्थापन करण्यात आचार्य अत्रे, एस.एम.जोशी, भाई डांगे, प्रबोधनकार ठाकरे, मधु दंडवते, ए.एस.डांगे, दत्तो वामन पोतदार यांनी पुढाकार घेतला. या समितीच्या स्थापनेला सेनापती बापट, गाडगे महाराजांनी पाठिंबा दिला. या समितीने मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मिती हेच समितीचे ध्येय होते. त्यासाठी समितीने दिल्ली येथे प्रचंड मोर्चा काढला. या मोर्चाचे नेतृत्व प्र.के.अत्रे, अमर शेख व एस.एम.जोशीनी यांनी केले. समितीमध्ये सहभागी नेत्यानी संयुक्त महाराष्ट्राचा दौरा करून संयुक्त महाराष्ट्राबद्दल जनतेत जनजागृती केली .त्या काळात प्र.के.अत्रेची भाषणे व मराठा वर्तमान पत्रातील लेख प्रचंड गाजले. या समितीने मराठी भाषिकांच्या मनातील असंतोषाला वाट करून देण्यासाठी १६ फेब्रुवारी हा दिवस 'महाराष्ट्र दिन' साजरा करण्यास सुरूवात केली. समितीने राज्यपुनर्रचना विधेयक मुंबई विधिमंडळात मांडणे आणि बेळगावच्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी प्रतिनिधी पाठविणे हे कृतीकार्यक्रम सुरूवातीला आखले. महाराष्ट्र राज्य निर्मिती समितीचा उद्देश पुढील प्रमाणे सांगता येतो.

१. भाषावार प्रांत रचना तत्त्वानुसार मराठी भाषिकांचे सलग राज्य निर्माण करणे.

२. लोकशाही व समाजवादी महाराष्ट्राची निर्मिती करणे.

३. सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करून महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनाची सहकारी तत्त्वांवर मांडणी करणे.

समितीने जनतेमधील असंतोषाला व प्रक्षोभाला योग्य वळण लावून लढा कार्यरत ठेवण्यासाठी पाच कलमी योजना सादर केली होती.

i. सरकारच्या धोरणाचा निषेध करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्रवाद्यांनी विधिमंडळ व स्थानिक संस्थातील सदस्य आपआपल्या पदाचे राजीनामे द्यावेत. सर्व शासकीय समितीचे सल्लागार सदस्यांनी राजीनामे दयावेत आणि शासकीय समारंभावर बहिष्कार टाकावा.

ii. असहकार चळवळ हाती घ्यावी.

iii. शांततामय सत्याग्रह

iv. योग्य वेळी संप व हरताळ

v. मुबई व महाराष्टातील अल्पभाषिक नागरीकांना संपूर्ण संरक्षण देण्याचे प्रयत्न व आश्वासन

महाराष्ट्रावर झालेला अन्याय समिती मुकाटयांने सहन करण्यास तयार नव्हती. जनतेच्या मनात जो असंतोष निर्माण झाला होता. त्या असंतोषाला योग्य वळण लावून महाराष्ट्राची मागणी पदरात पाडून घेण्यासाठी महाराष्ट्राभर संप, आंदोलने व निर्देशने आणि चळवळी घडवून आणल्या. समितीच्या दबावामुळे काँग्रेस नेत्यांना व केंद्र सरकारला संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य करावी लागली व मुंबई देखील महाराष्ट्राला मिळाली.

**विशाल द्विभाषिक राज्य-**

त्रिराज्य योजनेला विरोध पाहता विशाल द्विभाषिक मुंबई राज्याची घोषणा करण्यात आली. मोरारजी देसाईचा निवडणुकीत पराभव झाल्याने मोरारजीनी स्वतः मुख्यमंत्री न बनता यशवंतराव चव्हाणांना पाठिंबा देऊन मुख्यमंत्री बनवले. त्यांना भाऊसाहेब हिरे यांचा विरोध होता. १ नोव्हेंबर १९५६ ला द्विभाषिक मुंबई राज्या निर्माण झाले. गुजराथ-महाराष्ट्राचे द्विभाषिक राज्य परस्परांच्या विकासास पोषक ठरेल हा उद्देश होता. तसेच यशवंतरावांना मुख्यमंत्री केल्यामुळे संयुक्त महाराष्ट्र समिती व आंदोलन कमजोर होईल हा दूहेरी हेतू देखील होता पण या घटनेचा काहीही परिणाम झाला नाही. उलट गुजराथ जनता परिषदेकडून वेगळया गुजराथ राज्याची मागणी सुरू केली. संयुक्त महाराष्ट्र समितीचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत होता. मुंबई महानगरपालिकेवर समितीची सत्ता आली. १९५७ मध्ये झालेल्या निवडणुकीत पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेसचा दणदणीत पराभव झाला. या निवडणूकीत समितीने १११ जागा जिंकल्या तर काँग्रेस केवळ २६ जागा मिळाल्या. लोकसभेत पश्चिम महाराष्ट्रातील २२ जागापैकी २० जागा संयुक्त महाराष्ट्र समितीला मिळाल्या. या पराभवामुळे मुंबई व सर्व महाराष्ट्राभर निषेधात्मक निदर्शने यांना पंडित नेहरू व इतर काँग्रेस नेत्याला सतत तोंड दयावे लागले. समितीला मिळत असलेल्या यशामुळे व काँग्रेसचा पराभव होत असल्यामुळे तसेच द्विभाषिक राज्यात फंडवाटप व मंत्रिमंडळातील जागा व खातेवाटपावरून मतभेद वाढू लागल्याने १९६२ च्या निवडणुका लक्षात घेऊन महाराष्ट्रातील काँग्रेस व गुजराथ मधील नेते आणि केंद्र सरकारने चर्चा करून द्विभाषिक राज्य नष्ट करून महाराष्ट्र व गुजराथ या दोन राज्याची १ मे १९६० या दिवशी करण्यात आली. द्विभाषिक प्रदेशातील नागरिकांना एकत्र जोडून ठेवणारी कोणताही समान धागा अस्तित्वात नसल्यामुळे त्या राज्याबद्दल कोणासही आस्था नव्हती ही गोष्ट राज्यपुनर्रचना मंडळाच्या अहवालाही नमूद करण्यात आली होती. या राज्यात दोन्ही राज्यातील मराठी व गुजराथी भाषिकांच्या रास्त मागण्या नाकारण्यात आल्या. परंतु राजकीय तडजोड करण्याच्या नादात काँग्रेसशी नेतृत्वाने द्विभाषिक दोन्ही भाषिकावर लादले मात्र हा प्रयोग अयशस्वी होऊ शकला नाही.

**टिप- मुंबईचे महत्त्व-** संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात मुख्य अडचण मुंबई शहराची होती. मुंबई शहर औद्योगिक दृष्टया पुढारलेले असल्याने मराठी व गुजराथी दोन्ही भाषिकांनी मुंबईवर दावा केला. मुंबईतील व्यापारी बहुसंख्य अमराठी होते. मुंबई महाराष्ट्रात गेल्यास आपल्या हितसंबंधाला धोका पोहचेल म्हणून ते मुंबईच्या महाराष्ट्र राज्यातील समावेशाला विरोध करीत होते. मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट झाली तर भारतातील पहिले समाजवादी राज्य निर्माण होईल आणि या शहरातील आपले वर्चस्व संपुष्टात येईल या अनामिक भीतीने अमराठी व्यापारी मुंबईच्या महाराष्ट्रातील समावेशात विरोध करीत होते. मुंबई शहराचे मोक्याचे स्थान, भारतातील महत्त्वपूर्ण बंदर, मोठमोठी औद्योगिक प्रतिष्ठाने, वाहतुकीचे केंद्र यामुळे हे शहर दोन्ही राज्यातील जनतेला हवे होते. मुंबईवर दोन्ही राज्यातील जनतेने दावा केल्यामुळे हा प्रश्न किचकट बनला आणि संयुक्त महाराष्ट्राबाबत राज्यकर्त्यांना तोडगा काढण्यास वारंवार अपशय आले. मुंबई केद्रशासित प्रदेश बनविणे, वेगळे राज्य बनविणे, संयुक्त राजधानी बनविणे हे अव्यवहार्य तोडगे राज्यकर्त्यावर्गाकडून वारंवार सुचविल्या गेल्यामुळे संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन चिघळले. त्यामुळे सत्ताधाऱ्यांना जनतेचा रोष सहन करावा लागला. मुंबईचे महाराष्ट्राच्या भू-प्रदेशाला असलेले निकटचे स्थान, मराठी लोकसंख्येचे प्राबल्य व मुंबईसाठी झालेली आंदोलने इ. कारणामुळे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी लोकमताचा दबावामुळे सत्ताधाऱ्यांना घ्यावी लागली. अखेर जनमताचा विजय होऊन मुंबई शहर महाराष्ट्राला देण्यात आले आणि संयुक्त महाराष्ट्राचा प्रेरणादायी अध्याय समाप्त झाला.

**प्र.२ रा. संयुक्त महाराष्ट्र चळवळ किंवा आंदोलनाचे महाराष्ट्रावर झालेले परिणाम विशद करा?**

संयुक्त महाराष्ट्राचा लढा १९४६ ते १९६० असा दीर्घकाळ चालला. या लढयात तत्कालीन काळातील सर्वच प्रमुख नेते, कार्यकर्ते आणि जनतेने उत्सफूर्तपणे सहभाग घेतला. मुंबई शहराच्या समावेशावरून मराठी भाषिकाचा न्याय लढा चर्चा

आणि समित्याचे गुऱ्हाळ तसेच नवनव्या प्रयोगामुळे लांबला असला तरी अंतिमतः जनतेच्या लढयाला यश मिळाले. १ मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. संयुक्त महाराष्ट्रासाठी झालेला लढा हा महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रेरणादायी अध्याय मानला जातो. या लढयाचे महाराष्ट्राच्या राजकारणावर व्यापक परिणाम झालेले दिसतात. ते पुढीलप्रमाणे होत.

**१) विरोधकांमध्ये उत्साह-** १९४६ मध्ये बेळगांव येथे भरलेल्या साहित्य संमेलनात मंजूर झालेल्या ठरावापासून सुरू झालेल्या आंदोलनाचे रूपांतर पुढे विशाल जनआंदोलनात वा चळवळीत झाले. आंदोलनात सुरूवातीपासूनच काँग्रेस नेत्यांच्या धरसोडवत्तीमुळे हा प्रश्न सुटू शकला नाही. काँग्रेसंतर्गत निर्माण झालेल्या मतभेद आणि वरिष्ठ नेत्यांचे दबावाच्या राजकारणामुळे हा प्रश्न चिघळत गेला. काँग्रेस नेतृत्वाकडून हा प्रश्न मार्गी लागण्याची आकांक्षा मावळू लागल्याने महाराष्ट्रातील सर्व विरोधी पक्षांनी हा प्रश्न सोडविण्यासाठी एकत्र येऊन संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करून मुंबईसह महाराष्ट्र राज्याची मागणी उचलून धरली. विरोधकांच्या एकीमुळे जनतेतील नैराश्य कमी होऊन उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. जनतेचा प्रचंड पाठिंबा विरोधकांना मिळाला. त्यामुळे विरोधकामध्ये उत्साह वा चैतन्य निर्माण झाला. त्याकाळात झालेल्या निवडणुकीत विरोधकांनी काँग्रेसला धुळ चारली. जनपाठिंबा आणि निवडणुकीतील यशामुळे आपण काँग्रेसला पर्याय देऊ शकतो हा आत्मविश्वास या आंदोलनामुळे विरोधी पक्षात निर्माण झाला.

**२) यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाचा उदय-** १९५६ मध्ये सार्वत्रिक निवडणुकीत मोरारजी देसाईनी यशवंतराव चव्हाणांना पाठिंबा देऊन मुख्यमंत्री केले. त्या काळात संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाला विशाल स्वरूप प्राप्त झाले होते. चव्हाणांनी संयुक्त महाराष्ट्र आंदोलन अत्यंत संयमाने हाताळले. धाकदडपशाही व बंदुकीच्या गोळीचा वापर न करता शांततेने हा प्रश्न मी सोडवेल हे चव्हाणांनी सत्तेवर आल्याबरोबर जनतेला आश्वासन दिले आणि ते आपल्या कृतीने खरे करून दाखविले. नेहरू व काँग्रेस श्रेष्ठींना महाराष्ट्राची मागणीचे महत्त्व पटवून दिले. ही मागणी मान्य न झाल्यास महाराष्ट्रात काँग्रेस पानिपत अटळ आहे ही वस्तुस्थिती वरिष्ठ नेत्यांच्या निदर्शनात आणून दिली. त्यांच्या व्यापक प्रयत्नामुळे महाराष्ट्राची मागणी मान्य झाली. १ मे १९६० ला नेहरूकडून महाराष्ट्राचा मंगलकलश आणला. चव्हाणाची दूरदृष्टी आणि चाणाक्षपणामुळे महाराष्ट्र काँग्रेसला एकमुखी पाठिंबा मिळत राहिला. १९५७ ते १९७० या कालखंडात महाराष्ट्राच्या राजकारणावर यशवंतरावाची जबरदस्त पकड होती. त्यांच्या बेरजेच्या राजकारणामुळे महाराष्ट्रात काँग्रेसला व सरकारला स्थैर्य लाभले.

**३) मराठयांचे लोकसंख्येत प्राधान्य-** मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यामुळे महाराष्ट्रात मराठा-कुणबी जातीचे वर्चस्व निर्माण झाले. मुंबई राज्यात मराठा जातीची लोकसंख्येतील प्रमाण ३३% होते. गुजराथ राज्य अलग झाल्यानंतर मराठा कुणबी जातीचे प्रमाण ४० % पेक्षा अधिक झाल्याने या जातीचा महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव निर्माण झाला. यशवंतराव चव्हाणासारखे नेतृत्व या जातीला मिळाल्यामुळे मराठा जातीचे राजकारणात महत्त्व वाढले. मराठा जातीचे महाराष्ट्राच्या राजकारणातील वाढते महत्त्व लक्षात घेत हे राज्य मराठी भाषिकांचे की मराठयाचे अशी ही टीका होऊ लागली. कारण मराठा जातीला लोकसंख्येपेक्षा जास्त प्रतिनिधित्व मंत्रिमंडळ, विधिमंडळ आणि इतर क्षेत्रात मिळू लागले.

**४) संयुक्त महाराष्ट्र समितीत फाटाफूट-** मुंबईसह महाराष्ट्राची मागणी मान्य झाल्याने समितीतील घटक पक्षात उत्साह कमी झाला. बेळगांव, कारवार व निपाणी लढयावर समितीची शक्ती केंद्रीत करू हे ठरविण्यात आले पण या मुद्यावर समितीतील मतभेद उफाळून झाले. काहीच्या मते समितीला पर्यायी पक्ष बनवावे आणि समितीच्या ध्वजाखाली निवडणुका जिकल्या की, सत्तेच्या जोरावर बेळगाव व कारवारचा प्रश्न सोडवावा. तर इतरांनी हा प्रश्न संपल्यामुळे समिती बरखास्त करावी हे मत मांडले. समितीतील वाढत्या मतभेदामुळे राज्य स्थापनेनंतर अल्पकाळात समितीत फाटाफूट झाली. विरोधी पक्षानी महाराष्ट्राच्या मागणीसाठी एकत्र येऊन संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन केली. ही मागणी पूर्ण झाल्यानंतर आपोआपच समितीचे कार्य संपले. त्यामुळे समितीत फाटाफूट अपरिहार्य ठरली.

**अपेक्षित वस्तूनिष्ठ वा एका वाक्यातील प्रश्नोत्तरे**

१. राज्यपुर्नरचनेच्या कोणत्याही दोन समित्यांची नांवे लिहा.

उत्तर - राज्यपुर्नरचनेसाठी दार कमिशन आणि फाजल अली आयोग नेमण्यात आला होता.

२. जेव्हीपी समितीच्या सदस्य कोण होते.

उत्तर - जेव्हीपी समितीत पंडीत नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल आणि पट्टाभी सितारामय्या हे सदस्य होते.

३. संयुक्त महाराष्ट्र समितीचे दोन उद्देश सांगा.

उत्तर- भाषावार प्रांत रचना तत्त्वानुसार मराठी भाषिकांचे सलग राज्य निर्माण करणे आणि लोकशाही व समाजवादी महाराष्ट्राची निर्मिती करणे हे दोन उद्देश संयुक्त महाराष्ट्र समितीचे होते.

४. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे दोन परिणाम सांगा.

उत्तर- संयुक्त महाराष्ट्र आंदोलनामुळे यशवंतराव चव्हाणाच्या नेतृत्वाचा उदय आणि विरोधकामध्ये उत्साह हे परिणाम झालेले दिसतात.

५. संयुक्त महाराष्ट्राची मागणी सर्वप्रथम कोणी व केव्हा केली?

उत्तर - संयुक्त महाराष्ट्राची मागणी सर्वप्रथम १९४६ मध्ये श्री.ग.त्र्य.मोडखोलकर यांच्या अध्यक्षेखाली बेळगांव येथे भरलेल्या मराठी साहित्य संमलेनात करण्यात आली.

६. संयुक्त महाराष्ट्र समितीतील प्रमुख नेत्याची नांवे सांगा.

उत्तर- संयुक्त महाराष्ट्र समितीत एस.एम. जोशी, प्र.के. अत्रे, श्रीपाद अमृत डांगे, ना.ग.गोरे, सेनापती बापट हे प्रमुख नेते होते.

७. संयुक्त महाराष्ट्र चळवळी काळात मुंबई राज्याचे मुख्यमंत्री कोण होते.

उत्तर- संयुक्त महाराष्ट्र चळवळ काळात मोरारजी देसाई आणि यशवंतराव चव्हाण हे मुंबई राज्याचे मुख्यमंत्री होते.

८. नागपूर करारातील प्रमुख दोन तरतुदी सांगा.

उत्तर- घटक राज्याची पुर्नरचना करतांना मराठी भाषिकांचे एक सलग भाषिक राज्य बनविण्याचा निर्णय घेणे आणि त्या मराठी प्रदेश वा महाराष्ट्र संबोधिण्यात यावे आणि त्यांची राजधानी मुंबई असावी.

९. महाराष्ट्र राज्याची स्थापना कधी झाली आणि त्या राज्याचे प्रथम मुख्यमंत्री कोण होते.

उत्तर- १ मे १९६० ला महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली त्यावेळेस यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री होते.

१०. दार आयोग कधी स्थापन झाला.

उत्तर- १७ जून १९४८ रोजी दार आयोगाची स्थापना झालेली दिसून येते.

११. फाजल अली आयोगाचे सदस्यांची नावे लिहा.

उत्तर- अध्यक्ष न्यायमूती फाजल अली आणि हृदयनाथ कुंझरु व सरदार पण्णीकर हे सदस्य होते.

१२. मुंबई द्वैभाषिक राज्याची निर्मिती केव्हा झाली?

उत्तर- १ नोव्हेंबर १९५६ ला द्विभाषिक मुंबई राज्या निर्माण झाले.

## प्रकरण ४ थे

## आदिवासी चळवळ

**प्र. १ ला. आदिवासी चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करा?**

आदिवासी हा मानववंशशास्त्रदृष्टया हा भारतीय लोकसमाजाचा प्राचीनतम विभाग आहे. वने आणि पर्वत यांच्या आश्रयाने स्थायिक झालेल्या जमातींना आदिवासी असे म्हणतात. आदिवासी समाज ही भारतीय जनजीवनापासून प्रादेशिक आणि सांस्कृतिकदृष्टया अलिप्त आहे. भारतातील जवळजवळ सर्व राज्यात आदिवासी जमाती आढळतात. डोंगरकपाऱ्यात वास्तव्य करणाऱ्या, आपल्या रूढी परंपरा जपणाऱ्या आणि स्वच्छंदी जीवन जगणाऱ्या आदिवासींना कोणी जंगलाचे राजे, तर कोणी वनवासी, काही लोक आदिम समाज असे म्हणतात. सिसले, ग्रीगसन, लॅक्सी, एल्विन, सेडविक, मार्टिन व ठक्कर बाप्पा इत्यादी आदिवासीच्या अभ्यासकांनी त्यांना मूळचे रहिवाशी (Aboriginal) म्हटले आहे. डॉ.गो.स.घुर्ये यांनी मागासलेले हिंदू म्हणतात. त्याशिवाय गिरिजन, वनवासी, वन्यजाती, भूमिपुत्र असे म्हणतात. घटनेच्या कलम ३४१, ३६६ आणि ३४२ नुसार आदिवासीचा अनुसूचित जमाती असा उल्लेख आहे. २००१ च्या जनगणनेनुसार आदिवासीची लोकसंख्या ८ कोटी ४३ लक्ष इतकी होती. भारताच्या एकूण लोकसंख्येत आदिवासीचे प्रमाण ८.२० टक्के इतकी आहे. भारतात आदिवासी जमातीची संख्या ५५० इतकी आहे.

**आदिवासी म्हणजे कोण व आदिवासी समाजाची व्याख्या-** आदिवासी समाजाविषयी अनेक गैरसमज आहेत. ते रानटी, सतत झगडे करणारा, नर मांसभक्षक, अत्यंत मागास, अर्धनग्न अवस्थेत, भोगवादी इत्यादी आदिवासी समाजाविषयी गैरसमज आहेत. वास्तविक अभ्यासकांनी आदिवासी विषयीचे पूर्वग्रह दूर करून आदिवासी म्हणजे नेमके कोण आहेत. या विषयी संशोधन केलेले आहे. आदिवासी म्हणजे कोण यांची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे.

१. **डब्ल्यू जे. पेरी-** समान बोलीभाषा बोलणाऱ्या व समान भूप्रदेशावर वास्तव्य करणारा समूह म्हणजे आदिवासी होय.
२. **इंपिरिअल गॅझेट-** समान बोलीभाषा बोलणाऱ्या, एकाच भू-भागात राहणाऱ्या, सुरूवातीस अंतर्विवाही असण्याची शक्यता असणाऱ्या, पण सर्व सामान्यपणे अंतर्विवाही नसलेल्या व समान नाव धारण करणाऱ्या कुटुंबाच्या समुच्चयाला आदिवासी असे म्हणतात.
३. **डॉ. डी.एन.मजुमदार-** समान नाव असणारा, एकाच भूप्रदेशावर वास्तव्य करणारा, एकच भाषा बोलणारा व विवाह, व्यवसाय इत्यादी बाबत समान निषेधनियमाचे पालन करणारा व परस्पर उत्तरादायित्व निर्माण करणाऱ्या दृष्टीने एक पद्धतशीर व्यवस्था स्वीकारणाऱ्या कुटुंबाचे किंवा कुटुंब समूहांचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी होय.
४. **डॉ.रिव्हर्स-** जमात किंवा आदिवासी हा एक सरळ, साधा सामाजिक समुह आहे. त्यातील अंतर्गत सदस्य हे एका समान बोली भाषेचा उपयोग करतात, युद्ध वैगेरे सारख्या उद्देश पूर्ती करिता एकत्र कार्य करतात.

**आदिवासी चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी-** भारतातील विविध भागात आदिवासीच्या चळवळी झालेल्या दिसतात. इ.स. १७५७ ते १८५७ या काळात आदिवासी राजसत्तांनी ब्रिटिशाविरूद्ध उठाव केलेले होते. १८२७ मध्ये छोटा नागपूर पठारावरील कोलारी आदिवासींनी ब्रिटिशाविरूद्ध बंड करून आपल्या प्रदेशात प्रवेश करू दिला नाही. ब्रिटिशांनी लष्करीबळाचा वापर करून बंड दडपून टाकले. १८३१ मध्ये मुंडा जातीने रांची, हजारीबाग, मानभुम आणि पालमाऊ ठिकाणी बंड केली. ओरिसातील खोंडा, बिहारमधील संथाळ, अहोम, कोल, खासी व भिल्ल यांनी ब्रिटिशाविरूद्ध उठाव केले. पुणे, अहमदनगर, सातारा जिल्ह्यातील सामोशी उमाजी नाईक यांनी ब्रिटिश, जमीनदार, सावकारांना विरूद्ध उठाव केला. ठाणे जिल्हातील वारली उठाव करून ब्रिटिशांना हैराण केले. मध्य भारतात खाज्या नाईक, भीमा नाईक, भागोजी नाईक, काळू भिल, दौलू नाईक, तंटया भिल यांनी ब्रिटिशाविरूद्ध उठाव केले. भारतात बिहारमधील छोटा नागपूर भागात उराँव आदिवासीमध्ये ताना भगत चळवळ झालेली दिसते. जात्रा उराँव यांनी ही चळवळ सुरू केली. या चळवळीने उच्च जातीतील हिंदू जीवनप्रणालीचे अनुकरण करण्याचा आदर्श ठेवणे हा उद्देश होता. या चळवळीमुळे आदिवासी समाजाचे हिंदू जीवनपद्धतीचे अनुकरण केले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात छोटा नागपूर परिसरात सावकार, जमीनदार, ठेकेदार आदिवासींनी केलेल्या शोषणाविरूद्ध १८९५ मध्ये बिरसा मुंडा यांनी चळवळीचे नेतृत्व स्वीकारून चळवळ सुरू केली. त्यांनी

मुंडा आदिवासींना एक धर्म आणि एक जीवन पद्धती दिली. या चळवळीने पुढे सैनिकी स्वरूप धारण केले. परंतु ब्रिटिशांनी बिरसा मुंडाना अटक करून कारागृहात टाकले. कारागृहात बिरसा मुंडाचा अंत झाल्याने ही चळवळ थंडावली. या चळवळीमुळे आदिवासीमध्ये मोठया प्रमाणावर जागृती झालेली होती. महाराष्ट्रात भिल्ल, गोंड, महादेव कोळीचे नैसर्गिक हक्क अमान्य केल्यामुळे ब्रिटिश सत्तेविरूद्ध भिल्ल महादेव कोळी या जमातीने १८१८ मध्ये नांदगाव जवळ मांडवद येथे पहिला उठाव केला. या लढयाचे नेतृत्व रामजी भांगरा आणि रामा किरवा यांनी केले. हा उठाव प्रभाव इतर जिल्ह्यात ही पसरत गेला. जुन्नर प्रांतात भाऊ खरोल, चिमणजी दरबारे यांनी १८३० मध्ये उठाव केला. १९३८ मध्ये गोविंदराव खोडे, राघोजी भांगरे यांनी आदिवासी जमातींना संघटित करून उठाव करण्याची तयारी करत होते. १८५० ते ५९ दरम्यान भागोजी नायकाने जमातींना संघटीत करून चळवळी चालविल्या. खानदेशात उमेद वसावा यांनी चळवळीचे नेतृत्व केले. गोविंद गुरू या भिल्ल जमातीच्या नेत्याने १८६८ मध्ये भिल्लाचे उघडपणे संघटन केले. परंतु आदिवासी जमातींनी ब्रिटिश राजवटीच्या विरोध बंड केलेले असले तरी ब्रिटिशांनी सैन्य शक्तीच्या जोरावर हे बंद निर्दयपणे चिरडून टाकले.

ब्रिटिश राजवटीच्या काळात ईशान्य भारतातील आसाम, नागालँड, मिझोराम व इतर भागातही ख्रिस्ती मिशनरीनी धर्मप्रसार केल्यामुळे मोठया प्रमाणावर आदिवासींनी धर्मांतर केलेले आढळते. धर्मांतरामुळे आदिवासीमध्ये शिक्षण, सामाजिक व राजकीय जागृती घडून आलेली दिसते. मिशनरींनी सेवाभावी वृत्तीने शिक्षण, आरोग्यसुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे आदिवासीच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक जीवनात परिवर्तनात प्रयत्न केलेले दिसते. १९२२ मध्ये गुजराथमध्ये ठक्कर बाप्पा यांनी 'भिल्ल सेवा संघा' ची स्थापना करून आदिवासीमध्ये समाज सुधारण्याची चळवळ सुरू केली. शंकरराव ठक्कर यांनी खानदेशात 'भिल्ल सेवा संघ' ची स्थापना करून आदिवासीमध्ये जागृती करण्याचा प्रयत्न केला. गोदूताई परूळेकर यांनी ठाणे जिल्ह्यातील वारली आदिवासीमध्ये जाऊन सेवा कार्य केले. त्यांनी लिहिलेल्या 'जेव्हा माणूस जागा होता' या आत्मचरित्रात आदिवासीमध्ये काम करतांना आलेल्या विदारक अनुभवाचे कथन केले आहे. शामराव परूळेकर यांनी वारली आदिवासीमध्ये जनजागृती करून लाल बावटा चळवळ केली. २६ मार्च १९७४ मध्ये गौरी देवी यांच्या नेतृत्वाखाली उत्तराखंड येथे उठाव केला. तिहरी येथे सुंदरलाल बहुगुणा यांनी चिपको आंदोलन केले. ठाणे जिल्ह्यातील वारली लोकांनी देखील चिपको आंदोलन केले. अँथ्रोपोलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडियाने १९७६ साली केलेल्या अभ्यासानुसार भारतात ३६ आदिवासी चळवळी झाल्याची नोंद घेतली आहे. त्यातील १४ चळवळी उत्तरपूर्व भारतात झालेल्या दिसतात. गुला महाराज, मेधा पाटकर, क्रॉ. शरद पाटील, नजुबाई गावीत, प्रतिभा शिंदे यांनी महाराष्ट्रात आदिवासीच्या समस्या सोडविण्यासाठी चळवळी केलेल्या दिसतात. त्यातील नर्मदा बचाव चळवळ ही प्रदीर्घ काळ चालेली चळवळ मानली जाते. त्यात मेधा पाटकर, अरूंधती रॉय आणि बाबा आमटे यांनी सहभाग घेतलेला दिसतो. महाराष्ट्रातील वनजमीन मिळविण्यासाठी जंगल सत्याग्रह केलेले दिसतात. वन जमीन हक्कासाठी स्थानिक पातळीवर आंदोलने झालेली दिसतात.

अशा प्रकारे आदिवासी चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद करता येते.

**प्र. २ रा. महाराष्ट्रातील आदिवासी चळवळीची उद्दिष्टे व वैशिष्टये स्पष्ट करा?**

भारतीय समाजरचनेप्रमाणेच महाराष्ट्रातील समाजरचनेची पारंपारिक चौकट, चातुर्वण्याधिष्ठीत समाज आणि आदिवासीचे अस्तित्व आहे. महाराष्ट्रात आदिवासींच्या जवळपास ४७ जमाती दिसून येतात. राज्यातील आदिवासी सह्यादी, सातपुडा आणि गोंडवन विभागात वास्तव्य करतात. ते खालीलप्रमाणे होत.

**महाराष्ट्रातील आदिवासी**

| अ.क. | विभाग | आदिवासी जमाती |
|---|---|---|
| १ | सह्यादी विभाग (ठाणे, नासिक, पुणे, अहमदनगर, रायगड इ. जिल्हे) | महादेव कोळी, वारली, कातकरी, कोकण, ठाकर, ढोर कोळी, मल्हार कोळी, काथोडी |
| २ | सातपुडा विभाग (धुळे, जळगाव, अमरावती, नंदुरबार, औरंगाबाद) | भिल्ल, गावीत, पावरा, धानका, हुबळा, तडवी, पारधी, कोलम, मावची कोरकू |
| ३ | गोंडवन विभाग (नागपूर, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, नांदेड इ. जिल्हे) | गोंड, मांडिया गोंड, कोला, परधान, आंध, कोया, हलवा, करब |

महाराष्ट्र वरील आदिवासी जमातीचे प्रामुख्याने वास्तव्य दिसून येते.

**आदिवासी समाजाची वैशिष्टये-** आदिवासी समाजाची पुढील वैशिष्टये दिसून येतात.

१. **विशिष्ट भूप्रदेश-** बहुसंख्य आदिवासी जमाती विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करतात. हा प्रदेश साधारणपणे डोंगराळ व दुर्गम स्वरूपाचा असतो. ह्या प्रदेशातील नैसर्गिक साधनसंपत्ती म्हणजे नद्यानाले, जंगले यावर त्यांची मालकी असते. प्रगत समाजाशी फारसा संपर्क नसतो. पशूपक्षी, डोगरदऱ्या, वृक्षवेलीबद्दल त्यांना बऱ्यापैकी ज्ञान असते. जंगल, डोंगरदऱ्याशी त्याचे सामाजिक, धार्मिक व आर्थिक जीवन निगडीत असते.

२. **प्रमाण लधुता-** गौंड आदिवासीचा अपवाद वगळता इतर आदिवासी जातीची संख्या फारच मर्यादित असते. काही जातीची संख्या तर १००च्या आत आहे. समुदायाची लोकसंख्या फारच कमी असल्याने सामाजिक संपर्काचे क्षेत्रही मर्यादित असते.

३. **सामान्य भाषा किंवा बोली-** प्रत्येक आदिवासी समाजाची स्वतःची एक बोलीभाषा असते. उदा.पावरा-पावरी भाषा या भाषांना स्वतंत्र लिपी नसते. भाषेला स्वतंत्र भाषेचा दर्जा नसतो. त्या त्या प्रादेशिक भाषेतील लिपीचा ते उपयोग करतात. भारतात आदिवासीच्या एकूण २०५ प्रकारच्या बोलभाषा असून २२५ उपबोलीभाषा आहेत.

४. **समान नाव व रक्त संबंधावर आधारित समूह-** आदिवासी जमातीला स्वतंत्र नाव असते. त्यामुळे प्रत्येक जमात इतर जमातीपासून आपले वेगळेपण व स्वतंत्रता सूचित करते. प्रत्येक आदिवासी समाज हा रक्त संबंधावर आधारित समूह मानला जातो. ते आपली उत्पत्ती एका विशिष्ट पूर्वजापासून झालेली मानत असल्याने आपआपसांत आत्मीयता व प्रेमाचे बंध टिकवून असतात.

५. **साधी अर्थव्यवस्था-** आदिवासीची अर्थव्यवस्था अजूनही प्राथमिक अवस्थेत दिसून येते. ते उदरनिर्वाहासाठी सभोवताच्या नैसर्गिक पर्यावरणावर अवलंबून आहेत. उदा. जंगलात शिकार, लाकूडतोड त्याचे उत्पादन व विनिमय साधन प्राथमिक स्वरूपाची दिसतात. वस्तूविनिमय पद्धतीचा अवलंब केला जातो. व्यावसायिक विशेषीकरणाचा अभाव आहे.

६. **समान धर्म-** आदिवासी समाजात धर्माला अन्ययसाधारण महत्त्व असते. ते निसर्गात घडणाऱ्या घडामोडींविषयी विलक्षण जागृत असतात. प्रगत तंत्रज्ञानाअभावी तंत्रविद्याचा वापर करतात. निसर्ग, पूर्वज आणि भूताखेताची पूजा करतात. जादूटोणा व मंत्रतंत्र यांचा वापर करतात. धर्मश्रद्धेतून जीवनाकडे पाहण्याचा आदिवासीचा स्वतंत्र दृष्टिकोन विकसित झालेला आहे.

७. **राजकीय संघटन-** आदिवासीमध्ये राजकीय संघटनाच्या जबाबदारी ज्येष्ठ व अनुभवी व्यक्तीच्या समितीकडे असते. कारण आदिवासी समूहामध्ये राहतात. समूहाचा नेता हा समाजाचा नायक असतो. तो अंतर्गत शांतता, न्यायादान, दोषींना शिक्षा, दंड देणे ही कामे करत असतो. या दृष्टीने आदिवासी हा राजकीयदृष्टया संघटित असतो.

८. **वांशिक सजातीयता-** विशिष्ट आदिवासी समाजाचा एक वंश असतो. विभिन्न प्रदेशात विखुरलेली जमात व एक जमातीच्या उपजमाती त्याच वंशाच्या मानल्या जातात. उदा. नागा जमातीतील आ, अन्गामो, रन्गामी, आओ नागा हे सर्व मंगोल वंशाचे आहेत.

९. **शैक्षणिक मागासलेपणा-** आदिवासी समाजामध्ये शिक्षणाचा फार मोठया प्रमाणावर अभाव दिसून येतो. कुटुंबात मिळणाऱ्या अनौपचारिक शिक्षणावर उदरनिर्वाह करण्यावर त्यांचा भर असतो. आदिवासी जमाती डोंगराळ भागात वास्तव्य करत असल्याने बहुतेक भागात दळणवळण साधनाच्या अभावामुळे औपचारिक शिक्षण अजूनही पोहचू शकले नाही. शिक्षणाबद्दल फारशी जागृती नसल्यामुळे गळतीचे प्रमाण आदिवासी भागातील शाळामध्ये जास्त प्रमाणात दिसून येते.

१०. **सामाजिक एकजिनशीपणा-** आदिवासी समाजाचे प्रमुख वैशिष्टये म्हणजे समान बोलीभाषा, समान धर्माचरण, समान संस्कृती व समान सामाजिक नियमने या सर्व घटकांमुळे आदिवासी समुदायाच्या आचारविचारात एकजिनशीपणा आढळतो. धर्मश्रद्धा, परंपरा व रीतीरिवाज यांचा प्रभाव सर्व जमातीवर दिसून येतो. त्यांच्या जीवनप्रणालीतील साम्यामुळे जीवनात घडणाऱ्या घडामोडीसंदर्भात सर्व आदिवासीची प्रतिक्रिया एकाच प्रकारची असते. त्यांच्या आचरणात वेगळेपणा दिसून येत नाही.

११. **अंतर्विवाह पद्धत-** प्रत्येक आदिवासी जमातीमध्ये अंतर्विवाहाची एक प्रथा प्रचलित आहे. ते आपल्या जमातीतच विवाह करतात. जमाती बाहेरील विवाहाला फारशी जनमान्यता नाही.

वरील विवचेनावरून असे दिसून येते की, आदिवासी समाजाची काही विशिष्ट वैशिष्टये आहेत ही वैशिष्टये इतर समाजापेक्षा वेगळी व स्वतंत्र असल्यामुळे आदिवासी समाज हा इतर समाजापेक्षा वेगळा दिसून येतो.

**प्र. २ रा. आदिवासी विकासाच्या समस्या कोणत्या ते सांगा.**

**किंवा**

**आदिवासीच्या समस्या निर्मितीची कारणमीमांसा करा?**

**किंवा**

**आदिवासीच्या समस्या कोणत्या ते स्पष्ट करा?**

भारतातील आदिवासीच्या विविध जमाती अत्यंत साधे जीवन जगत असतात. त्यांच्या जीवनात अनेक समस्या निर्माण झालेल्या मुळे ते विकासापासून वंचित झालेले दिसतात. आदिवासी विकासाच्या प्रमुख समस्या कोणत्या आहेत याचा अभ्यास केल्यानंतर आदिवासी विकासाच्या अभ्यासकांनी पुढील समस्या सांगितलेल्या आहेत.

१. **पृथकता किंवा एकांतवास-** बहुसंख्य आदिवासी जमातीचे वास्तव्य दुर्गम डोंगराळ प्रदेश, घनदाट जंगल, एकाकी बेटयावर असल्याने ते इतर समाजापासून एकांतवासात राहत असल्याने इतर समाज व त्यांच्यात भौगोलिक पृथकता दिसून येते. त्यांच्या वस्तीस्थानापर्यंत जाण्यासाठी कच्च व पक्या रस्त्याचा अभाव, पोस्ट, तारायंत्र, दूरध्वनी आणि दळणवळण साधनाच्या अभावामुळे सांस्कृतिक आदानप्रदान होऊ न शकल्यामुळे शतकानुशतके निसर्गाधीन जीवनपद्धतीचा अवलंब करून जीवन जगत राहिले. जगातील विविध भागात झालेली प्रगती आणि नव ज्ञान व नव तंत्रज्ञानापासून आत्मसाथ न केल्याने दारिद्रय, अज्ञान, अनारोग्य, नैसर्गिक संकटे यासारख्या समस्या सर्वच आदिवासी जमातीना भेडसावतांना दिसतात.
२. **संपर्कातून समस्या निर्मिती-** आदिवासी भौगोलिकदृष्टया पृथक राहत असले तरी प्रगत समाजाने आपल्या हितासाठी आदिवासीशी संपर्क प्रस्थापित केले. ख्रिश्चन मिशनरी आणि हिंदू धर्मप्रसारकांनी आपल्या धर्मप्रसारासाठी आदिवासी भागात कार्य करायला सुरूवात केली. त्यांच्या परिणाम भोळया भावडया आदिवासीवर आपला धर्म लादला. आदिवासीचा धर्म निसर्गपूजेवर आधारलेला होता. इतर धर्मियांनी केलेल्या प्रसार व प्रसारामुळे आपली जुनी संस्कृती हे पूर्णपणे सोडू शकले नाही आणि नव्याने आलेल्या तत्त्वाचाही पूर्णपणे स्वीकार करू न शकल्यामुळे त्यांच्या धर्म, भाषा, बोलीभाषा, परंपरा, रूढीविषयक समस्या निर्माण होऊन त्यांचे सांस्कृतिक अस्तित्व नष्ट होण्याची शक्यता निर्माण झाली. जंगलतोड करणारे ठेकेदार, सावकार, फिरते व्यापारी, कंत्राटदार यांचा आदिवासी समाजाशी संपर्क आला. या प्रगत समाजातील लोकांनी आदिवासीचे करता येईल तेवढे शोषण करण्याचा प्रयत्न केला. जमिनी हडप करणे, आदिवासी मुलींना वेश्यागमनी करणे, त्यांच्या बायका मुलींची विक्री इत्यादी समस्या निर्माण झालेल्या आहेत. ब्रिटिश राजवटीच्या काळात ब्रिटिशांनी जंगल खाते निर्माण केले. या खात्याचे कायदे आदिवासीच्या उदरनिर्वाहावर आधात करणारे होते. त्यांनी केलेल्या कायदामुळे आदिवासीचा जंगलावरील हक्क हिरावला गेल्यामुळे उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. आदिवासीचे जीवनच पूर्णपणे जंगलावर अवलंबून असल्याने जंगलावरील हक्क नष्ट झाल्याने त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक हितावर आक्रमण झाल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या त्यामुळे विकासाला बांधा आली.
३. **आर्थिक विकासाच्या समस्या-** भौगोलिक पृथकतेमुळे आदिवासी स्थलांतरित शेती करतात. तो त्यांच्या परंपरागत जीवन पद्धतीचा एक भाग मानला जातो. ही शेती मागासलेली असल्यामुळे आदिवासीना अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने दारिद्रयात खितपड पडावे लागते. आधुनिक बी बियाणे, खते व अवजाराची माहिती नसल्याने शेतीतून उत्पन्न मिळत नाही. कमी उत्पन्नामुळे उदरनिर्वाहाची समस्या निर्माण होते आणि मग आदिवासी पोट भरण्यासाठी इतर भागात स्थलांतर करतात. आदिवासीच्या उत्पन्नाचे जंगल हे प्रमुख साधन होते. जंगलातील लाकूडफाटा गोळा करणे, मध, डिंक गोळा करणे, शिकार व मासेमारीतून त्याचे जीवन चालत असे. नवीन जंगल कायदयामुळे जंगलात शिकार, मासेमारी आणि लाकूडतोड यांना बंदी लादल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा भंयकर प्रश्न निर्माण झाला आहे. जंगल कायदे आणि

जंगल अधिकाऱ्याच्या उपस्थितीमुळे आदिवासीचा हक्का हिरावला गेला. त्यामुळे आदिवासीच्या आर्थिक विकासात अडथळे येतात. आदिवासीची अर्थव्यवस्थापूर्वी वस्तूविनिमयावर आधारित होती. ठेकेदार, कंत्राटदार, सावकार, खाण मालक आणि फिरते व्यापारी यांच्या संपर्कातून आदिवासीच्या आधुनिक अर्थव्यवस्थेशी संबंध आला. परंतु आदिवासींना श्रम व वस्तूची पूरेपूर किंमत माहिती नसल्याने मोठया प्रमाणावर लूट केली जाते. त्यांच्या जमीनी नाममात्र किंमतीत गिळकृंत केल्या जातात. नैसर्गिक साधनसंपत्ती नाममात्र दरात मिळविली जाते. आदिवासीच्या आर्थिक शोषणामुळे ते विकासापासून वंचित झालेले दिसतात. जंगलावरील मालकी हक्क संपल्याने उदरनिर्वाहासाठी आदिवासी शहरात स्थलांतर करतात. त्यांच्याकडे तांत्रिक ज्ञानाचा अभाव असल्याने औद्योगिक क्षेत्रातील शारीरिक कामे, बांधकाम मजूरी किंवा इतर क्षेत्रातील अंग मेहनतीची कामे करतात. त्या कामाचा त्यांना योग्य मोबदला दिला जात नाही. त्यांची मजूरी अनेकदा बडवून दिली जाते. दादागिरी करून अल्पमोबदल्यावर राबविले जाते. त्यांना कोणत्याही सुखसुविधा दिल्या जात नाही. ठेकेदार मध्यल्यामध्ये दलाली खातात. वरील सर्व कारणामुळे आदिवासी आर्थिकदृष्टया प्रचंड हालाखीचे जीवन जगत आहे. त्यांच्याकडे कोणताही पैसा उरत नाही सर्व पैसा उदरनिर्वाहासाठी खर्च होत असल्याने प्रगतीच्या सर्व वाटा बंद होतात. आदिवासीच्या आर्थिक विकासासाठी प्रयत्न केले जात नाही तोपर्यंत ते आर्थिकदृष्टया संपन्न होऊ शकणार नाहीत आणि त्याचा विकास देखील होऊ शकणार नाही.

४. **सामाजिक व सांस्कृतिक समस्या-** आदिवासीचा मूळ धर्म त्यांना मानसिक बाबतीत समाधान देणारा होता. त्यांच्या जीवन पद्धतीशी अनुकूल होता. परंतु ख्रिश्चन व हिंदू धर्माच्या संपर्कामुळे त्यांच्या मूळ धर्मावर आधात झाल्याचे आदिवासीचे सामाजिक विभाजन झाले. त्यातून सांस्कृतिक तणाव निर्माण होऊन परस्परांविषयी द्वेष, मत्सर आणि भांडणतंटे उद्‌भवू लागल्याने सांस्कृतिक समस्या निर्माण झाल्या. आदिवासीमध्ये बालविवाह सर्रास होत असल्याने बालमृत्यू आणि प्रसुती काळात माता मृत्यूचे प्रमाण खूप जास्त आहे. अपुऱ्या पोषणातून माता व बालकांच्या कुषोषणाची गंभीर समस्या आदिवासीच्या विकासात फार मोठी अडचण निर्माण करत आहे. वधूमूल्य ही आदिवासीमध्ये गंभीर समस्या बनली आहे. वधुमूल्य चुकविण्यासाठी सावकाराकडून कर्ज घेतले जाते. हिंदू संपर्कामुळे आदिवासी विवाहातील साधेपणा नष्ट होऊन छानछोकीला महत्त्व आले. वधुमूल्य आणि विवाहातील खर्च पेलणे आदिवासीच्या आवाक्याबाहेरचे कार्य असल्याने त्यातून ते कर्जबाजारी बनत आहेत. आदिवासीची मूले अपहरण किंवा दरिद्री पालकापासून मुलीची खरेदी करून मोठया प्रमाणावर मुर्लींना वेश्याव्यवसायात ढकलेले जात आहे. दारिद्रयामुळे आदिवासी स्त्रियामध्ये वेश्यावृत्ती आणि अनैतिक व्यवसायाचा प्रसार होऊन झाला. त्यातून कौटुंबिक तणाव आणि व्यवसनाधीनता ही समस्या निर्माण होत आहे. कौटुंबिक तणावातून घटस्फोटाचे प्रमाण वाढत आहे.

५. **भाषाविषयक समस्या-** प्रत्येक आदिवासी समूहांची बोलीभाषा स्वतंत्र आहे. लिपीच्या अभावामुळे फक्त लोकगीते, कहाण्या, दंतकथा इत्यादीपुरती मौखिक स्वरूपात उपलब्ध आहे. ख्रिश्चन व हिंदूच्या संपर्कामुळे प्रगत समाजाच्या भाषेशी ओळख झाल्यामुळे आपल्या भाषेला विसरू लागले. परंतु नव्याने स्वीकारलेली भाषाही पूर्णपणे अवगत झाली नाही. तसेच भारतातील सर्व राज्यात शिक्षण प्रादेशिक भाषा, राष्ट्रभाषा किंवा इंग्रजी माध्यमातून दिले जाते. या सर्व भाषा आदिवासीच्या दृष्टीने अपरिचित असल्याने आदिवासीची शैक्षणिक प्रगतीला अडसर निर्माण होतो. भाषिक न्यूनगंडामुळे इतरांशी मनमोळकेपणे संसूचन साधू शकत नाही परिणामतः आदिवासीच्या विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण होत आहेत. तसेच आदिवासी भाषा लिपीच्या अभावामुळे आपले अस्तित्व टिकविण्यासाठी संघर्ष करत आहे. भाषेच्या नष्ट होण्यातून त्याचे सांस्कृतिक अस्तित्व धोक्यात येणारी शक्यता निर्माण झाली आहे. आपले वेगळे अस्तित्व भाषेतून व्यक्त होते. भाषेतून संस्कृतीची ओळख होते. पण भाषा नष्ट झाली हे सर्व गोष्टी निरर्थक ठरतील म्हणून आदिवासीच्या भाषिक समस्या आदिवासीच्या विकासाच्या मार्गातील सर्वात मोठी अडचण मानली जाते.

६. **आरोग्यविषयक समस्या-** आदिवासी समाजाच्या आरोग्यविषयक अनेक समस्या दिसून येतात. आदिवासी समाजामध्ये दारू पिणे ही सर्वसामान्य बाब होती. परंतु आधुनिक काळात दारूचे आत्यंतिक व्यसनात रूपांतर होऊन अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. व्यवसनाधीनतेतून शारीरिक कार्यक्षमता कमी होणे, आर्थिक नुकसान, कौटुंबिक झगडे, आजारपण, सामाजिक ताणतणाव व संघर्ष हे प्रश्न आदिवासी समाजामध्ये निर्माण होत आहेत. या समस्येप्रति जनजागृतीशिवाय आदिवासीच्या विकासाचा मार्ग खुला होणार नाही. तसेच आदिवासीच्या पोषणाबाबत अनेक समस्या

आहेत. गरोदर माता आणि लहान बालकांच्या कुषोषणाचा प्रश्न आदिवासी समाजात गंभीर आहे. डॉ. अभग बंग यांनी सर्च संस्थेमार्फत कोवळी पानगळ पुस्तकात महाराष्ट्रातील आदिवासीच्या कुपोषणाचे वास्तव मांडलेले आहे. महाराष्ट्र दरहजारी बालमृत्यूचे प्रमाण ४५ इतके जास्त दिसून येते. यातील बहुसंख्य बालके आदिवासी समाजाची आहेत. यातून बालमृत्यू, कुपोषण, पोषक आहारासारख्या समस्या आदिवासीच्या विकासावर मूळावर आलेल्या दिसतात.

७. **अज्ञान व दळणवळणाच्या समस्या-** आदिवासी समाजाच्या विकासाच्या मार्गातील सर्वात मोठी अडचण म्हणजे दळणवळण साधनाचा अभाव मानला जातो. आदिवासी समाजा दुर्गम पर्वत, डोंगर रांगामध्ये वस्ती करत असल्याने त्यांच्या पर्यंत शाळा, दवाखाने, नवीन तंत्रज्ञान, रस्ते, रेल्वे व इतर सर्व सुखसुविधा पोहचविणे अत्यंत अवघड असते. दळणवळणाच्या अभावी आदिवासीना इतरांशी जोडून ठेवणे अवघड होत असल्यामुळे विकासाचा विचार त्यांच्या पर्यंत पोहचत नाही परिणामतः ते मागासलेले राहतात. तसेच आदिवासी समाजामध्ये अज्ञानाचे प्रमाणा जास्त असल्याने त्यांच्या राजकीय जागृतीचा अभाव असतो. म्हणून त्यांच्यासाठी शासनाने सुरू केलेल्या योजना त्यांच्या पर्यंत पोहचत नाही. सरकारी अधिकारी, दलाल, राजकीय कार्यकर्ते त्यांच्या नावावर लाभ उठवितात. आदिवासी भागात राबविल्या जाणाऱ्या योजनातील प्रचंड भ्रष्टाचारामुळे लाखो रूपये खचून अपेक्षित विकास झालेला दिसत नाही. विकासाच्या अभावामुळे काही जहाल विचारांच्या नक्षलवादी संघटना समता आणि विकासाचे स्वप्न दाखवून आपल्या संघटने ओढण्याचा प्रयत्न सुरू केले आहेत. मध्य भारतात अनेक आदिवासी विभागामध्ये नक्षलवादी चळवळीचा जोर वाढलेला दिसतो. ह्या चळवळीमुळे आदिवासी देशापासून तुटत चालेला आहे. या चळवळी त्यांचा विकास करण्याऐवजी आदिवासीचा वापर करून घेत आहेत. तसेच आदिवासी समाजातील अज्ञान, अस्वच्छता, शुद्ध पिण्याचे पाणी आणि स्वच्छ कपडे आणि सुरक्षित निवाऱ्या अभावातून आदिवासीमध्ये त्वचारोग, टायफॉईड, न्यूमोनिया, कॉलरा, साथीचे आजार निर्माण होत आहेत. अपुऱ्या आरोग्य सुविधा आणि अज्ञानामुळे आदिवासी योग्य उपचाराऐवजी मंत्र, तंत्र, जडीबुटी, झाडपालाचा उपचार करतात त्यात रूग्ण दगावण्याची शक्यता असते. आदिवासीमध्ये अज्ञानामुळे मृत्यूचे प्रमाणही सर्वाधिक दिसून येते.

अशा प्रकारे विविध समस्यांना आदिवासी समाजाला सामोरे जावे लागते आहे. या समस्यातून आदिवासीच्या विकासाचा मार्ग अवरूद्र केलेलस दिसतो. आदिवासीना भेडसावणाऱ्या समस्या जोपर्यंत सोडविल्या जात नाही किंवा त्यांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न केल्याशिवाय आदिवासीचा विकास होणार नाही.

**टिप- महाराष्ट्रातील आदिवासी चळवळी-** ब्रिटिश काळापासून आदिवासी जमातीमध्ये चळवळी उभारलेल्या दिसतात. ब्रिटिश काळात मध्य भारतातील मुंडा, खाखार या जमातीनी चळवळी केलेल्या दिसतात. महाराष्ट्रात देखील भिल्ल समाजातील लोकांनी ब्रिटिश राजवटीला विरोध करण्यासाठी चळवळी केलेल्या दिसतात. परंतु या चळवळी ब्रिटिशांनी दंडशक्तीचा वापर करून दडपून टाकलेल्या दिसतात. स्वातंत्रोत्तर काळात आदिवासी जमातींना घटनात्मकदृष्टया समान दर्जा देण्यात आला. आदिवासीच्या विकासासाठी अनेक घटनात्मक तरतूदी करण्यात आल्या. त्यामुळे आदिवासी जमातीमध्ये जागृती निर्माण झाल्यामुळे हळूहळू या समाजातील लोक संघटित होऊ लागले. १९६० च्या दशकात कम्युनिस्ट पक्षाने 'अखिल भारतीय अनुसूचित जमाती' ची संघटना बांधण्याच्या कार्यात पुढाकार घेतला. कारण या समुदायात शिक्षणाचे नगण्य प्रमाण, अलगत्वाची भावना असल्याने त्यांच्या मुक्तीसाठी चळवळीत गती देणे व संघटना बांधणे अत्यंत अवघड काम होते. तरीही काही राजकीय पक्ष, समाज सुधारक आणि स्वयंसेवी संस्थानी आदिवासींना संघटित करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. बिहार व झारखंड राज्यात शिबू सोरेन, विनोद बिहारी मोहातो यांनी झारखंड मुक्ती मोर्चा अंतर्गत 'आक्रमकता चळवळ' केली. आसाममध्ये 'बोडो' जमातीच्या लोकांनी जमातीची भाषा, तिचे अस्तित्व, स्वायतत्तेसाठी आंदोलन चालविले. महाराष्ट्रात देखील धुळे, नंदुरबार, अमरावती, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली जिल्ह्यामध्ये कर्जमुक्ती, मजुरी वाढ, जमीन परत मिळावी, वन जमिनीचे हक्क इत्यादी मागण्यासाठी आंदोलने केलेली आहेत.

समकालीन राजकारणातील मेधाताई पाटकर, प्रतिभा शिंदे, राजेंद्र गावीत, के.सी. पाडवी, विजयकुमार गावीत, माणिकराव गावीत, शरद गावीत, कॉ.शरद पाटील, नजुबाई गावीत यांनी आदिवासी जमातींना संघटीत करून त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी विविध आंदोलने, मोर्चे, धेराव इत्यादीच्या माध्यमातून त्यांच्या प्रश्नांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. आदिवासीसाठी विविध चळवळी झालेल्या असल्या तरी त्यांचे प्रश्न अजूनही सुटलेले नाही. २००६ मध्ये वन हक्क

कायदा मंजूर झाल्यामुळे आदिवासींना जंगलातील वन औषधी, गायरान, तळे आणि विविध वस्तु जमा करण्याच्या परंपरागत अधिकार मान्य करण्यात आले आहेत. जंगलात पारंपारिक काळापासून शेती करण्याचा हक्क मान्य करण्यात आला. त्या जमिनी आदिवासीच्या नावावर करून देण्यात आलेल्या आहेत. परंतु अजूनही काही भागात या कायदयाची समाधानकारक रीत्या अंमलबजावणी न झाल्यामुळे आदिवासी चळवळी करतांना दिसत आहेत.

**प्र. ३ रा. आदिवासीच्या विकासासाठी किंवा समस्यांची सोडवणूक करण्यासाठी आवश्यक उपाययोजनेची माहिती दया.**

ब्रिटिश काळात मानवतावादी मिशनरी, मानववंशशास्त्रज्ञ व सामाजिक कार्यकर्त्यांनी आदिवासीच्या समस्याकडे लक्ष वेधले. ब्रिटिश काळात आदिवासीच्या विकासासाठी थोडयाफार प्रमाणात प्रयत्न झालेले दिसतात. १८७४ मध्ये अनुसूचित जिल्ह्याबाबतचा कायदा केला. आदिवासी समस्यांचा अभ्यास करण्यासाठी चौकशी समित्या, कमिशन नेमले. या कमिशनने दिलेल्या सुचविलेल्या उपाययोजनाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला. याशिवाय ठक्कर बाप्पांनी गांधी प्रेरणेने गुजराथमध्ये भिल सेवा संघ तर खानदेशात शंकरराव ठकारांनी खानदेश भिल्ल सेवा मंडळ ह्या संस्था आदिवासीच्या समस्या सोडविण्यासाठी आणि त्यांच्यात जागृती करण्यासाठी निर्माण केल्या. याशिवाय काकासाहेब बर्वे, श्रीमती गोदूताई परूळेकर, भाऊसाहेब हिरे, बाळासाहेब खेर, डॉ एल्वीन, मेधाताई पाटकर, प्रतिभा शिंदे, धनाजी नाना चौधरी, कॉ. शरद पाटील, नजुबाई गावीत इत्यादी समाजसुधारणांनी आदिवासी समाजाच्या विकासासाठी प्रयत्न केलेले आहेत. आदिवासी समाजाच्या साठी विकासासाठी केलेल्या प्रयत्नाचे दोन भागात विभाजन करता येते. ते पुढील प्रमाणे

**अ) शासकीय पातळीवरील प्रयत्न-** आदिवासी समाजाच्या विकासासाठी शासकीय पातळीवर विविध प्रयत्न केलेले आहेत. ते पुढीलप्रमाणे होत.

१. **घटनात्मक तरतूदी-** स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासीच्या समस्याचे निराकरण करण्यासाठी काही घटनात्मक तरतूदी केलेल्या आहेत. आदिवासींना अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आला. समतेच्या आधारावर मूलभूत अधिकार प्रदान करण्यात आले. लोकसभा, विधानसभेत संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात आले. घटनेच्या १६ व्या कलमानुसार शैक्षणिक, नोकरी आणि राजकीय क्षेत्रात लोकसंख्येच्या प्रमाणानुसार आरक्षण देण्यात आले. अनुच्छेद ३३५ नुसार संघ आणि राज्य लोकसेवा आयोगात ७.५ % जागा ह्या आदिवासी करिता आरक्षित वा राखीव ठेवलेल्या आहेत. लोकसंख्या व विधानसभेत ७.५% जागा म्हणजे लोकसभेत ४१ तर विविध राज्यातील विधानसभेत ५२७ जागा राखीव आहेत. तसेच ज्या राज्यात आदिवासीची संख्या जास्त असेल अशा राज्यात कलम १६४ नुसार अनुसूचित जमाती कल्याण मंत्रालय निर्माण करण्याची तरतूद करण्यात आली. आदिवासीच्या कल्याणासाठी राष्ट्रपती आपल्या विशेषाधिकाराचा वापर करून आदिवासी विकास मंडळ वा समित्या नेमू शकतो. तशाच स्वरूपाचे अधिकार राज्यपाल, प्रादेशिक परिषद आणि जिल्हा परिषदेला आहेत. अनुसूचित जमातीवर होणारे अन्याय, शोषण व पिळवणूक रोखण्याकरिता केंद्र शासनाने ६५ वी घटनादुरूस्ती करून आदिवासी करिता राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना १९९० मध्ये करण्यात आली. १९८७ मध्ये भारतीय आदिवासी सहकारी विपणन विकास परिसंघाची स्थापना करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थेत घटनेच्या ७३ व ७४ व्या घटनादुरूस्तीनुसार आदिवासीना लोकसंख्येच्या प्रमाणात पदाधिकारी व प्रतिनिधित्वासाठी राखीव जागा ठेवण्याची तरतूद करण्यात आली. आदिवासी बहुल वस्ती असलेल्या विभागाला आदिवासी उपयोजना क्षेत्र घोषित करण्याचा अधिकार राज्यपालाना देण्यात आला. घटनात्मक तरतूदी करून आदिवासीच्या विकासाला चालना देण्याचा प्रयत्न शासकीय पातळीवर झालेला दिसतो. राज्यशासनाने द.म.सुकथनर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. या समितीने केलेल्या शिफारशी राज्यशासनाने स्वीकृत करून १९९३-९४ पासून सुधारित आदिवासी उपयोजना लागू करण्यात आल्या. आदिवासी समुदायाच्या विकासाकरिता निधी उपलब्ध करून देण्यात आला.

२. **आर्थिक विकास-** आदिवासीच्या स्थिर विकासासाठी तांत्रिक शिक्षण, बी-बियाणे, पाणीपुरवठयाच्या सोयी, कर्जे वाटप इत्यादीच्या माध्यमातून शेतीविकासाला प्राधान्य देण्यात आले. जमीन हस्तांतरणावर निर्बंध घालून बिगर आदिवासींना जमिन विकण्यास प्रतिबंध लादण्यात आला. आदिवासीच्या हस्तांतरीत जमिनी आदिवासींना परत देण्याची तरतूद करण्यात आली. वेठबिगारी कायदा, किमान वेतन कायदा इत्यादीच्या माध्यमातून आदिवासीच्या शोषणाला पायबंद

घालण्याचा प्रयत्न केला. रोजगार हमी योजना, मनरेगा, इत्यादी योजनाच्या माध्यमातून आदिवासींना गावाजवळ रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. याशिवाय शिवणकाम, विणकाम, टोपल्या तयार करणे, मधमाश्या पालन, कुटीरोद्योग इत्यादी बाबत आदिवासींना प्रशिक्षणाची सोय करण्यात आली. स्वयंरोजगारासाठी शासनाकडून अनुदान व कर्जाची सोय उपलब्ध करून देण्यात आली. सहज कर्जपुरवठयासाठी सहकारी सोसायट्या, त्यांच्या शेतीमाल खरेदीसाठी आदिवासी उपयोजनाच्या माध्यमातून माल खरेदी इत्यादी प्रयत्न सरकारी पातळीवर झालेले दिसतात.

३. **दळणवळण आणि शैक्षणिक सुविधा-** आदिवासीचा प्रगत समाजाशी संपर्क प्रस्थापित होण्यासाठी शासनाने कच्च व पक्के रस्ते, पूल, टपाल सेवा, तार सेवा, रेल्वे सेवा, रेडिओ आणि दूरदर्शन केंद्रे सोयीसाठी प्रचंड पैसा खर्च केलेला आहे. तसेच आदिवासीमधील अज्ञान दूर करण्यासाठी प्राथमिक शाळाची निर्मिती, आश्रमशाळाची निर्मिती केली. शासकीय व खाजगी आश्रमशाळेत निःशूल्क शिक्षण, भोजन व निवास, पुस्तके, गणवेश उपलब्ध करून दिले जातात. याशिवाय वसतीगृहाची निर्मिती, तांत्रिक शिक्षण संस्थे राखीव जागा, वयाच्या अटीत शिथिलता, परदेशी उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्या, लोकसेवा व राज्यसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी निःशुल्क प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र स्थापन केली. शासकीय पातळीवर मोठया प्रमाणावर योजनाची आखणी करून आदिवासीच्या शिक्षणाला प्राधान्य देण्यात आले आहे.

४. **स्वास्थ्य व निवासविषयक कार्य-** आदिवासीच्या आरोग्यविषयक समस्याचे निराकरण करण्यासाठी त्यांना स्वच्छेतेचे प्रशिक्षण दिले जाते. स्वच्छ पाणीपुरवठयासाठी विहीरी व पाण्याची टाकी व नळजोडणीसाठी अनुदान दिले जाते. आदिवासी भागात ठिकठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रे, फिरती दवाखाने, कुष्ठरोग निवारण केंद्रे, प्रसूतीगृहे, बालसंगोपन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. कुपोषण नष्ट करण्यासाठी माता जननी योजना, सकस आहार पुरवठयाची सोयी, लोहयुक्त गोळयाची वाटप, मोफत आरोग्य शिबिरे, कुटुंबकल्याण कार्यक्रमाचा पुरस्कार इत्यादी कार्यक्रमाच्या माध्यमातून आदिवासींच्या विकासाला चालना देण्याचे कार्य सरकारी पातळीवरून सुरू आहेत.

५. **सामाजिक कार्य-** स्वातंत्र्योत्तर काळात केंद्र आणि राज्य सरकारांनी आदिवासीच्या सामाजिक विकासावर मोठया प्रमाणावर भर दिलेला दिसतो. आदिवासीच्या विकासासाठी शासनाने कुळ कायदा, सावकारी नियंत्रण कायदा, कमाल जमीन धारणा कायदा, आदिवासी जमीन हस्तांतर बंदी कायदा, आदिवासी आर्थिक विकास कायदा केलेले दिसतात. याशिवाय पालेमोड योजना, कर्जवाटप योजना, एकाधिकार धान्य खरेदी योजना, न्यूक्लिअस बजेट, प्रशिक्षण योजना राबवलिल्या आहेत. तसेच आदिवासीमधील बहुपत्नित्वाची चाल, पाट पद्धत, मागेलावी पद्धत, डोला पद्धत, लमजाना पद्धत ही अनिष्ट रूढया नष्ट करण्यासाठी शासकीय पातळीवर मोठया प्रमाणावर जनजागृती केली जात आहेत. आदिवासीच्या बोलीभाषा आणि आदिवासी समाजाच्या अभ्यासासाठी शिष्यवृत्या देणे, बोलीभाषा आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे, आदिवासी कलाकारांना प्रोत्साहन देणे, त्यांना निर्वाह वेतन देणे इत्यादीच्या माध्यमातून त्यांच्या संस्कृती व भाषेच्या संरक्षणासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. याशिवाय आदिवासीना खावटी कर्ज, सामूहिक विवाह सोहळयासाठी अनुदान इत्यादी योजनाच्या माध्यमातून सरकार आदिवासीच्या सामाजिक विकासावर भर देत आहेत.

**ब) सामाजिक आणि स्वयंसेवी संस्था पातळीवरील प्रयत्न-** आदिवासी समाजाच्या विकासासाठी सामाजिक पातळीवर देखील व्यापक प्रयत्न झालेले आहेत. ब्रिटिश काळापासून आदिवासीच्या विकासासाठी अनेक स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. ब्रिटिश काळात ख्रिश्चन मिशनरी, समाजसुधारक आणि विविध क्षेत्रातील तज्ञ लोकांनी आदिवासीच्या प्रश्नाचा अभ्यास करून आदिवासीच्या समस्या सोडविण्यासाठी विविध उपाययोजना सुचविल्या आहेत. त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विविध सेवाभावी संस्थांची स्थापना केलेली आहे. भारतात रामकृष्ण मिशन, ठक्करबाप्पा आश्रम, विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि विविध आदिवासी भागात कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्था आदिवासीच्या विकासासाठी रात्रदिवस झटतांना दिसतात. कारण शासनाने कोटयावधी रूपयाचा निधी खर्च करूनही आदिवासीच्या जीवनात विकासाचा सूर्य उगवला नाही. शासनाने सुरू केलेल्या योजना व पैसा आदिवासीपर्यंत पोहचलाच नाही. सरकारी अधिकारी, दलाल, राजकीय नेते यांनी तो पैसा हडप केला. आदिवासी भागात प्रत्यक्ष योजनाची अंमलबजावणी न करता कागदोपत्री योजना राबविल्याचा देखावा उभा केला गेला. त्यामुळे आदिवासी भागात विकास पोहचला नाही. म्हणून आदिवासीच्या

कल्याणाची कळकळ असणाऱ्या आणि आदिवासीच्या विकासासाठी रस असलेल्या अभ्यासकांनी स्वयंसेवी संस्थाची स्थापना करून आदिवासीच्या विकासाला हातभार लावलेला दिसतो. निमशासकीय पातळीवर आदिवासीच्या विकासासाठी विविध स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. सेवा- इलाभट्ट (गुजराथ), दिशा, विधायक संसदेचे सेंटर फार बजेट स्टडीज, विद्यालता पंडीत, मुंबई, अखिल भारतीय दयानंद सेवाश्रम संघ, नवी दिल्ली, अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रम, सेवाभारती इत्यादी स्वयंसेवी संस्था आदिवासी भागात कार्यरत आहेत. या स्वयंसेवी संस्थानी आदिवासीच्या वास्तव परिस्थितीचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासक आणि आदिवासी समाजातील कार्यकर्त्यांचा समावेश केला मोठया प्रमाणावर विकासाचा गाडा धावू शकतो. आदिवासीमध्ये मोठया प्रमाणावर जनजागृतीची आवश्यकता आहे. आदिवासीमधील रूढीप्रियता, व्यवसनाधीनता नष्ट करून स्वावलंबनाची वृत्ती निर्माण केल्याशिवाय तरणोपाय नाही. त्यांना लोककल्याणकारी कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी उत्तेजन दिले पाहिजे. बाबा आमटे, ठक्करबाप्पा, मेधा पाटकर, शंकरराव ठकार सारख्या निरपेक्ष समाजसेवकांची आदिवासीच्या विकासासाठी आहे. जर आदिवासी विकासापासून वंचित राहिले तर त्यांच्या नक्षलवाद चळवळ फोफवयाला वेळ लागणार नाही. याची समाज व शासनाने दखल घेण्याची गरज आहे.

**टिप- आदिवासी चळवळीची फलश्रुती, परिणाम किंवा सद्यःस्थिती-** आदिवासी चळवळ ही भारतातील महत्वपूर्ण चळवळ मानली जाते. या चळवळीचे आदिवासीच्या जीवनावर खालील परिणाम झालेले दिसतात.

१. **सांस्कृतिक सुधारणा-** ब्रिटिश राजवटीच्या काळात आदिवासीच्या समाजाच्या जीवनावर व्यापक परिणाम झालेले दिसतात. या काळात मिशनरीनी धर्मप्रसारासाठी आदिवासी क्षेत्रात कार्य करायला सुरूवात केली त्यातून आदिवासीचा इतर समाजाशी संपर्क आला. तसेच त्यांनी सुरू केलेल्या शाळा, दवाखाने सारख्या उपक्रमामुळे आदिवासीच्या जीवनातील समस्या निराकरणास मदत झालेली दिसते. स्वातंत्र्याप्राप्तीनंतर शासन व सेवाभावी संघटनांनी केलेल्या कार्यामुळे आदिवासीच्या जीवनात रचनात्मक बदल होण्यास सुरूवात झाली. त्याच्या जुन्या परंपरा, नीतिमूल्ये, जीवनविषयक दृष्टिकोन, धार्मिक व सामाजिक आचार विचार व राहणीमान, आहार यात आमुलाग्र बदल घडून आलेला दिसतो. शासनाने राबविलेल्या कल्याणकारी योजनामुळे आदिवासीचे मोठया प्रमाणावर सांस्कृतिकरण होऊन त्यांच्या सांस्कृतिक जीवनात व्यापक बदल झालेले दिसतात. आदिवासीचे विवाह, कुटुंब, धर्म, राज्यव्यवस्था, शिक्षण व अर्थव्यवस्था यांच्या कार्यात रचनात्मक बदल झालेला आहे.

२. **कौटुंबिक सुधारणा-** आदिवासी चळवळीमुळे त्यांच्या कौटुंबिक जीवनातही सुधारणा होत आहेत. आदिवासीमध्ये प्रगत समाजाच्या अनुकरणाने एकपती-एकपत्नी विवाहाची पद्धत सुरू होत आहे. विवाहपूर्व व विवाहानंतरच्या लैंगिक स्वातंत्र्याची कल्पना बदलत आहे. युवागृहाची पद्धत बंद पडत चालेली आहे. मातृसत्ताक कुटुंब पद्धतीची जागा पितृसत्ताक कुटुंबाने घेतली आहे. एकंदरीत कुटुंबाच्या रचनेत बदल घडून येत आहे. आदिवासींना कुटुंब नियोजन, स्वच्छता, देवधर्म, आरोग्य, अंधश्रद्धा इत्यादीचे गांभीर्य समजू लागले आहे.

३. **आर्थिक बदल-** पारंपरिक शेती व्यवसाय, शिकार करून मांस जमा करण्याचे किंवा जंगलात कंदमुळे व इतर वस्तूपासून अन्न मिळविण्याच्या पद्धतीत आमुलग्रा बदल होत असते. आदिवासीही इतर स्थिर समाजाप्रमाणे शेतीव्यवसाय, आधुनिक बी बियाणे, संकरित पशू, दुग्धजन्य पदार्थाचा व्यापार इत्यादी क्षेत्रात सहभागी होत असल्यामुळे आदिवासीचे दारिद्रय नष्ट होऊन आर्थिक स्थिरता निर्माण होत आहे.

४. **शैक्षणिक व राजकीय स्थितीत बदल-** पारंपरिक शिक्षणाची जागा आधुनिक शिक्षणाने घेतलेली आहे. शासन व स्वयंसेवी संस्थामुळे आदिवासी भागात मुलामुलीसाठी शाळा, आश्रमशाळा, माध्यमिक विद्यालये सुरू झाल्यामुळे आदिवासीमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे. शिक्षित आदिवासी तरूणांना आरक्षणामुळे नोकरी व व्यवसायाची संधी मिळत आहे. आदिवासींना स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा आणि लोकसभेत आरक्षण मिळाल्यामुळे राजकीय सहभागाची संधी मिळत आहे. राजकीय प्रतिनिधीत्वामुळे आदिवासी प्रश्नाकडे राज्यकर्त्यांना लक्ष देणे आवश्यक बनले. आदिवासी सदस्यांनी निर्माण केलेल्या दबावगटामुळे बोगस आदिवासीचा प्रश्न धसास लागलेला आहे.

५. **संसूचन माध्यमाचा प्रभाव-** संसूचन माध्यमाच्या वाढत्या प्रभावामुळे आदिवासीच्या जीवनात व्यापक परिवर्तन होत आहे. आदिवासीच्या वाडया-वाडयात रेडिओ, टी.व्ही, मोबाईल इत्यादी सुविधामुळे इतर समाजापासून अलगत्व जपणाऱ्या समाजाला इतर समाजासोबत संपर्क साधण्याची संधी प्राप्त होते. दळणवळणाच्या साधनामुळे आदिवासीचा

ग्रामीण व नागरी समाजासाठी संपक वाढू लागल्यामुळे त्यांच्या राहणीमान, आचार विचारात फरक पडू लागला. पारंपरिक आचारविचारांची जाग आधुनिक विचारांनी घेतलेली आहे.

६. **आधुनिक तंत्रज्ञानाचा विकास-** आधुनिक तंत्रज्ञान आदिवासीच्या विकासाच्या मार्गातील महत्वपूर्ण साधन बनले आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने फिरती आरोग्य केंद्र निर्माण करून आदिवासीच्या आरोग्य लक्ष केंद्रीत झाल्यामुळे साथीच्या रोगाला बळी पडणाऱ्या आदिवासींना वाचविण्यात यश प्राप्त होत आहे. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे आदिवासीभागात उदयोगछंदे सुरू झाल्यामुळे त्यात आदिवासींना रोजगार मिळत असल्याने दारिद्रयाचे प्रमाण कमी होत आहे. शेती क्षेत्रात आधुनिक तंत्राच्या वापरामुळे आदिवासीच्या उत्पन्नात वाढ होत असल्याने त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावत आहे.

अशा प्रकारे आदिवासीच्या पारंपरिक जीवनात आधुनिक काळात मोठया प्रमाणावर बदल होत आहे. विवाह, कुटुंब, शिक्षण, राजकीय प्रक्रिया, धर्म, आर्थिक जीवन आणि इतर सर्व क्षेत्रात प्रचंड वेगाने परिवर्तन घडून येत असल्याने आदिवासीच्या जीवनात रचनात्मक बदल होत आहे. परंतु त्यांचे प्रश्न संपले असे नाही अजूनही आदिवासीचे अनेक प्रश्न अनुत्तरीत आहे. मात्र प्राचीन काळापेक्षा आदिवासीच्या जीवनात व्यापक बदल झाले आहेत असे म्हणता येईल.

**एका वाक्यात अपेक्षित प्रश्नोत्तरे-**

१. आदिवासीच्या अभ्यास करणाऱ्या दोन अभ्यासकांची नांवे लिहा.
उत्तर- सिसले, ग्रीगसन, लॅक्सी, एल्विन, सेडविक, मार्टिन, डॉ. गो.स.धुर्ये आणि ठक्कर बाप्पा हे आदिवासीचे प्रमुख अभ्यासक सांगता येतात.

२. आदिवासी म्हणजे कोण?
उत्तर- डब्ल्यू जे. पेरीच्या मते, समान बोलीभाषा बोलणाऱ्या व समान भूप्रदेशावर वास्तव्य करणारा समूह म्हणजे आदिवासी होय.

३. आदिवासीच्या विकासासाठी शासकीय पातळीवर झालेले प्रयत्न विशद करा.
उत्तर- घटनात्मक तरतूदी, आर्थिक विकासासाठी प्रयत्न, दळणवळण व शिक्षणाच्या सोयी आणि आरोग्यविषयक सुविधा हे आदिवासीच्या विकासासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न केले आहे.

४. आदिवासीसाठी कार्य करणाऱ्या दोन संस्थाची नावे सांगा.
उत्तर- भिल्ल सेवा संघ, रामकृष्ण मिशन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, पश्चिम खानदेश भिल्ल सेवा मंडळ इत्यादी संस्था आदिवासीसाठी कार्य करतात.

५. आदिवासीच्या समस्या कोणत्या?
उत्तर- भाषाविषयक समस्या, सामाजिक समस्या, दळणवळण व आरोग्यविषयक समस्या, सांस्कृतिक समस्या इत्यादी आदिवासीच्या प्रमुख समस्या आहेत.

६. आदिवासी समाजाची दोन वैशिष्टये लिहा.
उत्तर- विशिष्ट भूप्रदेशात वस्तीस्थान, प्रमाणलधुता, साधे आर्थिक जीवन, समान बोलीभाषा, रक्त संबंधावर समाज उभारणी, समान धर्म आणि एकजिनशीपणा ही आदिवासी समाजाची वैशिष्टये सांगता येतात.

७. महाराष्ट्रातील दोन आदिवासी जमातीची नावे सांगा.
उत्तर- गौंड, पावरा, गावीत, तडवी, मावची, महादेव कोळी, कातकरी ह्या महाराष्ट्रातील प्रमुख आदिवासी जमाती आहेत.

८. 'एन्थ्रोपोलॉजिस्ट' या शब्दाचा सर्वप्रथम कोणी केला होता.
उत्तर- एन्थ्रोपोलॉजिस्ट (Anthropology) शब्दाचा उपयोग राज्यशास्त्राचा जनक ॲरिस्टॉटलने उपयोग केला होता.

९. 'टोटमवाद' म्हणजे काय?
उत्तर- टोटम म्हणजे कुलकचिन्ह होय. भौतिक वस्तू, पशू, पक्षी, वृक्ष, वनस्पतीशी कुलांचे सदस्य आपला अलौकिक व गुढ संबंध असल्याचे मानता आणि ज्याच्याविषयी ते श्रद्धा, आदरभाव ठेवतात ते टोटम होय, टोटमशी संबंधित सर्व कल्पना, विश्वास आणि संघटना यास टोटमवाद असे म्हणतात.

१०. आदिवासी क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिला समाजसुधारकांची नावे लिहा.
उत्तर- मेधाताई पाटकर, प्रतिभा शिंदे, नजुबाई गावीत इत्यादी महिला समाजसुधारक होय.